मानवी सुधारणा.

भाग पहिला.

रचणार

केशव रामचंद्र दे[illegible]ळकर

प्रसिद्ध करणार

रामचंद्र निळकंठ सहस्रबुद्धे

किंमत एक रुपया.

. 500. 15-6-96.

मानवी सुधारणा.

भाग पहिला.

(विस्तवाच्या शोधापर्यंत.)

हें पुस्तक

केशव रामचंद्र केळकर

शांतिब्रम्ह व उद्योगवृद्धि संस्थानचे उत्पादक इ. इत्यादि.

यांनीं लिहिलें तें

रामचंद्र निळकंठ सहस्त्रबुद्धे वांईकर आणि मंडळी

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किंमत एक रुपया.

Printed at the "*Vyapari*" Press, Poona.

६४९९

हें पुस्तक.

रा. ब. मोरो चिंतामण जोशी.

हुजुर डेपुटि कलेक्टर धुळें (खानदेश.)

यांस

त्यांच्या अनेक गुणांवर लुब्ध होऊन अर्पण केलें असे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

हा ग्रंथ लिहिण्याचें कारण, मानवी प्राण्याची जी उन्नत्ति अथवा अवनति वारंवार होत जाते, तिचीं कारणें न समजल्यामुळें उन्नत्तीला उपाय काय योजावें ? हें मनुष्याला सहसा आठवणार नाहीं; म्हणून प्रसंगांनीं मनुष्य कसा सुधारत जातो, विचार शक्तीचा उपयोग कसा करितो आणि समाज कसे बनतात, हें प्रतिपादन आजपर्यंत कोणीं केलेलें आढळलें नाहीं, आणि मानवी प्राण्याची जर सुधारणा होणें असेल तर अशा प्रकारच्या इतिहासांची अत्यंत अवश्यकता आहे. या ग्रंथातलीं सर्वच मतें सर्वांना ग्राह्य होतील, असें नाहीं; पण सुधारणेची खरी दिशा कळण्यास या पुस्तकाच्या वाचनानें बरीच मदत होईल; हा ग्रंथ वाचून जे लोक याजवर विचार करतील त्यांना थोड्या श्रमानें अशा प्रकारचे लेख लिहिण्यास साधन होईल, अशी ग्रंथकर्त्यास उमेद आहे.

या पहिल्या भागांत मनुष्य प्राण्याला विस्तवाचा शोध लागला, येथपर्यंत वर्णन आहे. पुढील भागांत विस्तवाचा उपयोग कसा करावा, खनिजपदार्थांचा शोध कसा लागला, समाज कसे बनले, राजसंस्था व धर्मसंस्था कशा उदयास आल्या, त्यांजवर हल्ले कसकसे झाले, सुतार, सोनार, कुंभार, तेली इत्यादि अने-

क कारागिरांचीं कामें कशीं वाटलीं गेलीं, कोणच्या प्रकारचा समाज उन्नति पावेल व कोणचा अवनति पावेल, वगैरे विषय पुढील भागांत येतील.

हें पुस्तक शास्त्रीय विषयाचें असून मनोरंजक आहे, हें पुस्तक साग्र वाचल्यानें कळून येणार आहे.

ग्रंथकर्ता.

प्रकाशकाची प्रस्तावना.

उद्योगवृद्धि पत्रामध्यें सुमारें एक वर्षभर हा विषय आला असून उद्योगवृद्धिचे वर्गणीदारांना तो फार आवडला, असें आह्मांस कळल्यावरून उद्योगवृद्धिच्या वर्गणीदारांखेरीज इतर लोकांनाही याचा उपयोग व्हावा आणि उद्योगवृद्धिचे वर्गणीदारांनाही व्यवस्थीत रितीनें हवा तसा लेखांचा संग्रह करतां यावा, ह्मणून आह्मी हें पुस्तक छापण्याचें धाडस केलें आहे, याचा खप योग्य रितीनें झाल्यास पुढील भागही छापण्यास आह्मांस उमेद येईल. सदरहू ग्रंथाच्या एक हजार प्रति काढण्याचा मात्र हक्क ग्रंथकर्त्यांनीं आह्मांस दिला. हल्लीं ९०० प्रतिच काढिल्या आहेत; आणखीं पांचशें प्रतीपुरता आमचा हक्क आहे.

प्रकाशक.

मानवी सुधारणा.

विश्वपर नामक राजधानींत ऐश्वर्यवान् राजाचा विरक्त नामें पुत्र आपल्या पित्याचे पश्चात् गादीवर बसला. या वेळीं त्याचें वय २१ वर्षांचें होतें. नाना शास्त्रांच्या अध्ययनानें याचे विचार संस्कृत झाले असल्यामुळें याला विद्वान् लोकांची फार चहा असे. बापाच्या कारकीर्दीत मनाप्रमाणें वागण्याची याला संधी मिळाली नाहीं; पण आज स्वातंत्र्य सुखाचा पूर्ण अनुभव मिळाल्याबरोबर यानें देशोदेशीचे विद्वान् पंडित दरबारीं बलाविले. अनेक विषयांवर वादविवाद सुरू होऊन विद्येच्या लीलेनें तें शहर सरस्वती मंदीर भासूं लागलें. एके दिवशीं राजानें विचार संपन्न अशा पंडितांस प्रश्न केला कीं, आपण निरनिराळ्या देशचीं निरनिराळ्या धंद्याचीं माणसें, निरनिराळ्या चालींचे पोषाग वापरतों, भाषेमध्यें भिन्नत्व आढळतें, रीती रिवाज भिन्न दिसतात, दैवतें भिन्न भिन्न असून भक्तिमार्गही भिन्न दिसतात, याचें कारण काय असावें? या विषयीं शास्त्रीय मतें निरनिराळ्या प्रदेशीं निरनिराळ्या तऱ्हेनें प्रतिपादन केलीं जातात, तर या विषयांसंबंधीं ज्यांचे विचार पक्क झाले असतील, त्यांनीं ते प्रकट करावे.

पुढें या विषयावर जे वादविवाद झाले, त्यांपासून समाधान तर झालें नाहींच; पण उलटा तो विषय अधीक वादग्रस्त होऊन राजाच्या मनाला व विद्वान लोकांच्या मनाला अधीक तळमळ सुटली.

एके दिवशीं एक **पंडीत** पुढीलप्रमाणें बोलूं लागलाः- राजाधिराज आपण जो प्रश्न केला, त्याचें आह्मी इतके पंडीत एकत्र असतांही योग्य समाधान झालें नाहीं, याबद्दल मला दिलगिरी वाटते. या प्रश्नाचें समाधान होण्यास योग्य साधन मागील पिढ्यांनीं करून ठेविलें नाहीं किंवा त्या साधनांचा त्यांना शोक लागला नसावा. आतां आपण **विरक्तनाम** धारण केलें आहे, करितां तत्संबंधीं विचारांची तळमळ वाटूं न देतां पुढील लोकांसाठीं मात्र कांहीं माहिती करून ठेवावी, ह्मणजे या प्रश्नाच्या समाधानाचें श्रेय आपल्यास येईल. आमच्या पूर्वजांनीं जे ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत व्यक्तिमात्रांचे इतिहास, लढायांचीं व शक्तींचीं वर्णनें, नीतीशास्त्राचे नियम वगैरे पुष्कळ गोष्टींचें विवेचन केलें आहे; पण कोणत्या काळामध्यें मनुष्य प्राणी कसा होता! तो पुढें लहान होत जात आहे कीं मोठा होत आहे, त्याच्या अवयवांत कसकसे फरक पडत गेले, समाजाच्या रीतीभाती अनादि कालापासून एक आहे, कीं त्यांत सतत बदल होत जात आहे, भक्तिमार्गो

विषयीं किंवा व्यावहारिक गोष्टींविषयीं लोकांचीं मतें ठाम झालेलीं कधीं पाहण्यांत येत नाहींत; तर हीं मतें कोठून कशीं निघालीं आणि कोण कोणत्या दिशांनीं त्यांत फरक पडत गेले? यांचें शोधन होण्यास आपल्याजवळ साधन नाहीं. आपल्यास साधन न मिळाल्यामुळें आपण तर उदासीन राहूं; पण पुढील काळच्या लोकांस आमच्या काळाची चांगली माहिती करून ठेवणें आपलें कर्तव्य समजून महाराजांनीं खर्चाचें जोखीम घेतल्यास पुढील विचार माझ्या मनांत आले आहेत, त्याचा महाराजांनीं व इतर विद्वज्जनांनीं थोडा विचार करावा.

आज कालचीं मापें पूर्व कालीन व भविष्य कालीन मापांबरोबर असण्याचा संभव नाहीं, इतकेंच नव्हे तर [illegible]च कालांत स्थल विशेषीं फरक आढळतो. एका गांवास एक माप तर दुसऱ्या गांवीं भलतेंच. त्याचा त्याचा मेळ बसत नाहीं. कापड आपण हातांनीं मोजतों; पण हात सर्वांचे सारखे थोडेच असतात? कोणाचे आखड तर कोणाचे लांब. मापें, देशांच्या रीतिभातींचा व पोषाखादिकांचा इतिहास, मनुष्यांच्या उंचीचें प्रमाण वगैरे जितक्या गोष्टी होतील तितक्या तयार करून त्या जमिनींत पुरून ठेवाव्या, ज्या पाण्यापासून व अग्नीपासून निर्भय होतील, अशा खाल मोठ्या चंदोबस्तीनें

भरून त्यांवर एक भव्य इमारत बांधावी, जी इमारत दोन चार हजार वर्षे टिकाव धरूं शकेल. त्या इमारतीच्या दगडांवर याच्याखालीं अमुक कालांतील रिती रिवाजांची माहिती आहे, अशा प्रकारचीं वाक्यें खोदवावीं; इमारत कोसळून खालीं पडेपर्यंत तीं वाक्यें कोणाला दिसूं नयेत, असे ते दगड इमारतींत बसवावे. माणसें दिवसेंदिवस शोधक होत जातील आणि आजची लिपी जरी त्या कालाला नाहींशी होईल, तरी शोधकत्वानें ते लोक आपला हेतू समजून आमच्या लेखांचें तर्कातर्कांनीं अध्ययन करून सर्व गोष्टींचें ज्ञान करून घेतील; करितां पुढील कालच्या लोकांसाठीं सरकारांनीं एवढी देणगी देऊन ठेवावी, अशी माझी इच्छा आहे.

दुसरा पंडित—पहिल्या पंडितानें सूचविलेली देणगी फार उपयुक्त आहे, असें माझें मत असूनमला त्या मताला थोडी भर देणें आहे, ती अशी:—मनुष्यांचे हुबेहुब दगडी पुतळे करून त्यांना चालू असलेले खरे पोषाग नेसवून ठेवावे; म्हणजे पेहेरावांचें प्रत्यक्ष चित्र पुढील लोकांस सहज समजेल व वस्त्रें कोणकोणत्या मूळ तंतूपासून आह्मी लोक तयार करतों, त्याचें त्यांस ज्ञान होईल. आमची रंग देण्याची व कलाबतूचें काम करण्याची कुशलता स्पष्ट दिसेल अशी योजना झाली पाहिजे.

यावर इतर पंडितांनीं निरनिराळ्या रीतीनें या दोघां

पंडितांचें खंडण केलें; आणि राजाला असा मतलब समजविला कीं, राजाची संपत्ति अशी निरर्थक खर्चण्यापेक्षां तिचा सदुपयोग दानधर्मांत यज्ञयागादिकांत झाल्यास बरें. दोन्हां पंडितांचें पांडित्य कोंडा कादून कांहीं निष्पन्न होऊं नये अशांतलें आहे. राजानें अमुक मत मला पसंत आहे किंवा अमुक पसंत नाहीं हें कोणास न दाखवितां पंडित लोकांच्या संभावना करणें व त्यांस निरोप देणें त्यानें सुरू केलें. पंडित लोक जातां जातां पहिला व दुसरा पंडित मागें राहिले. या पंडितांच्या शोधकत्वाबद्दल राजास समाधान होऊन त्यांजपाशीं आपला बराच काल नानाविषयांवर बोलण्यांत तो घालवीत असे. कांहीं महिने राजा या गोष्टीवर कल्पना व विचार करीत असतां त्याला असा विचार आठवला कीं, आपण ज्या सुधारणेला आज पोंचलों आहों, ही सुधारणा कीं कुधारणा अनादि कालापासून चालत आली नसून फरक पडत गेले असावे; त्याला असें वाटे कीं, रोज या मानवी स्थितींत फरक होत जात आहेत. केव्हां केव्हां जग सुधारत पुढें जातें व कधीं कधीं कुधारत मागें सरकतें; मिळून फरक पडतो यांत तिळमात्र संदेह नाहीं. हे राजाच्या मनांतील विचार त्यानें आपल्या पंडित मित्रांस कळविले, तेव्हां त्यांचाही अभिप्राय तसाच पडला. पुढें राजा दर्यावर्दी लोकांशीं व इमारती बांधण्याचें काम क-

रणाऱ्या लोकांशीं सतत दोन वर्षे हितगुजाच्या गोष्टी करित असे; त्या लोकांतील काम पुरें होतांच त्यानें पंडितांस बोलवून त्यांस आपले पुढील विचार कथन केलें.

राजा ह्मणतो–पंडित महाराज, आपण पुढील लोकांच्या माहितीकरितां ज्या सूचना केल्या, त्या मला मान्य आहेत आणि त्याप्रमाणें बऱ्याच वस्तू मीं आपण सांगिल्याप्रमाणें भुयारांत ठेवणार आहें. याशिवाय दुसरी एक गोष्ट मी मनांत आणली आहे. वारा अनुकूल असल्यास चवथ्या दिवशीं पोचतां येई, इतक्या अंतरावर येथून पश्चिमेस जवळ जवळ दोन बेटें आहेत. एक शंभर कोस लांब व ७५ कोस रुंदीचें असून दुसरें त्याचे खालोखाल आहे. दोहोंमधील अंतर दीड कोसाचें आहे. या बेटांवर वसाहत करविण्याचें माझे मनांत वडिलांचे कारकीर्दितच होतें; पण तो योग अद्याप आला नाहीं. आतां त्या बेटांपैकीं एकावर एका वर्षाचे आंतील १०० मुलें, ५० स्त्रीजातीय व ५० पुरुष जातीय अशीं नेऊन ठेवावीं. त्यांचा प्रतिपाल करण्याचे व त्यांचा इतिहास लिहिण्याचे कामावर आपल्यास ठेवण्याचें माझें मनांत आलें आहे; आपल्यास देशत्याग करविविण्याचा कांहीं कावा मीं केला आहे, असें आपण समजूं नये. आपल्याबरोबर आपलीं आप्तस्वकीय माणसें हवीं तितकीं नेण्यास आपल्यास परवानगी आहे. त्या

बेटावर समुद्राचे कांठींच ऊंच ऊंच डोंगर आहेत. त्या डोंगरांमध्यें एक लहान भव्य खोरें आहे; तें चोहीं बाजूंनीं डोंगरांनीं वेष्टून केवळ तो एक तलावच आहे म्हटल्यास चालेल. या तळयांत पाण्याचे वरचे बाजूस १०० माणसें राहूं शकतील, असा एक वाडा बांधिला असून आपल्या देशांतील वृक्षांचा आसपास बगिचा लावला आहे. भांडींकुंडीं, वस्त्रप्रावर्णें जीं जीं आपल्यास पाहिजे असतील तीं जातांना बरोबर देऊं. आपल्यास पोंचविण्यास व सोय करून देण्यास मीही आपल्याबरोबर येईन. कारकून, शिपाई, प्यादे वगैरे जीं जीं माणसें आपल्यास पाहिजे असतील, तीं तीं आपण निवडून काढावीं. हीं जीं शंभर मुलें तेथें नेऊन ठेवायाचीं त्यांचें संरक्षण करण्याचा हरयत्न करायचा खरा, तरी तीं मुलें आपलें अनुकरण करतील, असा कोणताही पदार्थ त्यांस दाखवायाचा नाहीं किंवा कृति करायाची नाहीं. तीं बोलतीं तर त्यांना बोलूं द्यावीं; पण आपण तोंडावाटे शब्द काढतां कामा नये. असें करून हा प्राणी भाषा कशी उत्पन्न करतो, हत्यारें, कपडे वगैरे कलेचे जिन्नस, शेती बागबगीचे वगैरेबद्दल कसे विचार करून काय उपाय योजतो याचा इतिहास लिहावा आणि तसें नाजूक काम करण्यास आपल्याशिवाय इतरांवर माझा भरंसा नाहीं कारितां आपण ही गोष्ट मान्य करावी.

हें राजाचें भाषण ऐकून दोघे पंडित आनंद पावून सहकुटुंब जाण्याचा त्यांचा विचार ठरला. राजानें आपल्या खजिन्यांतून सोन्यारुप्याचीं नाणीं व जवाहीर पुष्कळ नेण्याकरितां त्यांस हुकूम केला; त्यावर पंडित ह्मणाले, महाराज आह्मांस त्या ठिकाणीं सोन्या रुप्याचा उपयोग तो काय ? नाणें कोणाबरोबर व्यवहारांत आणायाचें आहे ? राजा म्हणतो—मित्रहो, देह क्षणिक आहे. त्याचा भरंवसा नाहीं. मी जर कदाचित् अल्पायुषी होऊन गादीवरील वंशज तुह्मांस लागणारें सामान सुमान पुरविण्यास हेळसांड करतील तर तुमची वसाहत उत्पन्न करूं लागेपर्यंत त्यांचा तुम्हांस या द्रव्यानें प्रतिपाळ करतां येईल. तुमची दाद लागत नाहीं असें तुह्मी पहाल तेव्हां तुह्मांकरितां ठेवलेल्या नौकेंत बसून तुह्मी समुद्रकांठच्या कोणत्याही शहरीं जाऊन या द्रव्याचेयोगें आपल्या गरजा भागवूं शकाल किंवा कालांतरानें कोणा राजाचीं आरमारें या वाटेनें जातांना त्यांना जर हें बेट दिसेल आणि ते तेथें आपल्या राज्याचा पगडा बसविण्याचा यत्न करतील तर त्यांसमुद्धां जवळ असलेलें तमप्रपट दाखवून वाटेस लावावें. तें लोक तसें न ऐकतील तर ‘ द्रव्येण सर्वे वशः ’ या न्यायानें त्यांस दक्षणा देऊन जाऊं द्यावें; तात्पर्य, ज्या ज्या वस्तु या त्रिवर्गांनीं नेण्याचें ठरविलें, त्या त्या तयार करून नंतर

१० मुली व ६० मुलगे राजानें विकत घेऊन बेटावर नाण्याची सिद्धता झाली.

दुसरे दिवशीं हवा अनुकूल पाहून सुमुहुर्तानें या मंडळींचीं १० जहाजें बंदरांतून बाहेर पडलीं. या जहाजांवर वर सांगितलेल्या मुलांपैकीं कांहींचीं आई-बापेंही होतीं. गायी, म्हशी, शेळ्या २०० माणसांना विपुल दूध पुरे इतक्या घेतल्या होत्या. हीं जहाजें मागें पुढें मिळून ४ थ्या व पांचव्या दिवशीं नियमित खाडींत शिरलीं. सर्व मंडळी पंडितांकारितां बांधलेल्या वाड्यांत उतरली. तो वाडा पाहून सर्वांस खुषी झाली. सर्व चीजवस्त जागच्या जागीं लागल्यावर राजानें मुलांस कशीं व कोठें ठेवावीं, यांविषयीं पुढील कल्पना पंडितांस सांगितल्या. या डोंगराच्या कड्यांच्या पलीकडे मोठें मैदान आहे. त्या मैदानांत ३ पासून ४ पुरुष उंचीच्या एका चबुतऱ्यावर हीं मुलें नेऊन ठेवावीं; जेणेंकरून जंगली पशूंपासून यांचें रक्षण होईल.

पंडित०—महाराजांची कल्पना बरोबर नाहीं. महाराजांनीं चतुष्पाद जनावरांपासून मुलांस बचविण्याचा जो इलाज केला, त्यायोगें त्यांजवर शेंकडों शत्रूंना चालून जाण्यास मोकळीक दिली असें होतें. चौथरा जर उभ्या भिंतींचा केला तर मुलें चालतानां व रांगतांना खालीं पडतील. थंडीवाऱ्यानें व सूर्याच्या तापानें आजा-

री होऊन मरतील, करितां या मुलांकरितां एक घर बांधावें; तें कच्च्या मातीच्या भिंतींचें कोठारासारखें असावें, ज्यांत उष्णापासून व थंडीवाऱ्यापासून या मुलांचें पोषण व्हावें. त्यांत एक कोठडी आह्मांकरितां असावी; ह्मणजे एखादें मूल आजारी झालें तर त्याची योग्य जोपा त्या खोलींत करतां यावी व त्या खोलींतून त्यांना अन्न पुरविलें जावें. आपण असा आक्षेप घ्याल कीं, घर पाहिल्यानें त्यांना तशीं घरें बांधण्यास कित्ता घालून दिल्यासारखें होऊन तीं त्यासारखीं घरें करतील. तथापि अनुकरण करूं लागण्यापूर्वीं आह्मी तें घर जमीनदोस्त करूं. पण ह्यांचें वय दहा वर्षांचें होईपर्यंत त्यांचें पालन एवढ्या जागेंत होऊं शकत नाहीं. त्यांचें पिंड ह्मणजे बीज शहरच्या लोकांचें असल्यामुळें त्यांच्या नाजुकपणास योग्य असेंच त्यांचें पोषण झालें पाहिजे.

असो, याप्रमाणें राजा व पंडित यांच्या संमतीनें योग्य बंदोबस्त होऊन राजानें पंडितांना अवश्यक तीं माणसें, गुरें, घोडीं, कुत्रीं, शेळ्यादि जनावरें देऊन आपण आपल्या राजधानींत परत आला.

येथून मानवी सुधारणेचा लेख सुरूं झाला. त्याची एक प्रत पंडीतांचे दसरीं राहून एक प्रत दरवर्षीं विश्वक राजाचे दरबारीं जाई. पंडितांचीं घरगुती पत्रें अलग राहत. त्यांचा या लेखांशीं संबंध नाहीं.

महाराज, आमची अशी कल्पना होती कीं, हीं मुलें वयांत येतपर्यंत आह्मांस लिहिण्यास कांहींच मजकूर मिळणार नाहीं आणि आपण आमच्या आळसाबद्दल दोष द्याल; पण सुदैवेंकरून आह्मांस तुह्मी गेल्या दिवसापासून कांहींना कांहीं नवें आढळूं लागलें. मुलांचीं जीं आईबापें येथें आलीं होतीं, तीही आपल्या सांगातें परत गेलीं. आतां त्यांचें मातापितृत्व आह्मांवर पडलें, या विवंचनेंत आह्मीं आहों. कच्या मातीची जाड भिंत तयार झाल्यावर त्या कोटाचे आंत एका बाजूस गुडघाभर भातयण गवत घालून वर सुमारें वीतभर कापुस आंथरला. हा त्या मुलाहीम प्राण्यांस बिछाना झाला. दुधासाठीं मात्र आह्मांस धातूच्या पात्राशिवाय मोठें पात्र आठवलें नाहीं. दुधाचे हांडे वारंवार भरून आणून तें दूध कांहीं दिवस त्यांच्या समक्ष ठेवून पाहीत होतों; पण तीं मुलें, अनुकरण करतील असें समजून पुढें हांडें खोलींत ठेवून पानाच्या द्रोणांतून दूध आणून पाजूं लागलों. आमचीं जीं जीं माणसें त्या दोंणीं मुलांच्या शुश्रूषेकरितां जातात, तीं उघडीं व हेरीं जातात. आह्मांस लिहिण्यास लाज वाटते, पण हा मजकूर आपल्यास कळावा ह्मणून कळवितों, किंवं स्वतः जातों तेव्हां आह्मीही नग्न असतों. मुलांनी रण्। केलें ह्मणजे आह्मी व आमचीं माणसें त्यांच्या-

खालील कापूस, गवत किंवा माती ज्यास त्यां म
स्पर्श झाला असेल, त्यास तें एका कोंपऱ्यांत त्या
पासून सुमारें २०० कदमांवर जमा करूं, व
खोलीच्या वाटेनें तो मल बाहेर टाकीत असूं. आ
खोलीशिवाय दुसरा रस्ता या कोटांतून बाहेर पड
नव्हता. यावेळीं कांहीं मुलें हळू हळू चालूं ल
होतीं. हा प्राणी मोठा अनुकरणी खरा ! एके
एक मुलगी दुसऱ्या मुलानें विष्टा करतांच ती क
सह उचलून त्या कोपऱ्याकडे घेऊन जातांना
पाहिली. तिच्यानें तें काम पुरतावलें नाहीं; म
बहुतेक वाटेंत पडला; पण कापूस नेऊन तिनें प
पोंचविला. कांहीं मुलें एखादवेळीं जो रडण्याचा
करतात तें पुसूंच नका. एकानें सूर काढला कीं
मागून पांच पंचवीस मार आरडून गोंधळ क
एके दिवशीं एक गोरा सुस्वरूप मुलगा आक्रोश
लागला. तें ऐकून ६।७ मुलें दुसरींही रडूं ल
त्या मुलाची दया येऊन मी त्यास उचलून
घेतला, आणि विस्मरणानें चुचकारलें. आह्मी व
र्भी माणसें फार दक्ष असो कीं मुलांसमोर तों
अवाक्षर काढायाचें नाहीं; कारण त्यांच्याकडून
भाषा आम्हास बनविणें आहे. पण माझी चूक
आणि ती चूक तावडतोब लक्षांत येऊन मी

चावली. तो देखाव पुष्कळ मुलांनीं पाहिला. दुसऱ्या दिवशीं पहातों तों एक मूल रडूं लागलें ह्मणजे दुसरें त्याचेजवळ जाऊन त्याला पोटाशीं धरतें आणि ओंठाला ओंठ घट्ट दाबून सोडून देतें, ज्यायोगें पा, पा, पा असा आवाज निघतो. चट, चट करून जें मुलांस चुचकारतात, त्या चुचकारण्यास जिभेला फार कठीण सांगात पडतें; तसा उच्चार मुलांकडून कसा निघणार? त्याऐवजीं तीं मुलें दोन चार वेळ उलटा प्रकार उच्चारून मग जीभ चावीत. हें कृत्य २ मुलें दुसऱ्या दिवशीं फार सपाट्यानें करूं लागलीं. तें पाहून मला हसूं येई; पण तें मी दाबीत असे. या गोष्टीस आठवडा लोटला नाहीं तोंच सकाळीं दूध पाजण्यास १० नोकर कामावर असतां व त्यांचें काम मी पहात असतां एक मूल रडूं लागलें, तें पाहून दुसरें मूल त्याला कवटाळून पा, पा, पा, उच्चारून त्यानें जीभ चावली. हा तमाशा पाहून एका नौकरास जें हासूं सुटलें, त्या हांसण्यांत तो शेवटीं खालीं पडला. तेव्हां त्याला मी ओढीत आपल्या खोलींत नेला व खोलीचें दार बंद करून धक्का देऊन बाहेर घातला. आंत येऊन पहातों तों कांहीं मुलें खो खो हांसताहेत व कांहीं त्यांस ओढताहेत. तेव्हां आह्मी मोठ्या विवंचनेंत पडलों कीं, २॥ वर्षांच्या पोरांना इतकें अनुकरण तर पुढें यांना अनुकरणाशिवाय कसें पाळतां येईल?

आह्मी ज्या गोष्टी वर लिहिल्या, त्या कदाचित् खोट्या वाटण्याचा संभव आहे. आपलीं मुलें शिकवून लौकर शिकत नसून हीं इतकीं तरबेज कां ? हा प्रश्न उद्भवतो; त्याला उत्तर आह्मी पुढील देतों, तें महाराजांस सयुक्तीक वाटेल अशी उमेद आहे. घरांतील मुलांस या वयांत शेंकडों गोष्टी शिकावयाच्या असतात व त्यांचा अल्प मेंदू त्या एकदम ग्रहण करूं शकत नाहीं. थोडें चालायाला, थोडें बोलायाला, थोड्या खुणा करायाला शिकायाचें असतें; तो प्रकार येथें नसल्यामुळें त्यांचा मेंदू कोणतेंही अनुकरण ग्रहण करण्यास कोरा करकरीत आहे. व दुसरी गोष्ट १०० मुलांत १०।१२ मुलें जास्त चाणाक्ष असणेंही साहजीक आहे.

भाषा—यांनीं या वयांत भाषचा पहिला शब्द बनविला, तो मं मं. याचा अर्थ भूक लागली, खायास दे; दूध, किंवा कांहीं समजा. मानवी प्राण्याच्या तोंडास प्रथम सहज येणारा अक्षरांचा पवर्ग होय. त्यांतही सोपें अक्षर म. तें या मुलांच्या तोंडीं प्रथम आलें. यावरून असें गृहीत होतें कीं, मम, ममता, माता, माय, बाप, माई, मामा, मामी इत्यादि शब्द मानवी प्राण्यानें प्रथम तयार केले. कित्येक भाषांचें ऐक्य करण्यासाठीं पंडित लोक ही भाषा अमुक मूळ भाषेपासून झाली आहे, ह्मणून जो वाद करतात, त्यांत विशेष तथ्यांश दिसत

नाहीं. पढें मूळ शब्द किंवा मूळ शब्दाचे अपभ्रंश निरनिराळ्या भाषांत सामील होऊन एकत्वाचा भास होतो. आज जर आपल्या मनांत आलें कीं, एक किंवा अनेक भाषा नव्या बसविणें आहेत तर त्या कृत्याकरितां आपल्याला असा एक कोश करावा लागेल कीं, ज्यांत एकाक्षरी शब्दापासून पाचांक्षरी किंवा सहा अक्षरी शब्दापर्यंत एरफेरानें अक्षरें बसवून शब्द करावे. जसें, १० आकड्यांच्या मागेंपुढें लिहिण्यानें कोट्यावधि संख्या होतात, तोच प्रकार ३, ४ अक्षरांच्या फेरबदलीनें करावा. उदाहरण. अ, अअ, अक, अका, अकअ, अकआ, अकअक, अकअका, अकअकअ, अकअकआ इत्यादि.

हा कोश तयार झाल्यावर आपण ५ नव्या भाषा बसविण्यास हुकूम दिल्यास या कोशांतील लहान आणि सोपे शब्द घेण्याची सहज इच्छा होऊन ज्या भाषा बनतील, त्यांतील कित्येक शब्द पांचही भाषेंत येतील. त्याचे अर्थ मात्र भिन्न असतील, पण हजारांत एखादा शब्द दोन भाषांत येऊन त्याचा अर्थही साम्यत्व पावेल. वरील कोशांत आलेलेच शब्द (आजकालच्या माणसांचीं तोंडें जशीं आहेत तशीं राहिल्यास) जगाताच्या प्रारंभापासून अंतापर्यंत मानवीभाषेंत सामील राहतील, कोशाचे बाहेर शब्दच नाहींत; म्हणून मानवी

प्राण्यांच्या भाषांतील कित्येक शब्दांत ऐक्य असणें साहजिक आहे.

चोंचीच्या किंवा चोंचीसारख्या लांचोळ्या तोंडाला लवकर येणारा उच्चार चकार, जो चिचोंद्र्या, उंदीर व पक्षी करितात आणि ज्यांच्या तोंडांत रुंद जीभ आहे, त्यांना पवर्ग सोपा, ह्मणून मांजर म्यां, म्यां, करतें, वासरें अंबे करतात, बकरें बें किंवा में करतें. मिळून म सारखें सोपें अक्षर मानवी प्राण्यास दुसरें नाहीं. पुढील पिढ्यांत या मुलांच्या संततीचीं माणसें कसकसे शब्द तयार करतात, याकडे आमच्या संततीनें लक्ष्य देऊन भाषेचा योग्य इतिहास लिहावा, असें पुत्र पौत्रांस आह्मी शिक्षण देऊं.

वर्ष दुसरें—या वर्षात मुलें चांगल्या रीतीनें चालूं फिरूं लागलीं. २ मुलगे व १ मुलगी मरण पावलीं, बाकी सत्याणव हयात आहेत. हल्लीं त्यांस भांडूं येऊं लागलें असून एकमेकांस चावून तीं जखमी होतात. विशेष जखमी झालेल्यास आह्मी रात्रीं उचलून आपल्या छावणींत नेऊन त्याचे डोळे बांधून औषधोपचार करतों. जखम बरी झाली ह्मणजे पुन्हां त्यांस त्यांच्या कळ्यांत आणून सोडतों. दुधाची वेळ झाली ह्मणजे दाराजवळ सर्व मुलें जमा होऊन दारास धक्के दे ात. कोणी मं मं चा घोष करतात, कोणी टिर्‍या बडवितात,

कोणी रडतात, असा एकच गोंधळ होतो. त-शांत एकमेकांस ढकलणें, चावणें, नखांनीं ओरबडणेंही चालतें. एखाद वेळ या त्रासाकरितां यांचे दांत उपटून काढावे, असा विचार मनांत येतो; पण त्यानें ही संख्या फारच कमी होऊन इष्ट हेतूस धक्का पोंचण्याचा संभव वाटतो. होतां होय तों दुधाच्या वेळा आह्मी चुकवीत नाहींच.

दया—या अर्भकांत जसा माकडी खोडकर स्वभाव वरील गोष्टीवरून कळतो, तशीच यांत कांहीं प्रमाणानें दयाही आहे. एक मुलगा कंबरेंत अदू असून त्यांस चालतां येत नाहीं. या मुलास दुधाचे वेळीं दरवाज्याजवळ आणण्यास एक सदृढ मुलगा तत्पर असतो, तो त्याचेजवळ जाऊन त्याचे हात आपल्या गळ्यांत घेऊन त्याला हळू हळू दारापर्यंत आणतो. यावेळीं ढकला ढकली व चावा चावी चालली असून या जोडप्यास थेट दारापर्यंत वाट मिळते. त्या दोघां मुलांस अद्याप एकसुद्धां जखम झाली नाहीं. आणि सर्वांपुर्वी ते दोघे दूध पिऊन परत जातात दुसरी दयेची गोष्टः— ज्या मुलांस चावण्याच्या जखमा होऊन तीं अजारी पडतात, त्यांच्या जखमा चाटण्यास व फुंकर घालण्यास दोन दोन तीन तीन मुलें हजर असतात. तीं मुलें दुधाच्या वेळीं दाराजवळ येण्याची पर्वाही करीत नाहींत. जख-

मेवर माशी बसूं देत नाहींत. एखाद वेळ माशी बसून ती जखमेस चांवली तर जवळ बसलेलीं मुलें आपल्या मृदु जिभेनें ती जखम गोंजारतात. चाटणें हें कित्येक जखमांस चांगलें औषध होतें. ज्या मुलानें चावलें असेल त्याचा, हीं जवळ बसलेलीं मुलें तिरस्कार करतात. तें मूल या रोगी मुलाजवळ येऊं लागल्यास रोगी मूल रडतें; त्याबरोबर सांगोपन करणारीं मुलें त्या शत्रूवर चढाई करून त्याला पळवून लावतात. केव्हां केव्हां चावलेलें मूलही जखमी मुलाचे सुश्रुषेस बसतें. व त्या जखमेबद्दल त्याला खेद होऊन तें ती बरी होण्याची अत्यंत काळजी घेतें. हा सर्व प्रकार भाषेशिवाय होतो; त्यानें पहाणारास ही मोठी मौज वाटते.

चावण्यानें एक नसता रोग उत्पन्न होऊन आपल्याला एक प्रकारचा त्रास होईल, असें प्रथम आह्मांस भय पडलें होतें; पण तो प्रकार मुलांच्या सांगोपनास हितकर झाला, हें आतां आमच्या लक्षांत आलें. चावऱ्यानें जखमा झाल्या आणि त्या जखमा गोंजारण्यास मुलांनीं हाताच्या ऐवजीं जिभेचा उपयोग केला; यापासून मुलांस चाटण्याची संवय चांगली लागल्यामुळें तीं आपल्या अंगाचा मळ चाटूं लागलीं, खाज खाऊं लागलीं. तीं नखांनीं खाजविण्यापेक्षां चाटून कंडू शमन करतात. यांना नाहण माखण नसल्यामुळें मळानें यांची

कातडी खराब होऊन त्वग्रोग ह्मणजे खरूज, खवडे होण्यांची ही वेळ होती; पण आज या मुलांस एकमेकांस चाटण्याचा जो काहीं नाद लागला, त्यामुळें सर्व मुलें स्वच्छ धुतलेल्या तांदुळासारखी दृग्गोचर होतात. फक्त डोक्यांतील मळ निघण्यास अडचण पडे. रात्रीं मुलें झोंपेंत असतां युक्तीनें डोळ्यांवर येणारे केंस मात्र आह्मी कापतों.

मुलें चंद्राकडे व ताऱ्यांकडे पहातात. एकमेकांस बोटानें खुणा करतात, चांदण्यांत व दिवसा खूप धांवत धुडपत असतात; जेणेंकरून पाहिजे तितका व्यायाम होतो. मलमूत्र बाजूस करून त्याला स्पर्श करीत नाहींत. एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून इजा न होई अशा रीतीनें कुस्त्या करतात, कोलाट्या मारतात, आणि आंकड्यांच्या ऐवजीं बोटांच्या खुणा करतात. आह्मी तीन ह्मणजे एकेकाच्या छातीवर हात मारून तीन किंवा असेल ती संख्या बोटांनीं अचूक दाखवितात. मात्र छातीवर हात मारतांना एकेक बोट उघडतात. यांना एक प्रकारचें अन्न, एक प्रकारचा व्यायाम आणि एक प्रकारची हवा असल्यामुळें व खाण्यास आहारांत उत्तम जो आहार दूध तें असल्यामुळ या काळांत मृत्यूची संख्या सगळी ५ झाली. पैकीं ४ मुली व एक मुलगा. आतां ४७ मुलगे व ४८ मुली हयात आहेत. वस्तीस यापेक्षां

मृत्यूची संख्या वाढली असती; ती खाण्यापिण्याच्या अनियमित प्रमाणानें.

१० वें वर्ष--यावेळीं हीं मुलें चांगलीं सदृढ दिसूं लागलीं. वस्तीतील मुलांस दुधाच्या टंचाईमुळें किंवा नानाविकारी पदार्थांच्या भक्षणानें शक्ति साधारण असते; पण हीं वस्तीतील मुलांपेक्षां बांध्यानें व ताकतीनें दीडपट बळकट झालीं. एके रात्रीं कोटाच्या भिंतीस सुमारें पुरुषभर उंचीवर आम्हीं एक भगदाड पाडलें. सकाळीं मुलें उठल्यावर कित्येकांनीं त्या भगदाडाकडे पाहिलें व तीं एकमेकांस आश्चर्य मुद्रेनें तें दाखवित सुटलीं. त्या भोंकावाटें झाड झुडपें दिसत होतीं. यांना एकमेकांचे विचार एकमेकांस समजविण्यास भाषा नव्हती; तरी पण वाऱ्यानें बाहेरील झाडें हाल्ल्याबरोबर तीं भीत. आजपर्यंत जमीन व आकाश याशिवाय अन्य पदार्थांचें यांस ज्ञान नव्हतें. झाड जागच्या जागीं रहातें कीं, आपल्या सारखें चलनवलन क्रिया करतें, हें बिचाऱ्यांस काय माहीत? याच संध्याकाळीं त्यांनीं मऊ बिछान्यास रजा देऊन त्या भोंकापासून तीं निजण्यास बरीच दूर गेलीं. सकाळीं भीत भीत त्या भोंकांपाशीं दोन दोन तीन तीन मुलें येऊन पुन्हां मागें पळून जात. बराच वेळ वृक्षाकडे टक लावीत आणि वाऱ्याच्या झुळकीनें झाड हलल्याबरोबर मागें पळत. हा तमाशा सुमारें

एक सप्तक चालला होता. यावेळीं या मंडळीनें आपल्या भाषेस दुसरा शब्द मिळविला. तो कोणता? तर " तू" " तू " "तुम" " यू " " वू " याचा अर्थ " तूं ". ज्यावेळीं हीं मुलें भगदाडाकडे टोळ्या करून जात, त्यावेळीं टोळी बनविण्यास वरील शब्दांचा उपयोग करून बोटानेंही दाखवीत. हा नेमका द्वितीय पुरुषवाचक शब्द सर्व साधारण भाषांस लागू पडणारा त्यांस कसा सांपडला असावा?

याचें कारण असें असावें. जसे करपल्लवीनें त्यांनीं आपल्या द्वितीय पुरुषाकडे बोट केलें, त्याच हिशेबानें मुखपल्लवीनें दोन्ही ओंठ पुढें करून जो शब्द साधला आहे, त्याचा उच्चार केला. त्यांत विशेषतः " ऊ " यावयाचा; मग व्यंजन कोणतेंही असो कोणी " पू " कोणी " मू " ही ह्मणत. याच कल्पनेनें मानवी भाषेंत तूं, यू, तुम, दाऊ वगैरे द्वितीय पुरुष वाचक शब्द उद्भवले असावेत.

आठव्या दिवशीं सर्व मुलें भगदाडाजवळ बेदिक्कत जाऊन उभीं राहिलीं; झाडें हाललीं ह्मणजे जरा चिचकत; पण जागा सोडीनात. शेवटीं त्यांना बाहेर पडण्याची इच्छा उत्पन्न होऊन तीं एकमेकांवर चढून त्या भोकांत जाण्याचा यत्न करूं लागलीं. पण तें त्या लहान प्राण्यांस साधेना. शेवटीं एक सुदृढ व धीट मु-

ल्गा मजपुढें येऊन उभा राहिला व बोटांनीं खुणा क-रून मला त्या भोंकांखालीं जाण्यास हुकूम किंवा विनं-ती करूं लागला. प्रथम मीं दुर्लक्ष्य केल्यासारखें केलें. तें पाहून तो आपल्या मंडळींत जाऊन त्यानें माझा धिमेपणा त्यांस कळविला. जेथें भाषा भरपूर नाहीं, तेथें समज जास्त होतो. त्याचा आशय त्या मुलांनीं समजून पांच मुलगे व दोन मुली मजकडे आल्या; त्यांनीं मला आपला विचार समजविण्याची शिकस्त केली; पण मी मठ्ठ बनलों. तेव्हां दोघांनीं माझे दोन हात, दोघांनीं दोन पाय व एकानें माझें डोकें धरिलें, व मला भगदाडाकडे घेऊन चालले. मी जरा मस्ती केल्यास मागें दोन रा-क्षस मला चावण्यास हजर होतेच. मी एका मुलास ला-थेनें उडविल्याबरोबर एकजण मला चावला व तिकडून ४ दुसरीं मुलें येऊन त्यांनीं मला फारच जखडला आणि एखाद्या झुरळाला ज्याप्रमाणें मुंग्या घेऊन जातात, त्या-प्रमाणें त्यांनीं मला त्या भगदाडाजवळ ओढून नेलें

मला वाटलें, अशा प्रसंगीं जर आपण तीन पांच केले, तर ही मंडळी आपल्यास मारूनही टाकील; म्ह-णून मी त्यांच्या इच्छेप्रमाणें वागूं लागलों. प्रथम त्यांनीं मला उभा करण्याचा यत्न केला, त्याबरोबर मी उठून उभा राहिलों. माझ्या आंगावर चढण्याचा एका मुलानें यत्न करून मला त्या प्रयत्नानें बरीच इजा केली; ती

मला दुःसह झाल्यामुळें मी थोडा खालीं वांकलों, त्याबरोबर तो मुलगा माझ्या पाठीवर उडून बसला व सर्व मुलांस मोठा आनंद झाला. त्यांच्या मुद्रेवरून मीं असें अनुमान केलें कीं, माझ्यामध्येंही त्यांच्यासारखी समजूत किंवा शहाणपणा आहे, असें त्यांस वाटलें असावें. माझ्या पाठीवर एक उभा राहून त्यानें बाहेरील जमीनीची यथास्थित पाहणी करून खालीं उडी टाकली. तो खालीं येतांच दुसरा माझ्यावर चढला. याप्रमाणें हें कृत्य दुपारपर्यंत चालून माझा जीव कासावीस होऊन मी खालीं पडलों; तेव्हां माझा पिच्छा सुटला. ही वेळ मुलांच्या दुधाची झाली असल्यामुळें बरींच मुलें खोलीच्या दाराशीं जमलीं. खोलींत दूध हजर होतें व माणसेंही माझी वाट पहात बसलीं होतीं; पण खोलीस आमच्या बाजनें कडी असल्यामुळें कोणाचा इलाज चालेना. मंम शब्दांनीं दाराशीं सर्व मुलांनीं आरडा ओरडा केला, दारावर धक्के मारले; पण व्यर्थ झालें, तेव्हां तीं पुन्हां माझ्या राशीस लागून मला खोलीच्या दारापर्यंत ओढून आणला. मी तेथें येतांच उठून उभा राहिलों आणि दाराची कडी काढून खोलींत शिरून दार बंद केलें. या पोरांस मजवर अंमल बसविण्याचें नुकतेंच धैर्य आलें, त्यानें तीं बेफाम झालीं; तीं दारावर धडाधड धडक्या देत. अशा त्वेषांत तीं

कदाचित् दरवाजा पाडतील अशी आम्हांस धास्ती पडून आह्मी १० जंगली झाडांच्या चिंवट छड्या घेऊन दार उघडलें आणि छड्यांनीं त्या मुलांस खूब मार देऊन दारापासून हटवून दुधाचे दहा हांडे दाराबाहेर टाकून दार बंद केलें. आतां आपला तेथें रहाण्याचा इलाज खुंटला, असें आह्मांस वाटून त्याच दिवशीं आह्मी खोलींतील सामान आपल्या दरींतील वाड्यांत नेलें. वाड्यांत सर्व माणसें एकत्र जमून पुढील व्यवस्थेसंबंधीं विचार केला. त्यांत असें ठरलें कीं, आज रात्रौ पाडलेलें भगदाड बुजवून टाकावें. दुधाच्या हांड्याबरोबर नागव्या तरवारीचा पहारा ठेवावा, न जाणो आपले पाळलेले शत्रू आपल्यावर चाल करतील. दुधाचा खुराक कमी करावा, छड्या घेऊन दोघां माणसांनीं रिकामे हांडे बाहेर आणण्यास व भरलेले आंत पोंचविण्यास जावें. त्यांस तें काम झेपत नाहींसें वाटल्यास तिसऱ्या माणसानें तलवार घेऊन आंतील शत्रूवर चाल करावी. दाहा पांच खून झाले तरी हरकत नाहीं; पण तलवारीचा विशेष उपयोग शत्रूंस दुखापत करून जिवंत राखण्याकरितां करावयाचा. हे ठराव झाल्यावर संध्याकाळीं आह्मी २९ माणसें दूध पोंचविण्यास गेलों. पहातां तों दारापाशीं एक मूल नाहीं. सर्वजणें कोनाकोंपऱ्यांत दडून बसलीं आहेत, कांहीं समोर असून डोळे

झांकले आहेत. आह्मी रिकामे हांडे बाहेर काढून भरलेले आंत ठेऊन दरवाजा बंद केला व खोलींत चुपचाप बसून राहिलों. यानंतर एकेक मूल भीत भीत येऊन दूध पिऊन गेलें. रात्रभऱ्यांत पाडलेलें भगदाड आह्मीं बंद केलें. दुसरे दिवशीं त्या भोंकाच्या जागेकडे सर्व मुलें पहात; पण त्यांची कांहीं अक्कल चालली नाहीं असें दिसलें. तीं मुलें आमच्या खोलीजवळ येण्यास फार भिऊं लागलीं. दार उघडल्याबरोबर त्यांस मोठी दहशत बसे. मजकडे तर उघड्या डोळ्यांनीं कोणी पाहीनात. पाहणें झाल्यास डोळ्यांवर हात ठेऊन बोटांच्या फटींतून मजकडे पहात. त्यांचें पुढील वर्तन पहाण्यासाठीं मी कोटाचे आंत दाराजवळ बसे. व खोलींत पहारा राही. मजवर हल्ला झाल्यास मला पहारेकऱ्यांनीं बचवावें असे पुष्कळ दिवस लोटले; पण कांहीं हालचाल नाहींसें पाहून मला या प्राण्यांच्या केविलवाणपणाची कींव आली. मला वाटला असा जर माझा यांस फार धाक राहील तर कदाचित् यांच्या बुद्धीची तीव्रता नष्ट होऊन मी मुलांकडे गेलों, तों तीं एकमेकांमागें लपूं लागलीं. त्या लपालपींत तीं एकमेकांस चावत, ढकलीत पण मजवर सरसावण्यास कोणाची हिम्मत न चाले. शेवटीं एक मुलगा व एक मुलगी मीं धरली. त्यांनीं रडून गोंधळ केला, पण त्यांस मीं सोडलें नाहीं. आपल्या

जवळ नेऊन बसविलीं, पोटाशीं धरलीं, त्यांच्या प्रेमळ चालीप्रमाणें चाटलीं आणि दुधाची वेळ नसतां त्यांस प्रत्येकीं एकेक द्रोण दूध पाजलें. आणि मग त्यांस सोडून दिलें. तीं माझे हातून सुटतांच आपल्या मंडळींत मिसळलीं व सर्वांस मोठा आनंद झाला. दुसरे दिवशीं दुसऱ्या जोडप्यास त्याच रितीनें धरलें आणि पाहुणचार केला. तिसऱ्या दिवशीं मी दोन मुलें पकडण्यास पुढें सरसावतांच ओळख झालेलीं मुलें येऊन मला चाटूं लागलीं. तें पाहून बरींच मुलें माझ्या भोंवतीं जमून त्यांनीं मला गोंजारलें आणि तेव्हांपासून त्यांची माझी दोस्ती जमत चालली. तरी मज वितरिक्त अन्यांस तीं फारच भीत असत.

मागें सांगितलेलें भगदाड तिसऱ्या दिवशीं मुलांनीं एकमेकांवर चढून उघडलें. माती ओली असल्यामुळें त्यांना फक्त हातांनीं माती काढतां आली. ही माती काढून भोंक तयार केलें तर आपल्यास शिक्षा होईल किंवा चतुष्पाद जनावरें आंत शिरून आपला फडशा पाडतील ही कल्पनाच त्यांना नाहीं. श्वापदांनीं आमचा हेतु निष्फल करूं नये ह्मणून तें भोंक आह्मीं ताबडतोब त्याच रात्रीं बंद केलें. दुसऱ्या दिवशीं प्रहर दिवसाचे आंत पुन्हां भगदाड जसेंचें तसेंच. हा आह्मांस रोजचा धंदाच झाला ह्मणावयाचा. आणि या धंद्यानें भगदा-

डाचे खालीं बराच मातीचा ढीग वाढल्यामळें मुलांना आयतें वर चढण्याचें उत्तम साधन झालें. आंतून माती उचलण्यास आह्मांस सुवड साधेना. हें काम आह्मीं करतों, माती कशी खणतों, ती काढवितों कशी वगैरे दाखवायाचें नसल्यामुळें तें रात्रीं जपून करावें लागे. पुढें कांहीं मुलें त्या भगदाडाचे आसपासही निजलेलीं आमचे पाहण्यांत आलीं. मग त्या कामावर पहारा करण्याचा त्यांचा हेतु असेल किंवा सकाळीं उठल्याबरोबर खोडकरपणांत प्रथम मजल मारण्याची त्यांची इच्छा असेल. मानवी जात मोठी खोडकर आणि व्रात्य खरी. हें भगदाड कसें उघडतात, हें पाहण्यासाठीं आह्मीं जी जागा केली, त्या जागेंतून ती कृति एकवेळ एकाच मनुष्यास पाहण्यास मिळे. त्यावरून आह्मी यांची कृति पाहिली. उजाडतांच मुलें उठलीं कीं, एकदम काम करण्याच्या जागीं धांव घेत व जितक्यांचा हात पोंचे, तितकीं तेथील माती काढण्याचा सपाटा चालवींत. यांत त्यांना मजुरी किंवा बहादुरी कांहीं मिळत नसून जीं मुलें जास्त काम करीत, त्यांस जास्त समाधान झालेंसें वाटे व ज्यांचा हात पोंचत नसे तीं जरा खिन्न दिसत. १३ दिवस हें काम सारखें चाललें होतें. आह्मी भगदाड रात्रीं बजवावें व सकाळीं मुलांनीं उघडावें. १४ वे दिवशीं सकाळीं भगदाडा इतक्या उंचीचा जो

मातीचा ढीग झाला, त्यावर सर्व मुलें जमून त्यांनीं हां हां ह्मणतां माती काढून व कांहीं बाहेर ढकलून पूर्ववत् भोंक तयार करून त्यांतून बरींच मुलें बाहेर पाहूं लागलीं. बाहेर मातीचा ढीग जमला होता; पण अगदीं थोडा, त्या ढिगावर एका मुलानें धाडकन उडी टाकली. आंतील मातीवर मुलें उड्या मारीत, त्यावरून भगदाडांतील काढलेली माती मऊ असून पायांना सुख देतें, ही कल्पना त्यांना पूर्वींच आली होती. दहा पळांनीं दुसरा एक मुलगा त्याच रीतीनें बाहेर पडला. त्या दोघांस अत्यंत आनंद होऊन महत्कार्यानें त्यांची छाती फुगली. या दोघांनीं एकमेकांस चाटून नंतर पायाखालची विसकटलेली माती गोळा करून ठेवली व वरील मुलांस हातांनीं "तूं खालीं ये" अशा अर्थाच्या दोघेही खुणा करूं लागले. त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत पांच मुलगे व तीन मुली खालीं आल्या. यांपैकीं कोणी ह्या दिवशीं ती जागा सोडून कोठें गेलीं नाहींत. आसपास तेवढ्या जागेंत होतीं; पण दूध मात्र मिळालें नाहीं. आंतील मुलांनीं दोन तीन वेळ दुधाचे द्रोण भरून आणून खालीं टाकले, पण ते तावडतोब मातींत जिरले. मं, मं शब्दांनीं त्यांनीं खालीं गोंधळ केला, पण बेट्यांचें मं, मं आंत राहिलें. आंतील मुलांस हें ज्ञान झालें कीं, खालीं गेलें असतां मं, मं मिळत नाहीं,

ह्मणून दुसऱ्या दिवशीं खालीं उडी टाकण्यास कोणीच राजी नव्हतें. व बाहेरील मुलांचीं तोंडेंही सुकून गेलीं. तें पाहून मुलें दूध पोंचविण्याचा यत्न करूं लागलीं. कोणी द्रोण तेथें नेऊन खालीं धार सोडी व तिच्या खालीं एकानें येऊन तोंड उघडावें; पण दुसरा त्याला ढकली व तिसरा दुसऱ्याला ढकली; मिळून दूध मातींत. प्रथम वरच्या मुलांस ढकलाढकलीची मौज वाटली, पण इष्टकार्य होत नाहींसें पाहून खालच्या मंडळीचा वरच्यांस राग आला. वरचीं मुलें 'मं मं' 'तुम तुम' शब्दांनींच त्यांजवर रागाऊं लागलीं, भाषेंत सगळे दोन शब्द, यांच्या भाषेचा कोश करणें झालें तरी तो दोन शब्दांचाच होणार; मग अर्थ कितीही निघोत.

परोपकार धैर्य—परोपकार धैर्याची खुबी अशी आहे कीं, त्या धैर्याच्या माणसास माझें पुढें कसें होईल ही कल्पनाच नसते. ज्याला ती कल्पना जाचील, त्याच्यानें साहस होणारच नाहीं. एका मुलानें तोंडांत माईल इतका दुधाचा गुळणा घेऊन तो खालीं उडी मारण्यास तयार झाला. हा प्रकार वरच्या लोकांस कळला. खालची मंडळी या गोष्टीविषयीं अज्ञान होती. तो गुळणा धरून त्या मुलानें खालील मातीच्या ढिगावर उडी ठोकली व एका मुलास जवळ घेऊन त्याचे तोंडांत तें दूध सोडलें. वरचीं मुलें हा जय पहात होतीं.

दुसऱ्या एका मुलीनें तोच प्रकार करून दुसऱ्या मुलाची समजूत केली. हें परोपकाराचें अनुकरण सहा मुलींनीं करून तो दिवस त्या मुलांचा या कृत्यांत गेला. खालच्या मुलांना थोडा तरी अन्नाचा अंश कसा मिळेल, या काळजींतून आह्मी पार पडलों.

वरच्या मुलांना यथेच्छ आहार मिळाल्यानें रात्रीं चांगली झोंप आली, पण खालच्या मुलांच्या पोटांत आग पडली असून त्यांना घातक विचार सुचत होते. त्या विचारांच्या दिशा निरनिराळ्या नसून सर्वांची एकत्र होती, ती काय? तर जें मुल दुधाचा गुळणा धरून खालीं उडी टाकील, त्याजवर हल्ला करून त्याच्या तोंडांतून सगळें दूध आपण एकट्यानें गट्ट करावें. ह्मणून सर्व जणें मातीच्या ढिगा सभोंवार बसलीं होतीं. तीं सर्व रात्र सर्वांनीं जागून काढलीं. दुधाचे हांडे खोलींत पोंहचतांच सकाळीं सर्वांनीं दूध प्यालें व एका मुलीनें गुळणा तोंडांत धरून खालील मातीच्या ढिगावर उडी ठोकली. ती मुलगी खालीं पडतांच १६ राक्षसांचा हल्ला तिजवर झाला. तिला ओढली, कोणी तिचे केंस उपटले, कोणी तीक्ष्ण नखांनीं ओरबडली, कोणी चावली; आणि अशा यातनेंत तिनें तोंड उघडलें आणि दूध खालीं मातींत पडलें. तिचा हेतु परोपकाराचा, पण ती सर्वांची शत्रु बनली. इतर मुलांप्रमाणें इला कोणी चाटलें

नाहीं; पण तिला चावून चावून अत्यावस्त केली. वरचीं मुलें या खालील मुलांच्या वर्तनास नाराज होऊन त्यांनीं हा परोपकार प्रकार ताबडतोब बंद केला. खालच्यांचे वरच्यांशीं " मंमं, तुम तुम " भाषेनें केव्हां केव्हां तोंडीं भांडण मात्र चाले. हा निराशेचा प्रकार पाहून खालील मंडळीस या मुलीची किंव येऊन चौघां दुष्टांशिवाय बाकी सगळी त्या मुली भोंवतीं जमलीं व अंतःकरणपूर्वक तिला चाटूं लागलीं. तिच्या यातना दुःसह होऊन तिनें तर शेवटीं राम ह्मटलाच. आजपर्यंत जे मृत्यु झाले, ते मुलांच्या दृष्टोत्पत्तीस आले नव्हते, पण हें प्रेत वरच्या खालच्यास सारखें पहायास मिळालें. ही मुलगी मेल्यावरही आपापली जखम खालील मुलें चाटीत होतींच. दुसऱ्या दिवशीं त्या प्रेतास घाण येऊं लागली व माशा घों घों करूं लागल्या; तरी ती हालचाल करीत नाहीं असें पाहून हा प्रकार विपरीत असल्याची सर्वांची खातरी झाली. घाणीमुळें खालचीं मुलें त्या प्रेतापासून बरीच दूर उभी रहात. मग कावळे येऊन टोंचूं लागले. त्यांनीं तें प्रेत छिन्न भिन्न केलें. हिंसक पशूंचा आह्मीं पूर्वींच नाश केला होता; नाहीं तर बाहेर पडलेले प्राणी पहिल्या रात्रींच परलोकवासी झाले असते. बाहेर पडलेल्या मुडद्याविषयीं सर्वांस वाईट वाटून ही नवी वस्ती उदास दिसूं लागली. कोणाशीं को-

णी बोलून जें दुःख दुणावेंत तसें कावळ्यांच्या चोंची चोंचीला यांचें मन जास्त विव्हळ होई. या संकट समयीं परोपकार करावा कसा व तो करून घ्यावा कसा हें आंतील बाहेरील मुलांस कळूं लागलें. आंतील धर्मात्म्यांनीं द्रोण भरून आणून सारखी धार खालीं सोडावी व त्या धारेखालीं एकानें उभे राहून ती तोंडांत झेलावी. एकाची पाळी झाल्याबरोबर त्यानें दुसऱ्या द्रोणाची अपेक्षा करूं नये. सर्वांची एक पाळी झाली ह्मणजे दुसरी पाळी सुरूं होई. खालची मंडळी भिक्षुक असून वरची दाते किंवा अधिकारी बनली. एकाचें दुध पिणें चाललें असतां जर त्याचे पाठीमागें दुसरें मूल आलें तर वरचें मूल धार बंद करून " मं मं " करून त्या प्रेताच्या जागेकडे बोट करी. त्याचा अर्थ तर्कानें घ्यावयाचा. " त्या मुलासारखी तुझी अवस्था होईल. त्याला चावलेला तो तूंच ना ? दुधाच्या भांडणाचा परिणाम तो मृत्यु होय. त्याला ठार करण्यास तुह्मीं कारण झालात. " अशा अर्थाचा त्याचा मतलब असे. ती खूण पाहून खालची मंडळी ओशाळी होई. हा प्रकार चालला असतां किड्यांनीं, कावळ्यांनीं व गिधाडांनीं, उरली सुरली मुंग्यांनीं, प्रेत पडलेली जागा १० दिवसांत साफ केली. शेंपन्नास पावलांवर आसपास त्या मुलीच्या अस्ति पडल्या होत्या. त्या अस्ति खा-

लचीं मुलें चाटूं लागलीं. एकाचे हातीं शिराचा भाग आला, तो घेऊन तो चाटीत बसे व त्यानें चाटून झाल्यावर दुसऱ्याचे स्वाधीन करावा, तो त्यानें चाटावा. याप्रमाणें सर्वांनीं तें नरकपाल चाटून चाटून स्वच्छ केलें. बहुतकरून तें खालीं ठेवण्याचा प्रसंगच येईनासा झाला. वरच्या लोकांनीं दूध ओतलें तर तें तोंडांत घेऊन या नरकपालावर सोडावें आणि मग त्याला जास्त चाटावें, असाही प्रकार पहाण्यांत आला. वरच्या लोकांसही त्या नरकपालाबद्दल प्रेम जागृत होऊन ते पहिली धार नरकपालावर सोडूं; मग तुह्मास पाजूं, अशा अर्थाच्या खुणा करूं लागले. हा प्रकार दोन दिवस झाला. एक द्रोण त्यांच्या पाळीप्रमाणें त्या हाडावर पडून द्रोणभर दूध फुकट जाई. तिसऱ्या दिवशीं ती कंवटी एका मुलानें दुधाचे धारेखालीं उताणी धरली आणि द्रोणभर दूध त्यांत घेतलें, तें पाहून खालच्या व वरच्या मुलांस मोठा आनंद झाला कीं, ती कंवटी आपण दिलेलें दूध ग्रहण करते. त्या कंवटींत २।३ द्रोण दूध राही. ती पुरती भरल्याशिवाय दुसऱ्या मुलांस दूध मिळेना. जो कंवटी घेऊन जाई, तो तींतील दूध पिऊन ती दुसऱ्याचे हातीं देई, तोंपर्यंत एक दोघेजण धारेखालीं तोंड पसरून निर्वाह करीत. इतक्यांत कंवटी घेऊन तिसरा येई; मग त्याला तीन

द्रोण दूध मिळे. असें करतां करतां ती कंवटी दूध पिण्याचें भांडें, प्रेमाचें माहेर, आपल्या घातकी स्वभावाचें स्मारक, मेल्यावरही सर्वांवर उपकार करणारा खरा मित्र, पाहिजे त्याच्या हातांत गेलें तरी व आपण त्याला चावलों असूनही तें चावत नाहीं ह्मणून निरुपद्रवी. अशी त्या कपालावर देवासारखी खालच्या, वरच्या लोकांची भक्ति बसली.

मानवी नीतीला वळण लागण्यास कांहीं तरी आधार लागतो. कोणत्याही प्रकारचें दैवत, कोणत्याही प्रकारची भीति, कोणत्याही प्रकारचें प्रेम, किंवा कोणत्याही प्रकारचें दुःख आधार पुरतो. तसा हा आधार मिळतांच वरच्या माणसांनीं दूध ओतावें, हें त्यांचें धार्मिक किंवा सामाजिक कर्तव्य बनलें. त्या कपालाला कोठें न विसंबणें हें खालच्यांचें कर्तव्य ठरलें. आतां खालच्या मुलांना दुधाची ददाद पडत नसल्यामुळें दुधाची वेळ साधून बाकी वेळांत तीं आसपास कोस कोस दोन दोन कोस फिरूं लागलीं. याचें फिरणें सुरू होऊन दोन दिवस झाले नाहींत, तोंच कपाल ज्या मुलाचे स्वाधीन होतें, त्यानें झऱ्याचें पाणी त्या कपालांत भरून तो कोटाजवळ आला. त्याच्या बरोबर दुसरीं दहा मुलें होतीं. त्यांनाही या अतोनात दुधाच्या संग्रहाचा मोठा अचंबा वाटून तीं सर्व जणें या कंवटीची व त्या पाण्या-

ची जणूं तारीफ करताहेत, असें त्यांच्या शब्दांवरून व आनंदी चेहेऱ्यावरून दिसे. कोटाचे खालून त्यांनीं वरच्या मुलांस समजविलें कीं " मंमंचा " लोट चालला आहे. रात्रीं व दिवसा वहातो. पण वरच्या मंमंसारखी रुचि मात्र नाहीं, बाकी मंमं विपूल.

हा मजकूर ऐकून या मंमंची रुचि पहावी व दर्शन घ्यावें अशी सर्वांस इच्छा झाली असावी. एक मुलगा खालीं मातीचा ढीग करण्यास खालच्या लोकांस खुणा करूं लागला; पण आतां माती वाळून गेली असल्यामुळें दगडासारखी कठीण जाहली होती. कठीण मातीच्या ढिगावर उडी मारल्यास दुखापत होईल ही कल्पना सर्वांस होती; तरी एकानें खालीं उडी टाकण्याचा हिय्या केला. उडी मारणाराचा पाय दुखावला; तरी तो लंगडत लंगडत उभा राहिला. तो उभा राहतांच त्याचेजवळ खालच्या मुलांनीं आपली प्रिय कंवटी दिली. ती त्यानें त्या पायांच्या वेदना होत असतां ही मोठ्या प्रेमानें चाटली. ती हातांत घेऊन चालले असतां मंमंचा झरा सांपडेल अशी त्याची समजूत करून मंडळी झऱ्याकडे निघाली. खरोखर वाटाडी मंडळी निराळी. आपण दाखविलेल्या बोटांच्या खुणांवरून हा बरोबर दिशेनें जात आहे ही कल्पना कोणालाच नाहीं; पण ती कंवटी मार्गदर्शक आहे हाच सर्वांचा भाव. जसजशी

ती पाण्याची जागा जवळ जवळ येऊं लागली, तसतसे ती कंवटीस जास्त प्रेमानें चाटीत व कंवटी धारकही कंवटीस चाटूं लागला. हा सर्व मुलांचा मेळा पाण्याचे कांठीं पाण्याचा चमत्कार पहात बसला आहे; इतक्यांत एका मुलाचा पाय चिखलांत रुतला, तें पाहून उडी मारण्यांत होणारें सूख या मातींत असल्याचें त्यानें सर्वांस कळविलें. सर्व मुलें त्या चिखलावर नाचूं लागलीं. हातांतून माती नेल्यास सर्वांस कोटाखालीं येतां येईल, असें वाटून दोन हातांत राही अशी माती प्रत्येकानें उचलून ती कोटाखालील खडखडीत मातीवर टाकली. खालच्यांनीं तुडवून पाहिलें, पण कठीणत्व गेलें नाहीं, ह्मणून दुसरी खेप केली. तरी समाधान झालें नाहीं ह्मणून तिसरी चौथी खेप केली. मानवी स्वभाव उद्योगी आहे. उद्योगाची दिशा लावणें हें काम कार्यकाऱ्याचें आहे, बाकी मेहनत कांहीं तरी करावी, यांत मानवी प्राण्यास इतर प्राण्यांहून जास्त सुख वाटतें. माती तेथें नेऊन टाकण्याबद्दल या मुलांस कोणी मजुरी कबूल केली नाहीं. कोणी बहादुरी दिली नाहीं; तरी तो नाद इतका काहीं त्यांस लागला कीं, त्या कामाशिवाय तीं निराळींच बसलीं नाहींत. त्यांनीं दोन दिवसांत एक पुरुष उंचीचा ढीग तेथें रचला. वर फक्त १० मुलें शिल्लक राहिलीं. सर्व मुलें खालीं उड्या ठोकून मातीं-

च्या कामावर रुजूं झालीं. केलेलें काम पाहून त्यांस मोठा आनंद होई. चवथ्या दिवशीं भगदाडाच्या भिंतीवर या ढिगावरून जातां येतें, असें पाहून त्या जयानें सर्व मुलें आनंदानें उडूं बागडूं लागलीं. हा यांचा प्रथम जय किंवा उत्साह; या उत्साहांत जरी चंदनाचे सडे, गुढ्या तोरणें उभारलीं नाहींत, तरी दिखाऊ उत्सवापेक्षां मानसिक उत्साह यांचा सहज लक्षांत येण्यासारखा होता.

आतां आंतील मुलें बाहेर व बाहेरचीं आंत सहज येऊं लागलीं. सर्वांचा क्रम दिवसभर त्या लहानशा नदीवर काढून रात्रीं कोटाचे आंत जाऊन निजण्याचा सुरूं झाला. नदीचे कांठावर चिखलांत व पाण्यांत उड्या मारणें व कोटांत जाऊन विश्रांती घेणें हेंच यांचें काम व शौक झाला. नरकपाल मात्र कोणाचे तरी हातांत राही. कोटाचे व नदीचे दरम्यान फळझाडें विपूल असूनही हीं मुलें फळांकडे व फुलांकडे बिलकुल लक्ष देत नाहींत, हें पाहून आह्मांस चमत्कार वाटला. कोणातही पदार्थ लहान मुलांचे हातीं लागतांच तीं तो तोंडांत घालतात. पदार्थ तोंडांत घालण्याचें कोणी शिकवावें लागत नाहीं, असें असूनही हीं मुलें अद्याप कोणा फळास हात लावीत नाहींत. हें कां? ह्याचें कारण अजमासानें ताडलें कीं, आपण त्यांच्या बाह्य स्वभावाला कोंडल्यामुळें नि-

राळें वळूं लागलें. कित्येक वर्षांत दुधाशिवाय व एक-मेकांच्या शरिरांशिवाय यांना अन्य पदार्थ दिसालच नाहीं, ह्मणून त्यांच्या मानवी मूळ स्वभावांत फरक पडणें साहजीक आहे; हें एक कारण असावें किंवा चिखलांत नाचण्याचा नाद लागल्यामुळें सर्व लय नदी किनाऱ्यावर असावें. कोटाखालीं जसा यांनीं मातीचा ढीग केला, तशाप्रकारचे चिखलाचे ढीग नदी किनाऱ्याला रोज करीत व त्या ढिगांवर, डगरीवर जाऊन उड्या मारीत. डगरींवर चढतांना झुडपें व जाळीं अडचण करीत. निरुपद्रवी झुडपांच्या फांद्या हे मल्ल तोडीत; पण बोरी करवंदीच्या जाळींतून पार पडतांना शेंकडों कांटे लागत, तरी तीं मागें हटेनात. कांटयांनीं रक्तबंबाळ शरीरें झालीं, तरी उडया मारण्याचा नाद. अशा जाळया चतूर मुलें वर्ज करीत. उडी मारण्याच्या चढाओढींत एका मुलाचा पाय दुखावला, तो इतका कीं, त्याला चार पावलें चालण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं. चौघां मुलांनीं त्याला करवंदीच्या झाडाखालीं नेऊन ठेविलें. आळीपाळीनें सर्व मुलें त्याचा पाय चाटण्यास तेथें जात. त्याचे आसपास पिकलेलीं करवंदें पडलीं होतीं. पायांची चळवळ नसल्यामुळें लहान मुलांचा स्वभाव या लंगड्यास आला. तो एकेक करवंद तोंडांत घालूं लागला. तो मिष्ट स्वाद त्याला आवडून तो फरपटत फरपटत दूर दूर जाऊन करवंदें

फस्त पाडी. रात्रीं कोटांत या मुलास उचलून नेणारीं जीं मुलें होतीं, त्यांजकरितां यानें दोन ठिकाणीं थोडथोडीं करवंदें जमा करून ठेविलीं होतीं. तीं खाण्याविषयीं यानें त्या मुलांस सूचना केल्यावरून तीं त्यांनीं खाल्लीं. तीं फळें झाडांवर जिकडे तिकडे भरलेलीं होतीं, तीं हातांनीं तोडून या मुलाचे हातांत व नरकपालांत माइलीं तितकीं घेऊन संध्याकाळीं कोटांत प्रवेश झाला. हाही दिवस मोठ्या बहादुरीचा व आनंदाचा झाला. लंगड्याच्या अचाट कल्पना शक्तीबद्दल त्याला सर्वांनीं यथेच्छ वाटलें. जीं करवंदें बरोबर आणलीं होतीं, तीं वाटण्याचा सोहाळा झाला. दुसरे दिवशीं मंडळी नदी किनाऱ्यावर न जातां सर्वांचा हल्ला करवंदीच्या झाडांवर झाला. करवंदे खातां खातां अनेक फळांचा त्यांस शोध लागला व ते अनेक फळें खाऊं लागले. करवंदीचे कांटे लागून जो कित्येक मुलांचे आंगांतून रक्तस्राव झाला, तो अन्य मुलांनीं चाटला; तें पाहून ह्या मुलांस माणसाच्या रक्ताची गोडी लागून ही वस्ती कदाचित् फस्त पडेल, अशी आह्मांस भीती पडली होती ह्मणून आह्मी उंच वृक्षांवर बसून सारखा पहारा करीत होतों; पण करवंदाच्या गोडीनें त्यांची जीभ फळफळावळीच्या रुचीकडे वळली. करवंदीच्या जाळ्या हीं मुलें जोरानें हालवून करवंदें खालीं पाडीत, हात पोंचल्यास हातांनीं तोडीत, हिरवीं क-

खंदें क्वचित् खाऊन थुंकून टाकीत. नुसत्या हातांनीं झाडें हालविण्यापेक्षां काठीनें झोडण्याची कल्पना एका मुलास सुचली. तें पाहून बरींच मुलें बिन कांट्याच्या झाडांच्या काठ्या मोडूं लागलीं. हें मानवी प्राण्याचें पहिलें हत्यार तयार झालें. या दिवशीं सायंकाळीं कोटांत मुलें शिरलीं तीं हत्यारांसह शिरलीं. यांत त्यांना कल्पकाचें कांहीं वाटलें नाहीं. जो तो आपली कल्पना जास्त असें मानी. कोणी काठ्या लांब काढल्या ते लांबीबद्दल अभिमान बाळगीत, कोणी आपल्या काठीच्या जाडीचा अभिमान मानीत, कोणीं सरळपणाचा, कोणी आंखूडपणाचा; मिळून ज्याला त्याला आपापलें हत्यार प्रीय वाटलें. ज्यांच्या काठ्या आंखूड होत्या, ते त्या दुसरे दिवशीं झाडांवर फेंकूं लागले. लांब काठीपेक्षां त्या पराक्रमी ठरल्या; तेव्हां बहुतांनीं जाड आंखूड होलपांडे तोडण्याचा क्रम चालविला. जाळीवर बरेच होलपांडे (आंखूड काठ्या) अटकून राहूं लागले. तसतशी मंडळी ते होलपांडे पाडण्याकरितां जास्त श्रम करूं लागली. त्याच दिवशीं हजारों काठी तुटली. तरी झाडावरचीं सर्व हत्यारें खालीं पडलीं नाहींत. त्या घाईत कसलीही काठी मिळाली तरी झाडावर फेंकण्याची मुलें त्वरा करूं लागलीं. त्या घाईत कांहीं मुलांनीं मातीचीं ढेंकळें व दगडही फेकले. एक दोन दगड लागून होल-

पाडे व करवंदें खालीं पडतात, हें पाहून दगड फेंक-ण्याचें अनुकरण मोठ्या त्वरेनें झालें.

पहिल्या पिढींत मानवी प्राण्याची सुधारणा फार त्वरेनें झालेली पाहून आह्मांस समाधान वाटतें. दगड हें हत्यार बरोबर बाळगण्याची कोणास इच्छा झाली नाहीं, कारण तो हातांतून सुटला कीं त्यावरील मालकी गेली. दगड दुर्मीळही नाहींत. निरनिराळ्या झाडांच्या काठ्या तोडणें व दगड मारणें हा अभ्यास आपल्या नवीन प्रजेंत बळावत चालला. फळें दगडानें पाडण्यांत लौकिक वाटे, तितका तो काठीनें पाडण्यांत वाटत नसे. एकादें फळ फार उंचावर असल्यास जो दगड मार-ण्यांत प्रवीण असे, त्याला तें इतर मुलें दाखवीत; तें दगडांनीं पाडून तो बहादुरी मिळवी. या मुलांना हल्लीं दुधाची पर्वा राहिली नसल्यामुळें त्यांचें दूध आह्मीं कमी केलें.

या वेळीं सर्व मुलांचा मेळा एकत्र न राहतां टोळ्या होऊन जिकडे जिकडे फळें जास्त मिळतील, तिकडे ति-कडे जाण्याची त्यांची प्रवृत्ति झाली; तरी सूर्यास्ताचे सुमारास सर्व कोटांत जमत. निरनिराळ्या प्रदेशांत जीं खाण्यासारखीं किंवा न खाण्यासारखीं फळें मिळत, तीं एकमेकांस दाखविण्यास ही मंडळी बहुतकरून घेऊन येई. संग्रहाचें मात्र ज्ञान कोणास नसे. दाखविलेलें फळ

दुसऱ्यांस खाण्यास देत. " तें मला ठाऊक आहे " अशा आशयाची खूण उलट जबाब मिळाल्यास आपणच गट्ट करीत. करवंदें खाणें, नदीच्या पाण्यांत व चिखलांत डुंबणें व वस्त्ररहित असणें एवढें कुपथ्य सुरूं होतांच सर्व अजारी पडलीं. ताप, खोकला, पडसें जास्त जास्त जोरावत चाललें. जे जास्त बेजार झाले त्यांची करवंदांवर इच्छाच होईना; अर्धवट होतीं तीं थोडथोडीं करवंदें खात. जास्त आजाऱ्यांनीं नरकपाल चाटीत रहावें. ज्यांना हींव येई, तीं एकमेकांच्या कुशींत शिरत. दांतखिळी वाजूं लागलेली पाहून दुसरीं कढत झालेलीं किंवा ताप निघालेलीं मुलें हींववाल्यास कंवटाळून त्याला ऊब देत. हें सामाजिक सहाय्य साहजिक त्यांजकडून होई. एकमेकांच्या सोयी एकमेकांनीं उसन्या फेडण्याचा तो काल होता. जर एखाद्या मुलास ताप, पडसें खोकला झाला असतां; तर त्याची जोपा कदाचित् हवी तशी झाली नसती. पण एकसमयावच्छेदेंकरून सर्वांना एक प्रकारची जरूर पडून ती जरूर भागविण्याचें प्रत्येकाचें मनानें घेतलें. या मंडळीला कपटाचा अभ्यास अद्याप झाला नसल्यामुळें सार्वजनिक कामें पहाऱ्याशिवाय व हजिरीशिवाय होतात. मधमाशा व मुंग्या या प्राण्यांचे समाज जसे कार्यकारी असतात, तसा मानवी समाजही कार्यकारी आहे, पण या प्राण्यांत विशेष

दोष आहे तो कोणता ह्मणाल, तर लौकिकत्व. हा गूण असून दंभ वाढल्यानें दोष होतो. लौकिकत्वापासून मनुष्यप्राणी पराक्रमी निपजावा, हा त्याचा गुण, पण पराक्रम केल्याशिवाय लोकांनीं आपल्यास पराक्रमी ह्मणावें, कल्पनाशक्तिशिवाय कल्पक ह्मणावें, कार्यकारी ह्मणावें, अक्कल नसून शहाणें ह्मणावें, भिकारी असून श्रीमान् ह्मणावें, दुराचारी असून सदाचारी ह्मणावें, आळशी असून उद्योगी ह्मणावें, अशी जी घातक इच्छा मानवी प्राण्यांत निर्माण झाली, ती या जातीचा ऱ्हास करीत आहे; नाहीं तर या मुलांच्या सुधारणेकडे पाहून आमची खात्री होते कीं, मानवी प्राणी अतर्क्य गोष्टी करण्यास कधींच समर्थ झाला नसता. अनुकरण करण्याची त्याला फार चाड असून अनुकरणानें तो प्राणी नियमित योग्यतेचा न रहातां तें अनुकरण विशेष सुधारलेलें करतो व त्या अनुकरणांत स्वतःचा कल्पकपणा थोडा तरी गोंवून दिल्याशिवाय रहात नाहीं. खोटी प्रौढी या नव्या वस्तींत शिरण्यास अद्याप बराच काल लागेल. करवंदाचा शोध करणाराला जरी मुलांनीं चाटून थोरपणा दिला तरी तो थोरपणा चोरण्याचा यत्न कोणी केला नाहीं. दुधामध्यें वरील रोगांवर औषधें आह्मी मिळवूनच दूध ठेऊं लागलों.

आतां नवीन वसाहतींतील मुलें वनचर बनलीं. तीं

जरी कळपा कळपानें संचार करीत, तरी मध्यें मध्यें एकेकटाही भलती कडे भटके. व दहा दहा, पांच पांच, चार चार मुलांच्याही टोळ्या बाहेर पडत. इतक्याकडे सारखें लक्ष्य ठेवण्यास जास्त माणसांची जरूर भासूं लागली, ह्मणून त्या मुलांबरोबर फिरण्यास योग्य विद्वान मुलगे आह्मी आपल्या दरींतील वाड्यांत तयार केले होते; त्यांपैकीं एकास रात्रीं आह्मी सर्व मुलें गाढ निद्रेंत असतां कोटांत आणून निजविला. सकाळीं मुलें उठलीं; तेव्हां तीं त्या मुलाकडे पाहूं लागलीं व एकमेकांस हा दैवी चमत्कार दाखवूं लागली. या मुलांवर विशेष प्रसंग आल्यास या सर्वांना हल देऊन पळण्याची कला याला अवगत होती. तो मुलगा हीं मुलें करतील तसें आपण करावें, बाहेर पडलीं तर त्याजबरोबर बाहेर पडावें या हेतूनें त्यांचें चलनवलन पहात उभा राहिला. एक मुलगी याच्याजवळ येऊन त्याला हुंगून गेली; त्याबरोबर एकामागून एक त्याला हुंगूं लागलीं. प्रत्येकानें दोन दोन तीन तीनवेळां त्याला हुंगलें; तरी त्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांत कांहीं तरी शोध असावा असा आह्मीं तर्क केला. आमच्या घ्राणेंद्रियांपेक्षां यांचीं घ्राणेंद्रियें फार तीक्ष्ण असत, हें आह्मी पूर्वीच अजमावलें होतें. हा प्राणी जसा दिसण्यांत परका दिसतो, तसा हा अन्य जातीचा आहे, असा त्या

मुलांनीं वासावरून सिद्धांत ठरविला, अशी त्या मुलांची दृष्टी दिसत होती. मानवी प्राणी नादी असून चौकस आहे, हा सिद्धांत आह्मांस बांधण्याकरितांच जणूं तीं मुलें त्याला प्रहरभर हुंगीत राहिलीं. शेवटीं एका मुलानें या नवीन पाहुण्यास चाटलें तें पाहून प्रहरभर चाटणें सुरू झालें. खाण्यापिण्याकरितां बाहेर जाण्याचें सुद्धां यांना सुचेना. सर्व मुलें त्याला चाटूं लागलीं. या मुलांत चाटणें हें प्रेम करणें मानलें जात असे, ह्मणून चाटणें एकमेकांत चालत असे. एकानें एकाला चाटलें ह्मणजे दुसरा पहिल्याला चाटी ह्मणजे प्रेमाचें उसणवाण परत करी; पण आह्मीं तयार केलेला मुलगा त्यांच्या दृष्टीनें तेथें मूर्ख ठरला. हीं मुलें त्याला चाटीत असून तो कोणासच चाटीना. त्याला तीं मुलें गलिच्छ वाटत किंवा उपकार परत करण्याचें ज्ञान नाहीं असें त्यांस वाटलें असावें.

कांहीं मुलें तर ह्याच्या तोंडाकडे पाहून आपल्यास चाटण्याबद्दल खुणा करीत. ह्या खुणा याला कळत ना! शेवटीं चार मुलें त्या एकावर तुटून पडलीं. दोघांनीं दोन हात धरले व एकानें त्याचे दोन्ही पाय धरले व एक मुलगा याचें तोंड उघडण्याचा यत्न करूं लागला. या मुलानें सुटण्याचा यत्न पुष्कळ केला; पण ह्या सशक्त मंडळीपुढें याचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं तोंड उघडून

त्यांनीं याची जीभ पाहिली, ती इतर मुलांच्या जिभेपेक्षां आंखूड होती असें त्यांस दिसलें. चाटून चाटून या नवीन वसाहतींतील मुलांच्या जिभा बऱ्याच लांब झाल्या होत्या. ह्या सहज हनवटीस व नाकास पोंचत असत. याची जीभ एका मुलानें हातांत धरून बाहेर ओढण्याचा यत्न केला, तेव्हां तो मोठ्यानें आक्राळविक्राळ ओरडला; त्याबरोबर त्याला धरलेली व जवळ असलेली मंडळी त्याला सोडून दूर पळाली. तें पाहून आमच्या जिवांत जीव आला कीं, हा मुलगा बरा आपल्या हातीं आला; नाहीं तर ही चावट मंडळी जिज्ञासेंतच त्याला ठार करतील. मंडळी दूर होतांच तो पळूं लागला, तो पार जंगलांत निघून गेला. व तेथून गुप्त मार्गानें तो दरींतील वाड्यांत दाखल झाला. त्या दिवशीं मुलांच्या निरनिराळ्या टोळ्या न बनतां एकच सर्वांची टोळी बाहेर पडली आणि सकाळचा खेळ खेळूं लागलीं. एकानें परकी मुलगा बनावें व दुसऱ्यांनीं त्याला हुंगावें व चाटावें. त्यानें स्वस्थ उभें रहावें. एकाद्यानें त्याची जीभ पहावी, हा यांचा एक खेळ झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो खेळ सुरू जाहला. ज्या मुलानें परकी मुलाचें सोंग घेतलें होतें, तो पळून गेला. पहिल्या दिवशीं परक्या मुलाचा पाठलाग झाला नाहीं; पण आज ही कल्पना त्या समाजांत येऊन

त्या मुलाचें मागें सर्व मुलें धावूं लागलीं. पुढें एकमेकापुढें एकमेकांनीं धांवण्याचाच क्रम सुरू झाला. धांवलेल्याला पकडणें हा एक त्या मुलांत पराक्रम ठरला. त्याचप्रमाणें पळणारानें दुसऱ्याचे हातीं लागूं नये, हाही पराक्रम असल्याचें त्या मुलांस भासूं लागलें. या मानी स्वभावानें या मंडळींत बरीच कल्पनाशक्ति व स्फूर्ति आली. पळणारीं मुलें झटदिशीं झाडाची फांदी धरून वर चढत व वांदरांसारखी झाडावर फिरत. कोणी निबीड झाडींत घुसत व लपून बसत. आणि संध्याकाळीं निराळ्या रस्त्यानें कोटांत सर्वांचे आधीं येऊन हजर होत. या पराक्रमाबद्दल त्याला इतर मुलें चाटून त्याची बहादुरी कबूल करीत. तरी पाठलाग करणारीं मुलें त्याचा पराक्रम पाहून खिजत व त्याचा द्वेष करीत. प्रसंगानुसार ज्या मुलांना पराजयी मुलें चावण्याचा यत्न करीत, त्या यत्नांतूनही तीं आपला बचाव करीत. या चढाओढीनें या समाजांत द्वेष वाढूं लागला. रोज दोघां तिघां व्यक्तींचें वैर उत्पन्न होई. व या द्वेषाचा जो सख्खा भाऊ सूड तो जागोजाग उभा राहूं लागला. जयी मुलांस नेहमीं सावध राहणें भाग पडे. जरा नजर चूक झाल्यास शत्रू येऊन त्यांना चावत, ओरबाडीत. रात्रंदिवस एकमेकांचा सूड उगविण्याची कल्पना समाजांत चालूं झाली. मुलें निजलीं असतां त्यां-

जवर शत्रूंची चाल होई. ज्याप्रमाणें घातक मंडळी जयी मुलांस त्रास देण्याचे विचार करीत, तशीं जयी मुलेंही त्यांच्या त्रासांतून सुटण्याविषयीं विचार करीत. दोघां जयी मुलांनीं झाडांवर निबिड रानांत रात्र क्रमण करण्यास सुरुवात केली. तीं दिवसा दूध पिण्यास कोटांत येत व बाकी सर्व दिवस रात्र बाहेर काढीत, हें पाहून बरीच मंडळी रात्रीं झाडावर राहूं लागली. कोटांतील संख्येचा ऱ्हास होत चालला. आठव्या रात्रीं कोटांत एकही मूल शिल्लक राहिलें नाहीं. संध्याकाळीं कांहीं मुलें कोटाजवळ हजर झालीं; पण आपले सौंगडे तेथें नाहींतसें पाहून तींही कोणीकडे गेलीं न कळे.

यांच्या कृतीचा बरोबर शोध लागणें आह्मांस आतां अवघड झालें. कोणी झाडांवर रात्र काढीत, कोणी झुडपांत काढीत, कोणीं गुहेंतही शिरलीं. फलहाराचे वेळीं सुद्धां मोठा जमाव दृष्टि पडेना. आणि जेथें जास्त जमाव होई तेथें सूड उगविण्याचा यत्न चाले आणि तंटे उद्भवत. शक्ति वाढली असून विशेष हत्यारांची कल्पना नसल्यामुळें खून झाले नाहींत. खुनी हत्यार कायतें तोंड, तें या प्राण्याचें लहान असून कोठें चावलें असतां शत्रू ठार होईल ही कल्पनाही कोणामध्यें आली नव्हती. शत्रूचा सूड उगविण्याकरितां कोणच्या तरी भागाला चावा घ्यावयाचा, व ज्याला एक चावला त्यानें

डोकें धरून आपल्यापासून दूर करणें हा प्रतिपक्षाचा प्रतिकार. या मुलांत मिसळल्याशिवाय यांच्या कृतीवर पहारा करतां येत नाहीं हें ठरलें. आह्मी ज्या जाळ्यांत किंवा झाडांवर बसून यांच्या खटपटी टेहळीत होतों, ते वृक्ष व डहाळ्या आणि जाळ्या यांनीं आपल्याशा केल्या. वाड्यांतल्या एका मुलावरील प्रसंग ऐकून या वनचरांचे हातीं आपले प्राण देण्याचें धाडस करण्यास वाड्यांतील मंडळी तयार होईना; तेव्हां एका झाडावर एकच मुलगा रात्रीं जाऊन निजत असे; त्याजवर हल्ला करून त्याला थोडें शिक्षण देऊन या मुलांत मिसळावा, या हेतूनें आह्मीं मध्यरात्रीं त्या झाडावर हल्ला केला. त्याला अंधेरांत कांहीं दिसेना; व आह्मी मोठमोठ्या बांबूच्या काठ्यांनीं त्याला ढोंसू लागलों. तो या फांदीवरून त्या फांदीवर जाई, त्या फांदीवरून या फांदीवर येई, असें तास दोन तास करून तो दमला; तेव्हां आमच्या बांबूंनीं आह्मीं त्यावर प्रहार केले. एक टोला कोठें जोराचा बसल्यानें तो बेशुद्ध होऊन खालीं पडला. खालीं पडतांच त्याला जखडून बांधून प्रेताप्रमाणें खाटेवर बांधून दरींतील वाड्यांत नेला. दरींत नेल्याबरोबर औषधोपचार सुरू केले. एका दिवसांत तो चांगला झाला. त्याचेवर तलवारीचा पहारा राही, व त्याला सर्व प्रकार दाखविण्यांत येत होते; भाषाही शिकविण्यास

सर्व माणसें सतत तयार असत. या मुलास सर्व हेतू क-ळविल्याशिवाय जंगलांत सोडणें नव्हतेंच. याचा आहार मात्र आह्मीं फळफळावळ व दूध ठेविला. अन्य पक्वान्नांची रुचि याला दाखविली नाहीं. चार दिवसांत हा माणसाळला. कोणी याला मारलें तरी चावण्याचा यत्न न करतां केविलवाणें तोंड करून स्वस्थ बसे. वाड्यांतील मंडळी याला चुचकारून जवळ बसवीत. कोणी चांगलीं फळें देत; तेव्हां हा त्यांचे हात मोठ्या प्रेमानें चाटी. एके दिवशीं एका दासीनें थट्टेनें एक लिंबू याचे हातीं दिलें; तें हातीं घेऊन ह्या दासीचा हात यानें चाटला; पण लिंबू खातांना आंबट लागलें ह्मणून फेंकून दिलें; पुढें त्या दासीचे हांतून तो कोणतेंच फळ ग्रहण करीत नसे. एका नौकरानें याला बागेंत हिंडवितांना एक लाल मिरची खाण्यास दिली, ती चावतांच याची जीभ भाजली, तेव्हां स्वारी चिडली, ह्या नौकरास चावूं लागली. नौकर याचें तोंड दूर करी, थपडा मारी, तरी त्याजवर हा हल्ला करण्यास भीत नाहींसा झाला. तेव्हां तो नौकर वाड्यांत येऊन ही हकीकत सांगूं लागला. आह्मीं काढण्या घेऊन चार मनुष्य त्याला कैद करण्यास पाठविले. हे मनुष्याजवळ जातांच त्यांस तो चाटूं लागला व बांधल्याशिवाय ते त्याला हातांत धरून वाड्यांत घेऊन आले. त्या नौकरास पाहून मात्र हा

थिरे. बाकी याची सतत शांत मुद्रा राही.

न जाणो हा कांहीं कोणाला उपद्रव करील, ह्मणून आह्मीं याला एका खोलींत बंद केला. जशीं हीं मुलें खोडकर तशीं आह्मी सुशिक्षित माणसेंही खोडकर आहों. जीं माणसें आह्मांबरोबर वाड्यांत रहात होतीं, त्यांना आमचे हेतू, मुलांची स्थिति माहीत असूनही त्यांस या मुलास चिडविण्याचा शौक वाटूं लागला. आह्मी जवळ नसल्यास वरांतील माणसें त्या खोलींत कोंडलेल्या मुलास मिरच्या दाखवीत; तें पाहून तो संतापे, ओरडे, आणि खिडकीचे गज चावी. तें पाहून ही मंडळी खीं खीं हासे आणि त्याला पुनः पुनः चिडवीत. हा प्रकार आमचे कानावर येतांच आह्मीं तिकडे पहारेकऱ्याशिवाय कोणी जाऊं नये, असा सक्त हुकूम फर्माविला. दोन तीन दिवसांत तो मुलगा निवळलासें दिसलें, तेव्हां त्याला पाय मोकळे करण्यास आह्मी नौकराबरोबर बागेंत फिरावयास पाठवूं लागलों. अकरा दिवसपर्यंत याचें खाणेंपिणें, उठणें, बसणें, निजेंसवरणें, ठीक चाललें होतें व नाना पदार्थांची ओळख करून त्यांचीं नांवेंही याला कळूं लागलीं होतीं. १२ वे दिवशीं संध्याकाळचे प्रहर दिवसास पहारेकऱ्यानें याला बागत नेलें व निरनिराळ्या झाडांची त्याला तो ओळख करून देत आहे; इतक्यांत या मुलानें दरीचे

बाहेरचा रस्ता पकडला आणि सुं पळत सुटला. मानवी प्राण्यालाचसें काय, सर्वांसच स्वातंत्र्य आणि स्वत्वर्गीय यांचें प्रेम असायाचेंच. त्याला जरी निजायास निवाऱ्याची जागा, खाण्यास उंची फळें मिळत होतीं, तरी तो या कैदेंतून आपण कसें सुटतों, या विचारांत आज अकरा दिवस होता. तो जरी इतर पदार्थ पाहिलेसे करी, तरी ज्या बाजूनें आपल्यास दरीचे बाहेर झाडींत जातां येईल, अशा रस्त्याचा निदान हा अकरा दिवस तरी शोध करीत असेल. हें कपट याला सुचलें नसतें; पण गोड पदार्थांची खूण सांगून ज्या याला मिरच्या व लिंबें खावयाला घातलीं, त्यावरून कपटाची कल्पना त्याला आली असावी. हा पळतांच शिपायानें ओरड केली. आह्मी दहा इसम धनुष्यें घेऊन त्याचे मागें लागलों. तो मागें पाही व पुढें पळे. आमच्या दृष्टीआड झाल्यावर तो सांपडणार नाहीं, ह्मणून आह्मी दरीचे चोहोंबाजूस धावलों. तों तो झाडावर चढतांना एकाचे दृष्टीस पडला. त्या झाडाला आह्मीं वेढा दिला, तें पाहून तो वांदराप्रमाणें एका झाडावरून दुसऱ्यावर व दुसऱ्यावरून तिसऱ्यावर जाऊं लागला. याचे पाय फांदी धरण्यास असमर्थ असल्यामुळें वांदरांइतकी सफाईदार उडी याला मारतां येईना, तरी गर्द झाडींत जाऊन हा जर दिसेनासा झाला, तर आपण अमुक दरींत आहों वगैरे मजकूर

आपल्या सोबत्यांस समजावील आणि आपल्या हेतूस धक्का पोंहचवील; ह्मणून आम्ही याला काठ्यांनीं ढोसूं लागलों, त्याला काठ्यांपासून इजा होई; पण झाडाच्या फांदीची आपली मिठी सोडीना, तेव्हां विशेष इजा न पोहोंचे, अशा हलक्या हातानें आजवर आम्ही बाण सोडूं लागलों. आमचा बहुतेक नेम कंबरेखालच्या भागावर होता. ढुंगण व पाय बाणांनीं रक्तबंबाळ झाले, तरी तो फांदी सोडीना. फांदीला कडकडून चावे व ओरडे. शेवटीं एक मनुष्य आम्हीं त्या वृक्षावर चढविला. मुलाला हालतां येऊं नये अशा बेतानें चोहोंकडून त्याला भाले टोंचून धरले होते. मनुष्य वर चढून त्यानें मुलाच्या गळ्याभोंवतें धोतर टाकून त्याला जखडलें. दुसऱ्या धोतरानें त्याची कंबर कसली आणि मग फांदीपासून बोटें सोडविलीं यावेळीं त्यानें चावण्याचा यत्न केला नाहीं, चकार शब्द बोलला नाहीं, ओरडला नाहीं, कांहीं केलें नाहीं, अगदीं वरमल्यासारखा दिसत होता. त्याला कंबरेचें बंधन हातांत धरून वरच्या मनुष्यानें अस्ते खालीं सोडला. खालीं आल्यावर मंडळीनें त्याला खाटेवर आंवळून घरीं आणला. घरीं आणतांच प्रथम लोखंडी बेडी पायांत अडकविली आणि मागून औषधोपचार सुरूं केले.

आह्मीं जे दोन यत्न या मुलांत मिसळण्याचे केले,

ते दोन्ही निर्फळ झाले. आमच्या मुलांस ते जंगली मुलगे आपल्या मेळांत घेत नाहींत व तिकडील मुलगा सुखानें आमचें शिक्षण घेत नाहीं. हे यत्न निष्फळ झाल्यानें सर्व इत्थंभूत बातम्या जरी हल्लीं आह्मांस मिळत नाहींत, तरी मोठ्या युक्तीनें आह्मी त्या मुला-च्या कृति अवलोकन करीत असतों.

वस्तींत जो मुलगा आला, त्या मुलास कांहीं मुलें रोज शोधीत होतीं. जे त्याचे शत्रु (पाठलाग करणारे) होते, त्यांचाही यत्न त्याला शोधून काढण्याचा चालला होता व जे त्याची बहादुरी कबूल करणारे होते, तेही त्याला शोधीत. या जिज्ञासेनें यांनीं तें बेट सर्व शोधून पाहिलें. समुद्र कांठापर्यंत मुलें पोंचलीं. त्यांना वाळूच्या मैदानांत धांवणें आवडे. तें धांवणें होई तरी मुख्य कर्तव्य मुलगा शोधण्याचें कोणीं विसरलीं नाहींत. आमच्या दरीकडेही कित्येक टोळ्या आल्या; पण दरींत शिरण्याची वाट आह्मी उघडी ठेवीत नसो. एका बोग-द्यांत अंधेरांत जो दरवाजा होता, तो कामाशिवाय उघ-डला जात नसे; तेथपर्यंत मंडळी आल्याचा सुगावा लागला. या शोधांत त्या मुलांस अनेक शोध लागले. समुद्र दृष्टीस पडला, सूर्याचा उदय व अस्त दिसला, गुहेकडे जाळी दिसल्या, नानाप्रकारचे लहान लहान सर्पटणार प्राणी व ससे वगैरे चतुष्पाद प्राणी या मंड-

ळीस दृष्टीस पडले. यांच्या कोटापासून समुद्र फार दूर होता व रस्ता नियमित झाला नव्हता, यामुळें समुद्रापासून कोटापर्यंत येणें यांना महत्वाचा प्रवास होता. पूर्व पश्चिम धांवतां धांवतां नशीबानुसार कोट मिळाला तर भाग्य; नाहीं तर कोण्या वृक्षावर रात्र काढावी लागे. या चुकामुकींत ही मंडळी बरीच फुटली. समुद्रावर किंवा कोटांत जेव्हां एकमेकांच्या भेटी होत, तेव्हां त्यांस शत्रुभाव बिलकूल न रहातां तीं मोठ्या प्रेमानें एकमेकांस चाटीत व आपण मोठीं पराक्रमी माणसें आहोंत, असें त्यांस वाटे. निरनिराळ्या वेळेस निरनिराळीं माणसें कोटांत येत, पण आपल्याशिवाय अन्यांस कोटाचा शोध लागला असेल अशी कल्पना त्यांस होत नसे. कोणी कोणी मोठ्या मानी स्वभावानें कोटाची मालकी आपणाकडे घेऊन कोटाच्या भिंतीवरून फिरत व कोण मूल कोठें दिसतें कीं नाहीं, याची पाहणी करीत. कोणी कोटांत रात्रही काढीत. जसा हा मुलगा हरवला तसा दुसराही एक याच्या शोधास ह्मणून जो गेला, त्याचा सुमारें १७।१८ दिवस पत्ता नव्हता. त्याला समुद्र सांपडला नाहीं व कोटही सांपडला नाहीं. त्याचाही शोध मंडळीनें चालविलाच असावा, असें मागून आमचे लक्षांत आलें. त्या मुलानें झाडपाल्यावर निर्वाह केला. त्याला दूध तर मुळींच मिळालें नाहीं.

दोन दोन तीन तीन दिवस दुधाशिवाय रहाणारीं तर सगळींच मुलें होतीं. अठरा दिवसांचा निराहारी हा एकच होता. तो कोटांत येतांच यथेच्छ दूध पिऊन समाधान पावला. कोट सांपडल्याचा व क्षुधा तृप्त झाल्याचा तर त्याला आनंद झालाच, पण ओसाड पाहून त्याला बरें वाटेना. तो कोटाचे आसपास फिरला, अंधेऱ्या जागा हुंगल्या, पण मानवीवास त्याला आला नाहीं. कांहीं वेळानें एक मुलगी कोटांत आली, तिला पाहून त्याला अत्यानंद झाला, दोघांनीं एकमेकांस चाटलें; इतकें होतें तों पांच जणांची टोळी झाडींतून येत आहे असें या उभयतांचे दृष्टीस पडलें. दृष्टादृष्ट होतांच हें दंपत्य बाहेर पडलें व तीं पांच यांजकडे धांवलीं. सगळ्यांनीं एकमेकांस चाटलें आणि सगळीं कोटांत आलीं. आणि तेथें दुधाची मेजवानी उडाली. आजपर्यंत आपापल्या पोटाची काळजी होती; पण आज असा चमत्कार पाहण्यांत आला कीं, जो तो त्या १८ दिवसांच्या उपाशास द्रोण भरून देई. तो त्यांचे तोंडास लावी. आपलें पोट भरल्याची खूण करी, तरी त्याला एक द्रोण दूध पाजून मग इतरांनीं घेतलें. तेथें या मंडळीस समाजत्व आलेसें दिसतें. विशेष गोष्टी बोलण्यास त्यांस जरी भाषा नव्हती, तरी बाकी मंडळी कोठें आहे, आपल्यास पूर्व मुलें भेटतील कीं नाहीं,

सर्वांचें प्रेम आपल्यावर आहे कीं नाहीं, अशा आशयाच्या खुणा व उच्चार त्यानें केले व त्याला उत्तरेंही मिळाली. उत्तरें देतांना एका मुलीनें सांगितलें कीं, एक मोठा मंमचा समुद्र आहे, पण तें पिण्याचे उपयोगीं नाहीं. प्यालें असतां उलटी होते, त्याची वाट मला ठाऊक आहे. तेथें सर्व मंडळी खेळत बागडत असते; आपण तेथें जाऊन त्यांस भेटूं.

चुकलेला मुलगा रानांत फिरत असतां शोध लागलेल्या रस्त्यावर पुनः पुनः येई. अशानें कोटाचा शोध लागणार नाहीं; आलेल्या जागेवर पुनः येऊं नये ह्मणून तो जागोजाग झाडांचीं पानें किंवा फांद्या मोडून टाकी. ही कल्पना त्याला सुचली ह्मणून तो जयी झाला. हीं सर्व मुलें समुद्राकडे निघालीं; तेव्हां त्यानें फांद्या मोडून वाटेंत टाकण्याचा क्रम सुरू केला. तें पाहून अन्य मुलेंही तो प्रकार करूं लागलीं. अर्थ कोणास कळला नसेल पण अनुकरण. या अनुकरणानें समुद्रावरून परत येण्यास मार्ग शोधीत राहण्यांत काळ घालविण्याची जरूर नाहीं. आलेल्या वाटेनें परत जातां येतें, हा तर्क इतरांस नव्हता. हा फांद्या मोडतो ह्मणून इतर मोडीत. हा समुदाय समुद्रावर पोहोंचतांच सर्वांना आनंदी आनंद झाला. चुकलेल्या मुलाचा त्यांच्या रीतीप्रमाणें सत्कार झाला आणि " तूं कोठें होतास,

दुसरा एक चुकलेला मुलगा तुला कधीं कोठें भेटला काय? " वगैरे खुणा झाल्या. त्यानें हाताच्या खुणेनें लांब लांब जिकडून सूर्य उगवतो तिकडे अशा खुणा केल्या. खरोखर हा कोटापासून कोस सवाकोसावर कोठें चक्रांत पडला होता; पण त्याचा तो १८ दिवसांचा प्रवास झाला. ही मंडळी सर्व बरोबर निघाली ती पाला टाकलेल्या रस्त्यानें परत आली. आतां पाला कां रस्त्यावर टाकला याचें ज्ञान सर्वांस कोणी न सांगतां झालें. आतां समुद्राचा रस्ता जवळ असेल असा तर्क करून कांहीं मुलांनीं निरनिराळे रस्ते या युक्तिनें शोधून काढले. जो विशेष जवळचासा वाटला तोच हमरस्ता होऊन त्याची मळणी झाली.

या नव्या वस्तीकरितां जे अनेक वृक्ष आम्हीं लावून ठेविले होते, ते बहुतेक या सुमारास फळभारांनीं ओथंबले होते. साधारण फळें तर हीं मुलें खाऊं लागलीं. मिरच्या, मिरीं, हिरडा वगैरे मृदु व बदाम नारळ वगैरे कठीण कंवचीचीं फळें मात्र या मुलांस खातां येत नसत. मिरच्या, मिऱ्यें, लिंबें, हीं अन्य पदार्थांशीं मिश्रण करण्याचें यांस ज्ञान नसून तीं नुसतीं खाण्यास माणसांची जीभ व कोठा अद्याप तयार झाला नाहीं. हिरडा जात्या तुरट अरुचिकर असल्यामुळें तो खाल्ला जात नसे. हें ज्ञान अनुकरणाचें नसून स्वाभाविक आहे. मूल

उपजतांच त्याचे तोंडात एरंडेलाचें बोट घालून तें चाटविण्याचा कित्येकांस सांप्रदाय आहे. तें मूल एरंडेल जिभेस लागतांच तोंड वाईट करतें; पण मधाचें बोट चाटविल्यास तें खुषीनें चाटतें, यावरून हिरडा, कवंडळ काजरा वगैरे अरुचिकर पदार्थ मुलें खात नाहींत हा चमत्कार नव्हे. भुंग्यांनीं कोरून जे कोंवळे नारळ झाडांखालीं पडले असत, ते हीं मुलें दातांनीं पोखरून कांहीं काथ्या कांहीं साल खात; पण पक्क होऊन पडलेले नारळ झाडांखालीं जसेचे तसे पडून रहात. त्यांची कवटी कठीण व काथ्या बेचव व कठीण झाल्यामुळें यांस त्यांची रुचि नसे. एके दिवशीं आमचे पहाण्यांत असें आलें कीं, एका तळ्याचें कांठीं सर्व मुलें एकत्र जमून नारळाच्या कोंबावर हल्ला केला आहे. या तळ्याचे कांठीं जीं झाडें होतीं, त्यांचे नारळ बहुतेक पाण्यांत पडत व ते तळ्याचे काठाशीं लागत. त्या नारळांतून करटी फोडून बाहेर आलेले मोडही मंडळी मोठ्या आवडीनें खाऊं लागली. हा चमत्कार पाहिल्या दिवसापासून दुधाची पर्वा ही मंडळी बिलकूल करीत नाहींसें आमच्या दृष्टीस पडलें; ह्मणून आम्हीं कोटांत दूध पाठविण्याचें बंद केलें. ज्या मुलांस हे कोंब मिळेनात; तीं दुधाची अपेक्षा करून कोटांत येत; पण त्यांना दुधाचा सुगावा लागेना. ज्या नारळांतून कोंब बाहेर

फुटला नाहीं. असे नारळही हीं मुलें दातांनीं सोलूं लागलीं. सोलून झाल्यावर नारळाचा मृदु डोळा ओळखून त्यांत दांत खुपसण्याचा यत्न झाला व तो सफलही ठरला. त्या डोळ्यावाटें आलेलें पाणी पिऊन बाकी नारळ प्रथम यांनीं फेंकून दिले. असे शेंकडों फेंकलेले नारळ कुजून गेले. कोंब यऊं लागणाऱ्या नारळांतील पाणी आटून जातें. कोठें पळीभर निघालें तर नशीब; पण तेवढ्यासाठीं सर्व एवढा नारळ सोलण्याचे श्रम तीं मुलें करीत; कारण पुढची साधक अक्कल त्यांना आली नव्हती. एके दिवशीं चार मुली नारळ सोलण्यांत निमग्न दिसल्या. त्यांना तीन चार दिवसांत कोंबाचा नारळ बिलकूल आढळला नाहीं. त्यांनीं तळावाचे बुडापर्यंत जाऊन पाहिलें. शेवटीं नारळ सोलण्याकडे त्यांचे चित्त लागलें. सकाळपासून एकेकीनें दहा दहा बारा बारा नारळ सोलून टाकले; पण पोट भरलें नाहीं. एका मुलीनें नारळांत पाणी मिळत नाहीं म्हणून रागानें म्हणा किंवा साहजीक रित्या म्हणा असा सोललेला नारळ एका दगडावर फेंकला. तो दगडावर जोरानें पडतांच फुटून त्याचे तीन चार तुकडे उडाले. ते तिनें घेऊन चाटले आणि नंतर दांतांनीं खोबरें खाल्लें तें पाहून त्या सर्व मुलींनीं फेंकलेले नारळ त्याच दगडावर आपटले आणि येथेच खोबरें खाल्लें. आणि तो चम-

त्कार त्या मुली सर्व मुलांस करून दाखवूं लागल्या. ही पालनांची युक्ति निघाली; पण या युक्तिचें पेटंट मिळविण्याची किंवा कल्पना गुप्त ठेवण्याची त्या मुलीस इच्छा झाली नाहीं. आतां एकाद्याला एकादें औषध माहीत असल्यास तें दुसऱ्यास तो मरेपर्यंत न सांगण्याचा यत्न करतो. असा स्वभाव या मुलांत आला नसल्यामुळें एका ठिकाणीं उत्पन्न झालेल्या ज्ञानाचा प्रसार सर्वत्र एका दिवसांत होई. आतां तळ्याचे कांठाशीं यांचा संबंध राहिला नाहीं. तीं पाहिजे त्या झाडाखालचा नारळ सोलून त्याचा डोळा फोडून आधीं पाणी पीत आणि नंतर तो नारळ फोडून खोबरें खात. हीं नुसत्या खोबऱ्याच्या रुचीनें तृप्त होत नसून इतर फळफळावळ, झाडांच्या कोंवळ्या ढिऱ्या व कोंवळीं पानेंही खात. नारळ फोडण्यांत मंडळी दिवसेंदिवस प्रवीण होत चालली. नारळीवर चढून नारळ काढावे, वरच्यावर सोलावे, आणि खालीं दगडावर टाकून द्यावे.

नारळीच्या कोंबाप्रमाणें अन्य वनस्पति हीं कोंब फुटतांना किंवा दोन पानाचें रोप दृष्टीस पडल्यास ही मंडळी खाऊन टाकी. उन्हाळ्यांत नुसते आंबे खात; पण मृगाचा पाऊस पडल्यानंतर फेंकून दिलेल्या कोयांस मोड फुटले कीं यांची मेजवानी सुरू होई. हे मोड व कोया फस्त पडत, तों पावसाळचीं फळें व पाले यांस खाण्यास

योग्य होत. आतां कोटांत येण्याचा यांना बिलकूल संबंध राहिला नाहीं. हीं माणसें केवळ वनचरें बनलीं. पहिल्यापेक्षां वाढीचें व शक्तीचें प्रमाण मात्र यांचें कमी झालें. प्रथम दुधासारखा पौष्टीक पदार्थ पोटभर मिळत असून काळजी बिलकुल नव्हती. अजून संग्रहाचें ज्ञान जरी यांस आलें नव्हतें तरी उद्या चांगले मोड, नारळ किंवा मिष्ट फळें मिळतील कीं नाहीं, आपण सकाळीं इतर मुलांच्या आधी उठावें आणि फळ फळावळीच्या मागें लागावें असा प्रत्येक जण विचार करीत असावा असें आह्मीं अनुमान बांधलें. कित्येक मुलें निवाऱ्याच्या जाग्याची सोय फळझाडांवर करीत, पावसाळ्याच्या किंवा उन्हाळ्याच्या निवारणार्थ त्यांनीं एकच सोय केली नसून पावसाळ्यांत हीं पर्वताच्या गुहा, वृक्षांच्या मोठमोठ्या ढोली वगैरेंचा आश्रय घेत. उन्हाळ्यांत नदी तलावांचे काठीं गार झाडीचा आश्रय करीत. व हिंवाळ्यांत बहुतकरून समुद्रकांठच्या सुरुया वाळूवर पडून रहात. केव्हां केव्हां कोणी कोणी मुलें आंगावर वाळू घेऊन तोंड उघडें ठेऊन आपल्यास रात्रभर वाळूंत पुरल्यासारखें निजत; आणि थंडींत कांहीं मुलें एकमेकांस चिकटूनही निजत. या स्थितींत त्यांचे केंस कातरण्यास त्यांजपाशीं पोंचावें अशी आमची स्थिति नव्हती, यामुळें त्यांचे केंस तोंडावर येऊं लागले. ते

तोंडावर वारंवार येऊं नयेत ह्मणून कांहीं मुलें त्यांना समुद्राचें पाणी लावून ओले करीत, कोणी गोडें पाणीही लाऊन त्यांना मागें टाकीत. तेणेंकरून बारीक फळें पाहण्यास त्यांस अडचण पडत नसे. व हातांस ही केंस संभाळण्यापासून मोकळीक असे. सर्वांचें केंस बहुतकरून गुंतुन जटा बनले होते. तरी जी विशेष स्वच्छ मुलें होतीं तीं आंब्यादिफळांचा रस केंसांस लावीत नसत आणि ज्यांना स्वच्छतेची चाड नाहीं अशीं मुलें फळें खातां खातां त्यांचा रस केंसांस ओलावा येऊन ते मागें सारतां यावे, ह्मणून लावीत. ते अन्न सामग्री मिळविण्यापूर्वी चेहेरेपट्टी करण्यास समुद्रावर किंवा तळावावर जात नसत. स्वच्छता ठेवणारीं मुलें आपले डोळ्यावर येणारे केंस लांब असल्यास त्यांस गांठीही मारीत, त्या एकाच प्रमाणानें नाहीं. कोणाच्या कपाळावर २ गांठी तर कोणाच्या कपाळावर दहा पंधराही असत.

ज्याचे त्याचे हक्क रक्षण करणारी संस्था उभारली नव्हती, तरी यांच्यामध्यें साधक तत्व स्वाभावीक जागृत होतें असें दिसलें. नारळाच्या झाडावर बसून एकजण नारळ सोलीत असतां दुसरें मूल झाडाखालीं असल्याचे पुष्कळ प्रसंग येत. केव्हां केव्हां वरील मुलानें वरून नारळ खालीं टाकून तो फुटला आणि दुसरें मूल त्या नारळा जवळ असलें तर तें त्या नारळास हात

लावीत नसे. हा प्रकार माकडांत ही आढळतो. झाडावरच्या माकडानें तोडून टाकलेलीं फळें खालील माकडें सहसा ग्रहण करीत नाहींत (आतांच्या प्रजेस राजसंस्था व धर्म संस्था सांभाळीत असून आपापले हक्क रक्षण करण्याचीं तत्वें कळत नाहींतशीं झालीं आहेत. हेंच समाजाचें क्षीणत्व.)

हीं माणसें आतां सर्व बेटावर फिरून आपलें भक्ष्य मिळविण्यांत प्रवीण झालीं. झाडांच्या कोंवळ्या डिऱ्या व लहान रोपे शोधण्यांत यांचा बहुतेक काळ खर्चीं पडे, दुपारचे वेळीं तळ्याचे कांठी किंवा नाल्याचेकांठीं यांची जमात जमे. तेव्हां एकमेकांच्या डोक्यांतील उवा मारीत, फार वाढणारे एकमेकांचे केंस दातांनीं कुरतडीत व एकमेकांस चाटीत. या चाटण्या पासून एकमेकांचे प्रेम दृष्टीस पडे. विशेषतः एकमेकांना चाटणारी माणसें एकत्र बसत; केव्हां केव्हां एकाला दुसरें, दुसऱ्याला तिसरें, तिसऱ्याला चौथें याप्रमाणें एकदम सहापर्यंत माणसांचें चाटणें चाले. एकाला एक चाटीत असतां मध्येंच दुसरा घुसला तर ज्याला चाटलें जाई तो ह्या शत्रूवर चढाई करी ह्मणजे चावे.

या मुलांचें वय या वेळीं २२।२३ वर्षांचें झालें असून स्त्रिपुरुषाचा संग झालेला कोठें आढळला नाहीं, किंवा प्रजोत्पत्तीही झाली नाहीं. या बेटावर वानर मा-

कडे व उघडच्या जागेवर संग करणारीं जनावरें नसल्यामुळें यांना त्या गोष्टीचें अनुकरणच करतां आलें नाहीं. कांहीं कांहीं मुलींना नुकतें कचित् रजोदर्शन झालेलें आढळे. एकमेकांची आंगे हीं मुलें चाटीत तरी रजोदर्शनाचा रक्तस्राव मांडीवरून ओघळ गेलेला चाटीत नसत. बहुतकरून त्या रक्ताची त्यांना घाण येत असावी. उन्हाळ्यांत मांडीवरील ओंघळ ती तळ्यांत धुवीत ; पण हिंवाळ्यांत हे ओघळ पायांवर पावलांपर्यंत पोंचत. संगाचें ज्ञान न झाल्यास यांना एकवेळ ती गोष्ट दाखवायाची आमचें कर्तव्य खरें ; तरी तिसावे वर्षापर्यंत त्यांना तो कित्ता घालून द्यावयाचा नाहीं असा आह्मीं ठराव केला होता. ही वेळ मुलांच्या कृतीवर विशेष लक्ष्य देण्याची होती ; ह्मणून आह्मी जागोजाग लपून यांना पहात होतों. एके दिवशीं दुपारीं एक मुलगी दुसऱ्या मुलीस चाटीत असतां ती तिचें जननेंद्रिय चाटूं लागली ; जसजशी जीभ जननेंद्रियांत जाई तसतशी चाटून घेणारी मुलगी जास्त सुखी व प्रेमांत आल्याचें दिसे. आठ दिवसांत जननेंद्रिय चाटण्याचा व चाटून घेण्याचा षौक इतका वाढला कीं खाण्या पिण्यापासून फुरसत मिळतांच कोठें तरी द्वंद्व दृष्टीस पडे ; मग ते पुरुष पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत किंवा स्त्रीपुरुषें असोत. एकमेकांचीं इंद्रियें एकमेकांनीं चाटा-

वीं. आतां इतर भागांचें चाटणें कमी झालें. एकमेकांचें विशेष सरुय इंद्रिय चाटण्यांत आलें. ही गोष्ट संगाचे जवळ जवळ येऊन पोंहचली. एक स्त्री व एक पुरुष एकमेकांची अशी सेवा करीत असतां एके दिवशीं त्यांना सुख पावणारी एकमेकांचीं इंद्रियें भेटविण्याची इच्छा उत्पन्न होऊन त्यांनीं ती गोष्ट दुपारचेवेळीं एका झाडाखालीं केली. दोघांना अत्यंत सुख झालें. पुरुषाचें इंद्रिय चाटलें असतां ताठ होई तो सुखाचा प्रकार सर्व समाजांत जारीनें सुरू झाला.

आपण शंका घ्याल कीं, जी गोष्ट पशुपक्ष्यांत व वनस्पतींत आहे तें ज्ञान अनादि असलें पाहिजे. त्या शिवाय सृष्टि चालली नसती. पण वास्तविक तशी गोष्ट नाहीं. कार्याची उपयुक्तता साधक तत्वानें होते. नाहीं तर इंद्रिय तोंडांत घेऊनही निरुपयोगीं सुख होतें. या मुलांच्या जिभा चाटून चाटून बऱ्याच लांब झाल्या असल्यामुळें इंद्रियापासून होणारें सुख जिभेनें होत असावें असा आमचा तर्क आहे. योग्य संगज्ञान झाल्यानें आमची एक काळजी दूर झाली ; पण दुसरी तात्काल उपस्थित झाली. हीं मुलें लग्न केल्याशिवाय स्त्रीपुरुषें वाटलीं गेलीं, पहावें तिकडे विजातातीय जोडपें. खाणें पिणें झालें कीं मैथून सुरू होई; यायोगें ही प्रजा क्षीण दिसूं लागली. अमुक पुरुष जवळ करावा असें

नसे; पण स्त्रीचा ओढा कोणा तरी पुरुषाकडे व पुरुषाचा ओढा कोणा तरी स्त्रीकडे असे. कोठें नर पाहिला कीं आसपास कोठें तरी मादी आहे असें खात्रीनें सांगतां येई. खाण्या पिण्याचे पदार्थ मिळविण्यांत हीं माणसें फार निमग्न झालीं. एकमेकांस केव्हां केव्हां फळफळावळ जास्त झाल्यास देत असत. जनावरांस ज्ञान असतें कीं, गर्भ धारण झाल्यावर संग करायाचा नाहीं, तें ज्ञान या नरपशूंत नसून यांना तो नाद लागला. व अहोरात्र यांचा तो खेळ सुरू झाला. मनुष्य प्राण्याची प्रवृत्ति जिकडे होईल तिकडे तो त्या नादांत रहातो ह्मणून राष्ट्रांची उन्नति किंवा अवनति होते. जिभेचा प्रयोग सुरू होतांच आठ चार दिवसांच्या आंत सर्व स्त्रिया ऋतुस्नात झाल्या व त्या सुमारानें सर्वांनीं गर्भधारण केलें. पुरुषांचा वांझपणा आमचे दृष्टीस पडण्याचा मार्ग नव्हता; पण स्त्री एकही वांझ निघाली नाहीं. योग्य काळीं गर्भधारण झाल्यानें गर्भ सदृढ होतो. नऊ महिने पुरे होतांच जंगलभर जिकडे तिकडे मंगलध्वनी ऐकूं येऊं लागला. मुलें जागोजाग टें टें करताहेत व त्यांचें सांगोपन योग्य रीतीनें एकेक जोडपें करीत आहे. पोरांना चाटण्यास कोणीही पुरुष हजर असत, स्त्रिया मात्र दुसऱ्या स्त्रियांचीं पोरें चाटण्यास मनापासून चहात असत. हीं मुलें त्यांनीं पोटाशीं धरून आपल्या भक्ष्या-

करितां वनांत हिंडावें. तेथें बाळंतपण कसचें आणि काय कसचें. उराशीं पोर धरतांच त्यांना पान्हा फुटे व तीं पोरें स्तनपान करण्यांत रडें विसरत. मुलें जमिनीवर ठेवलेलीं क्वचित् आढळत. स्त्रिया करवंदीच्या जाळीकडे गेल्यास मुलांस कांटें न लागण्याविषयीं जपत. पुरुषांनीं जरी मुलांवर किती प्रेम केलें तरी त्यांच्या आया आपापलीं मुलें आपल्या दृष्टीआड होऊं देत नसत. आतां यांना मुलांचा छंद लागला. व्यभिचाराचा छंद कमी झाला. कोण्या स्त्रीपाशीं कोणी पुरुष येऊन तो तिला चाटूं लागला तर ती त्याला लाथा मारी, त्या तो सहन करून चालता होई. कोणी पुरुषानें येऊन मूल चाटल्यास ती त्या पुरुषास चाटी. त्यायोगें स्त्रियांचें प्रेम आपल्यावर असावें म्हणून हिकमती पुरुष स्त्रियांकडे जाऊन पोरें चाटीत. झाडांखालीं समुद्रांतील वाळू आंथरून त्या वाळूवर रात्रीं पोरांस ठेवून त्यांचेजवळ आया निजत, पोर रडूं लागलें कीं, स्तनपान देत. पोरांच्या सोईची कल्पना बिछाना निघाली, ज्या त्या झाडाखालीं वाळू पडलेली आढळे, व त्या वाळूवर पोरांनीं मलमूत्र विसर्जन केलेलें पाहण्यांत येई. मलमूत्रानें जो बिछाना खराब झाला त्याचा उपयोग तीं दुसऱ्या रात्रीं न करितां पुन्हां नवा बिछाना करीत. बिछान्याविषयीं त्यांना दारिद्य नव्हतें रत्नाकरपंत (समुद्र) या

मुलांचा लाडका मामा होता. त्यानें विपूल आंथरुणें तयार करून ठेविलीं होतीं. त्याप्रमाणें मुलांचें पालन आणि पोटाचा धंदा एकदम सुरू झाला. कित्येक स्त्रियांना मुलाला पुरून उरे इतकें दूध येई, तें कोणीतरी पुरुष जो मुलास चाटी त्याला पाजलें जाई. ज्या ज्या पुरुषांना स्त्रियांचें दूध मिळे तें त्या स्त्रीला खाण्यास योग्य असे पदार्थ आणून देत. चांगला नारळ मिळाला तर तो आपण न खातां दुधाळ स्त्रीस अर्पण करणारे पुरुष आमचे पाहण्यांत अनेक आले. मुलें उप जल्यावर स्त्रियांस नारळीचे झाडावर चढणें कंटाळवाणें वाटे. केव्हां केव्हां मुलांना बगलेंत मारून कांहीं स्त्रियांनीं इतर झाडांवर चढण्याचे यत्न केले, व ते त्यांचे सफलही-झाले, पण नारळीच्या झाडाकडे पुत्रवंती, बिलकुल वळली नाहीं. मुलगे किती झाले व मुली किती झाल्या, याचा बरोबर शोध लागेना तरी मुलांचीं संख्या मुलींपेक्षां या खेपेस जास्त झाली असावी असा आमचा अजमास आहे.

आमच्या या नवीन वसाहतीनें आपल्या भाषेला तीन चारच शब्द नवीन जोडले. ईश्वरी तत्वाविषयींची कल्पना यांना अद्याप ज्ञाहली नाहीं. नर कपालावर प्रेम वाढून ईश्वर कल्पना तेथून सुरू होईल असें दिसलें होतें खरें ; पण वसाहतीच्या स्थित्यंतरामुळें नरकपा-लाची कोणालाच आठवण नव्हती असें दिसलें. नरकपा-

लही आमच्या पाहण्यांत येत नसे. एका देवेळीं मंडळीनें तें कोठें समुद्रांत फेकून दिलें असेल किंवा कोठें पुरूनही ठेवलें असेल. जीं मुलें पूर्वी आयतें अन्न खात होतीं, तीं स्वपराक्रमानें मिळवूं लागलीं व त्यांचा खर्च दीडपट वाढला असूनही त्यांनीं तो मोठ्या संतोषानें चालविला आहे. मुलांच्या बिछान्यांकरितां वाळू आणून आंथरणें, सर्व सामान्य झालें एवढेंच नव्हे, तर स्वतःला बसण्याकरितां गुहांत व झाडांखालीं मंडळी वाळू आंथरीत असे. ही वाळू फक्त ओंजळीनें आणावी लागे, किंवा मुठी भरून आणीत. या बिछान्यांवर एकजातीय माणसें बसल्यास तेथें कज्जा होई, पण पुरुषानें आंथरलेल्या बिछान्यावर स्त्री येऊन बसली किंवा स्त्रीनें आंथरलेल्या बिछान्यावर पुरुष बसला तर विशेष तक्रारी होत नसत.

येथें स्वकष्टाचा अभिमान प्राप्त झाला. स्वकष्टार्जित संपत्तीवर आपली मालकी असावी असा या लोकांचा ग्रह झालासें दिसतें. खाणें मिळविण्यांत वेळ जाऊन जो वेळ शिल्लक राही त्या वेळांत ही मंडळी वाळू आणी. एका खेपेंत जास्त वाळू हातावरून आणण्याची प्रत्येकास इच्छा होती तरी कल्पना बरेच दिवस कोणाच्या डोक्यांत आली नाहीं. एके दिवशीं एका स्त्रीनें समुद्राचे कांठची ओली वाळू जमा करावी आणि तिचे लाडू बनवावे व तीन चार शेरांचा एकेक किंवा दोन

दोन लाडू हातांवरून घेऊन जावे व झाडाखालीं नेऊन त्यांना फोडावे. वाळूंतील पाणी सुकून गेलें ह्मणजे झालें. थोडी ओलसर वाळूही कुपथ्य आहे असें त्यांस वाटत नसे. ही कल्पना निघतांच पूर्वीपेक्षां या मंडळीचे बिछाने जास्त जाड झाले व लहानथोरांस त्यांचा उपयोग होऊं लागला. या जाड बिछान्यांवर मुलें निजविलीं असतां तीं उपडीं होत व वाळू त्यांचे तोंडांत जाई. नाका डोळ्यांतही वाळू जाऊन पोरें ओरडत. त्यांच्या डोळयांतील वाळू मुलांच्या आया जिभेनें बाहेर काढीत, मुंगी किंवा बारीक प्राणी पोरांस चावला तर त्या जागेवर आपल्या मृदु जिभेनें चाटणें हेंच औषध होतें. चाटल्यानें विष उतरतें, गोंजारलें जातें, आणि मायाळू मनुष्याचें विशेष सानिध्य होतें ह्मणून मानसिक व शारिरिक इलाज एका कृतींत होतो. औषधामध्यें उंची औषध हेंच आहे आणि त्याचा शोध साहजिक प्रेमोद्भवानें लागला. मुलांच्या नाका तोंडांत वाळू न जावी ह्मणून वाळूवर मुलांचे डोक्यांखालीं चवीणीचीं, कर्दळीचीं, व इतर पानें घालण्याची युक्ति निघाली. जिकडे तिकडे तो प्रकार सुरू झाला. पान फाटलें ह्मणजे दुसरें घालावे लागेल ह्मणून जास्त ओलीं पानें माता पितरें आपापल्या डोक्यांखालीं गुंडाळी करून ठेवीत. व फाटलेलीं पानें काढून धड पानें मुलांखालीं घालीत. येथें

मानवी प्राण्याला उशीची संवय लागली. हीं पानें डोक्याखालून सरकत तेव्हां तेव्हां मुलांचें डोकें पानांवर ठेवावें लागे. असें करतां करतां पानें सर्व आंगाखालीं घालण्याचा प्रघात पडला. व माणसांनींही आपल्याखालीं पानें आंथरण्याचा क्रम चालविला; पण मुद्दाम आपल्याकरितां पानें तीं जमा करीत नसून मुलांच्या मिषानें जमा करीत. पुष्कळ मिळालीं तर आपण उपयोगांत आणीत. बिछान्यांकरितां रोज पानें तोंड तोडून मोठ्या पानांचीं झाडें यांनीं बोडकीं केलीं तेव्हां लहान पानांची यांना जरूर पडूं लागली. लहान पानाच्या झाडांच्या फांद्या जशाच्या तशा आणून त्यांचा गुबगुबीत बिछाना ही मंडळी करूं लागली. मग वाळू आंथरण्याचा क्रम कमी झाला. नुसत्या डहाळ्यांचा बिछाना झाला, तो बिछाना ४।४, ५।६ दिवस टिके. खालच्या बिछान्यावर चार डहाळ्या घातल्या तर अर्धवट सुकलेल्या बिछान्यावर मंडळी शयन करी. बिछान्यांत सुधारणा होतां होतां गवतावर व गवतानंतर काथ्यावर सुधारणा येऊन पोंचली. नरमचा नरम आणि टिकाऊ पदार्थ मिळतांच ती सुधारणा तेथें थांबली.

निवाऱ्याचे वेळीं आपल्याला तळखी होऊं लागली म्हणजे ही वस्ती जाऊन झाडें हालवी. यावरून आम्हीं कल्पना बांधली कीं, यांना वाऱ्याचें स्थान झाडें असा-

वीत असें वाटे. वारा वहातो तेव्हां झाडें हालतात हीं कल्पना यांस नसून झाडें हालतात तेव्हां वारा वहातो असा त्यांचा उलट समज झाला असल्यामुळें दुपारचे वेळीं मुलें रडूं लागल्यास त्यांस झाडाखालीं ठेऊन दोहों दोहों हातांनीं हीं झाडांच्या फांद्या खूब जोरानें हालवीत. वडाच्या झाडांस हालवण्यास पारंब्याना लों- बकळ्या घेत, तेव्हां झोंकी बरोबर झोंकी देणारास ह- वा लागे, त्यावरून ती हवा मुलांसही लागत असावी असें त्यांस वाटे. आपण झोंके खात असतां आपल्यास हवा लागते तशी मुलास लागत असूनही तें रडतें तर त्याला आपलें सान्निध्य पाहिजे असें समजून मुलास ब- गलेंत मारून झोंके खात, त्याबरोबर मुलाचें रड- णें बंद होई. हा प्रयोग सर्वांस कळतांच मुलांस घेऊन किंवा मूल नसलें तरी एकटी माणसें वारंवार वट वृक्षां- खालीं झोंके घेत असलेलीं आढळत.

एके दिवशी एक पारंबी झाडाखालीं तुटून पडलेली आमचे दृष्टीस पडली. ती बहुतकरून झोंके घेत असतां वजन सहन न होऊन तुटली असावी; मुद्दाम कोणी तोडलेली दिसली नाहीं. मुद्दाम तोडलेली असती तर तुटलेल्या जागीं दांतांचे वण किंवा दगडांचे घाव दिसले असते; शिवाय कार्याच्या कल्पनेपूर्वी तोडण्यांत मतलब नव्हता. कार्याची कल्पना असती तर तिचें कार्य दिसलें

असतें, ती पारंबी त्या झाडाखालीं तशीच वाळून गेली.

आठ दहा दिवसांनीं तशीच एक दुसरी पारंबी आपोआप तुटून पडलेली दुसऱ्या एका वटवृक्षाखालीं आमचे पहाण्यांत आली; तिचेंही योग्य परिक्षण होऊन ती साहजीकरीत्या तुटलेली आहे असें सिद्ध झालें. ती संध्याकाळपर्यंत पडून राहिली होती; पण दुसरे दिवशीं सकाळीं तिचा पत्ता नाहींसा झाला. आसपास चोहोंकडे पाहिलें, वाड्यांत शोध केला तरी पत्ता नाहीं असें पाहून आह्मी तिला शोधण्याकरितां दूर दूर हिंडलों. शेवटीं त्या जागेहून एका कोसावर एका आंब्याच्या झाडावर तिला दुहेरी टाकून गांठ मारलेली आह्मी पाहिली. झाडाची फांदी तपासल्यावर कळून आलें कीं, हा नवीन कल्पनेचा झोंपाळा कोणी केला असावा. पण इतका चोरून कां? तर तिकडे कोणाचें लक्ष जाऊं नये आणि येथेच्च झोंके घेत आपण बसावें हाच त्याचा उद्देश असावा. हीं पारंबी जरी मजबूत होती तरी खालची गांठ वारंवार तुटली असावी व ती गांठवतां येत नाहीं असें पाहून त्या कल्पकानें तिचा नाद सोडला असावा. तो कल्पक कोण हें पहातां येण्यापूर्वीच ती सुकून लांकूड बनली.

कल्पक स्त्री कीं पुरुष हें सुद्धां आह्मांस पाहण्यास मिळालें नाहीं. तरी आमची उदासीनता लौकरच नष्ट

झाली. तिसरे दिवशीं शेंकडों झोंपाळे आंब्यांच्या, जांभळीच्या, भोंकरीच्या झाडांस लोंबत असलेले आमचे पहाण्यांत आले. हे वडाच्या पारंब्यांचे नसून अनेक जातीच्या वेलींचे होते. विशेषतः बेंद्रीची वेल. बाकी वेली लोकांनीं आणल्या पुष्कळ, पण त्या कार्याचा भार सहन करण्यास असमर्थ ठरून नष्ट झाल्या. या झोंपाळ्यांत रोज थोड थोडी सुधारणा होत असे. कोणी बसण्याचे जागीं काठ्या लावल्या, कोणी गवताच्या पेंढ्या बांधल्या आणि कोणी झाडांच्या फांद्यांचें घरट्यासारखें नितणें करून त्यांत गवत घालून मुलांस बहुमोलाचे पाळणे तयार केले.

याच काळांत झाडांच्या फांद्यांनीं किंवा मोठ्या पानांनीं चवरीचें (माशा हांकण्याची कल्पना) व पंख्याचें कामही या वस्तीस सहज येऊं लागलें.

या नव्या वस्तीचीं मुलें तीन महिन्याचीं झालीं, तीं आपल्या आयांस ओळखूं लागलीं. आयांच्या तोंडाकडे पाहून त्यांनीं हंसावें, व आयांस त्याबद्दल धन्यता वाटावी. हीं मुलें आपल्या आईलाच ओळखून हांसतात कीं कोणाकडेही पाहून हंसतात, हें पहाण्यासाठीं तीं एकमेकांचे हातांत देण्याचे प्रयोग ही वस्ती करूं लागली. मातोश्रीचे हातचें मूल दुसऱ्या स्त्रीनें किंवा पुरुषानें घेतलें असतां तें रडे व पुन्हां मातेच्या हातीं

दिल्याबरोबर उगें राही किंवा हंसे; यावरून तीं आयांवर प्रेम करतात अशी कल्पना त्या मंडळीची झाली असावी. मुलें एकमेकांजवळ देण्याच्या व घेण्याच्या थट्टा या समाजांत जारीनें सुरू झाल्या. दोन माणसें एकत्र झाल्यास मुलांचा हा खेळ करून पाहिल्याशिवाय राहायाचींच नाहींत. मग तें मूल रडो अगर न रडो. एकमेकांनीं मुलें आपल्या कडेवर घेऊन त्यांना आयांपासून दूर पळवावीं व रडूं लागल्यास त्यांची समजूत करण्याचा यत्न करावा. समजूत करण्याचा यत्न करणें ह्मणजे मुलाला हातावर हालविणें आणि त्याच्या सुरापेक्षां आपण मोठा सूर काढणें. आयांसुद्धां मुलांना याच युक्तीनें उगे करीत. मुलांना या सुरापासून एक प्रकारचा चमत्कार वाटून तीं तो सूर कोठून येतो कसा येतो तें पाहण्यास आपलें रडें बंद करून त्या गोष्टीच्या शोधास लागत. शोध लागल्यावर पुन्हां पाहिजे तर त्यांनीं आ पसरावा. मग उगी करणारानें दुसरा सूर काढावा, पुन्हां मुलानें उगी राहून हा निराळा सूर कोठून आला हें पहावें. याप्रमाणें ही नवी वस्ती मुलांना उगी करण्यासाठीं नाना सूर आळवूं लागली. येथून मानवी प्राण्यांस गाण्याचा शौक उत्पन्न झाला. मूल रडूं लागलें ह्मणजे आपण या सुरानें त्याला उगी करावे, त्या सुरानें तें उगी न राहिल्यास आपण

बारीक सूर असा काढावा, अशी सुरांची कल्पना जसजशी या माणसांस सुचे तसतसे हीं माणसें सूर काढं, लागलीं. मूल जवळ असो अगर नसो जो तो सूर आळवीत बसे व त्यांत सुख मानी. " तानसेनके तान में सबीतान गल तान है, आपने तानमें चिडी याभी मस्तान है. " तशी ही मंडळी आपापल्या गाण्यांत दंग रहात. या गाण्यांत भाषा नसे, नुसते सूर असत. त्या सुरांना कोणी कोणी कचित् प्रसंगीं कंपही देत. एकादें माणूस दुःखी दिसल्यास त्याचे पुढेंही येऊन अन्य माणसें असे सूर काढीत. हा गाण्याला आरंभ.

मुलांना हांसविण्याचा यत्न करण्यांतली दुसरी कल्पना गुदगुल्या करणें. कोठें कुशीला बोट लावून हालविल्यास मूल रडत नसल्यास तें हांसे, हें पाहून मोठीं माणसेंही अशा प्रकारानें गुदगुल्या करून एकमेकांस हांसवीत. पुरुष स्त्रियांना हांसविण्याचा विशेष यत्न करीत. ते गळ्यांत, तळपायाला, व पोटवळाला गुदगुल्या करीत व स्त्रियांस हांसवीत आणि हांसतां हांसतां कोणी स्त्री खालीं पडल्यास तिचें मूल घेऊन पुरुषांनीं पळवावें. तितक्यांत आपलें मूल त्या पुरुषापासून सोडविण्यास स्त्रिया त्या पुरुषाचा पाठलाग करीत, पुनः त्यानें तिला गुदगुल्या कराव्यात, याप्रमाणें स्त्रियांस पुरुष लांब लांब नेत व तिकडे गुदगुल्या करकरून

त्यांच्याशीं संग करीत. पहिली युक्ती खाण्याची वस्तु देऊन स्त्री वश करण्याची होती, ती आतां विनोद व प्रेम हीं दोन जाळीं पसरलीं गेलीं. संग झाल्यावर पुरुषाची प्रीति संपून तो खाद्याकडे वळे व स्त्रीही अन्य मार्गानें पोराला नेऊन चालती होई. हा प्रकार त्या समाजांत जारीनें सुरू झाला.

एक पुरुष एका स्त्रीला याप्रमाणें वश करित असतां दुसऱ्यानें पाहिल्यास तो त्याला गुदगुल्या करून खालीं पाडी आणि स्त्रीला त्याजपासून सोडवी. हें सुख नसून उपद्रव आहे असें पुढें पुढें त्या माणसांस समजूं लागलें. हांसणें हें सुखाचें चिन्ह असें प्रथम प्रथम वाटे; पण पुढें पुढें गुदगुल्या केल्यानें कित्येक माणसें रडतही असत. ज्या गोष्टीचा आरंभ हांसत व्हावयाचा त्याचा परिणाम रडण्यावर जाऊं लागला. तेव्हां अंगस्पर्श केल्याशिवाय हांसविण्याचा प्रकार सुरू झाला. भाषा भरपूर नाहीं, ग्रंथावलोकन नाहीं, परंपरा ज्ञान नाहीं, अशा ठिकाणीं विनोदही हास्यरसाला थोडा पुरतो. थोडा विपरीतपणा दिसला कीं विनोद व्हावयाचा. पाय हात जसेचे तसे ठेवण्याचा परिपाठ होता, तोच एक हात डोक्यावर करून तो वेडा वांकडा हालविला ह्मणजे पहाणारीं माणसें हांसत. कोणी वांकडे तिकडे पाय टाकीत व आपल्या मित्रांस हांसवित. हात पाय

वेडे वांकडे करून नाचण्यानें या वस्तीस फार हांसूं येई व जें माणूस असें हांसवी त्याजकडे सर्वांचें लक्ष्य लागे व प्रेम जडे; त्यामुळें जो तो नाचण्याकडे प्रवृत्त होई. पुरुषांना किंवा स्त्रियांना खूष करणें ह्मणजे त्यांज-पुढें असा नाच करणें सर्व सामान्य झालें. ही नाचाची कल्पना निघाली. उंच झाडांवरच्या फळांनीं खूष हो-ऊन खालीं पडावें ह्मणून वृक्षाखालींही कोणी कोणी गात व नाचत. कर्मधर्म संयोगानें जर एकादें फळ नाचतेवेळीं झाडाखालीं पडलें तर नाचणाराचा आनंद पोटांत माईना. त्याला वाटे हें आपल्या गाण्याला आषक्त होऊन खाली पडलें. अशीं कित्येक स्त्रीपुरुषें झाडाखालीं प्रहर प्रहर नाचत व गात; पण उद्योगी मनुष्याचे दृष्टीस पक्क फळ पडल्यास तो वर चढून का-ढी. फल प्राप्त करून घेण्यास योग्य श्रमाचा योग्य ठिकाणींच उपयोग केला पाहिजे. या सुमाराला हीं माणसें चिमण्या कावळ्यांचेही शब्द मोठ्या प्रेमानें एकाग्रचित्त करून ऐकत, व त्यांच्या नकला करीत. कोणाला नक्कल विशेष साधे व कोणाला न साधे; पण शौक सर्वांस असे.

गाणें रडण्यापासून उद्भवलें आणि नाचणें हें हा-स्यरस उत्पन्न करण्यासाठीं उदयास आलें, पण दिवसें-दिवस मानवी प्राण्याला संकोचित विनोदानें समाधान न होऊन त्या दोन्ही सर्व साधारण करमणुकीच्या गोष्टी

अद्याप हयात राहिल्या. आतां कर्मणुकीचे विषय अनेक झाल्यामुळें गाणें नाचणें करमणूक मानून घेण्यासाठीं, त्याचा थोडा बहुत अभ्यास करावा लागतो. गाणें निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारचें झालें. हिंदुस्थानचें उत्तम गाणें साहेब लोकांस आवडत नाहीं व संगीत मंडळ्यांचीं गाणीं ग्वाल्हेर लष्करच्या गवयांस रुचत नाहींत, याचें कारण अनाभ्यस्तता.

विजा चमकूं लागल्या, पाऊस पडूं लागला तेव्हां या मंडळीनें पर्वताच्या गुहांचा व झाडांच्या ढोलींचा आश्रय सालाबादप्रमाणें घेतला. परंतु विशेष सुरक्षित स्थळें लेंकरेंवाल्या स्त्रियांनीं बळकावलीं. त्याठिकाणीं कोणी पुरुष उपद्रव करूं लागल्यास त्या त्या पुरुषांवर तुटून पडत.

आजपर्यंत गुहादिकांचा आश्रय हीं माणसें करीत, पण गुहावर आपलें स्वामित्व आहे असा ह्यांना भास झाला नव्हता. पावसाची संतत धार पडे तेवढ्या पुरती ही मंडळी त्या स्थळांचा आश्रय करी आणि पाऊस थांबला कीं गुहेंतून बाहेर पडे; पण आतां मुलाच्या प्रेमानें बहुतेक दिवस त्या स्त्रियांस गुहादिकांत काढावा लागे, एवढेंच नव्हे तर गुहेंतील जागा स्वच्छ करीत, त्या गुहेंत मुलाच्या बिछान्याकरितां पक्ष्यांचीं पंखें, शेंवरीचा कापूस वगैरे आणीत, कंदमूळ किंवा फळफळावळ एकवेळ आणून ती दोन दोन दिवस गुहेंत बसून खा-

ण्याची अवश्यकता या स्त्रियांस भासूं लागली. पावसाळ्यांत पाला मिळविण्यास विशेष श्रम पडत नसून खाद्य मिळविण्याचें काम थोड्या अवकाशांत होई; पण तहान लागल्यास यांना कोस कोस लांब झऱ्यावर किंवा तळ्यावर जावें लागे. कारण भांड्याची कल्पना निघाली नसल्यामुळें पाण्याचा संग्रह करण्याचें यांस साधन न व्हतें. यांच्या घरांना जरी किंमत पडली नाहीं तरी पाण्यापासून जवळच्या गुहा जरी संकोचित असल्या तरी त्या त्यांस मौल्यवान वाटत. त्या गुहा सोडून जाण्याचें त्या मंडळीस प्रयोजन पडत नसे. दूरच्या गुहेंतील स्त्रीस तहान लागल्यास ती मुलाला पोटाशीं धरून पाणी पिण्यास येई; पण आसपासच्या स्त्रिया मुलांस गुहेंत निजवून पाणी पिऊन येत. एके दिवशीं आमचे पाहण्यांत आलें कीं, एक स्त्री कमळाच्या पानांत पाणी भरून तें ती वरच्यावर गुहेंत नेई, तिनें अशा कित्येक खेपा केलेल्या आमचे पाहण्यांत आल्या; पण कल्पना बरोबर बसेना. एकदां वाटे कांहीं भांड्याची कल्पना निघाली असून ही त्या भांड्यांत पाणी सांठवीत असेल. विशेष कोणी गायक किंवा नर्तक जमले असून त्यांना ही पाणी नेऊन पाजीत असेल. यावेळीं पाऊस पडत नसून अकाश अभ्राच्छादित होतें, ती वरचेवर आकाशाकडे पाही आणि पाण्याच्या खेपा करी. ती स्त्री

गुहेच्या बाहेर पडतांच आह्मीं तिची नजर चुकवून हळूच तिच्या गुहेंत शिरलों; पहातों तों तिचें मूल तापानें फणफणलें असून ती त्याजवर पाणी आणून ओतीत आहे. त्या मुलाला कमळाच्या पानांवर निजविलें असून खालच्या पानांवर पाणी कायम राही अशीं तीं कमळाचीं पानें मातीच्या खोलगट मृदु जागेंत सारखीं बसविलीं होतीं. तापाचें औषध प्रथम पाणी होतें. गरम झालेला पदार्थ पाण्यानें थंड होतो अर्थात ताप जातो. तापानें भाजत असलेलींच माणसें भलत्यासलत्यावेळीं तळ्यांत बसलेलीं आढळत; तेव्हां आह्मांस त्यांतील हेतु कळला नव्हता तो आतां कळला. आजकाल तापकऱ्यांवर पाणी टाकलें असतां ताबडतोब वायू होतो असा समज झाला आहे. त्यावेळच्या कल्पनेप्रमाणें तापाचें औषध पाणी होतें आणि आतां शेंकडों उद्भवलीं आहेत तरी वैद्यशास्त्राचें पूर्णत्व अद्याप झालें नाहीं व जगाच्या अंतापर्यंत तें होईल अशी उमेदही नाहीं. वैद्यांचा वृथाभिमान आहे, ते अद्याप अपूर्ण आहेत. वैद्यशास्त्र पूर्णतेस आल्यावर अपमृत्यु (अल्पायुषीं माणसांचे मृत्यु) होण्याचा संभव नाहीं. पान पिकलें ह्मणजे गळावें हा सृष्टिक्रम आहे. हिरवें पान गळणें हा अपमृत्यु.

या बाईचें मूल दोन दिवसांनीं तापापासून मुक्त झालें. पुन्हां मुलाचें अंग गरम झाल्यास त्याच्या अंगावर

पाणी टाकण्यास असावें ह्मणून ती खोलगट जागीं कमळाचीं पानें चिकटऊन त्यांत पाणी भरून ठेवी. तें प्रहराभरांत वाळून किंवा जिरून जाई; पण पाण्याचे सांठवण इनें केलें खरें. ही पाणी सांठविण्याची कल्पना त्या समाजांत वृद्धि पावत चालली. कोणी कोणी लहान खळगे गुहेचे बाहेर करून त्यांत पावसाचें पाणी सांठवूं लागलीं. नारळीच्या दोन पाती कच्च्यासारख्या करून त्यांत कमळपत्र ठेवून कोणी पाण्याचा सांठा रात्रींकरितां करूं लागलीं. माडाच्या पातींच्या टोपल्या तयार करून त्यांत कमळपत्रें ठेवून तांब्या तांब्या पाणी ही मंडळी कोस कोस नेऊं आणूं लागली. अशा रीतीनें पाणी नेत असतां दुसऱ्या कोणी पाहिलें तर तें हिसकून घ्यावें किंवा नेणाराजवळ मागावें हा घातक प्रकार त्या वस्तीस अद्याप माहीत नाहीं. कितीही तहान लागली तरी ज्यानें त्यानें स्वतःपुरतें पाणी दूर न्यावें.

अन्नपाण्याचा थोडा ह्मणजे एका वेळेचा संग्रह जो किंवा जी करी तीं त्या गोष्टीच्या आनंदांत गुहेच्या बाहेर नाचत व गात. आनंदी उत्सव पाहून खाण्यापिण्याची सोय करण्याचा नाद सर्वांस लागला. जें जंगलांत मिळे तें गोळा करतां करतां अर्धे खावें, अर्धे घरीं आणावें. एक दोन वेळांचें अन्न प्रत्येकजण संग्रह करूं लागला. पाला वाळल्यावर खाण्याच्या उपयोगीं

पडत नाहीं, कारण विस्तवाचा अद्याप शोध लागला नाहीं. तरी आंब्यांच्या कोया, नारळ हें खाणें हातीं लागल्यास चार चार पांच पांच दिवसांपुरतें संग्रह करण्याचा तीं यत्न करीत.

ज्या माणसांना गुहा, ढोली मिळत नसत, तीं दाट पानांच्या वृक्षाखालीं पाऊस निवारण करीत. कांहीं झाडांच्या फांद्यांवर सागवानाचीं पानें घालून पावसाचें निवारण मंडळी करी; पण झाड वाऱ्यानें हेलकावे घेऊन यांचें घर एकदोन दिवसांत नष्ट करी. या घरांत कमजास्त सुधारणा चालली असून मजबूतीचा यत्न करण्यांत आला नाहीं.

एक काठी लांबशी घेऊन तिला कांहीं आडव्या काठ्या बांधून त्यांवर चविणीचीं पानें भोकरांच्या मगजानें चिकटऊन घरें करण्याची पद्धत लौकरच आमचे पहाण्यांत आली. याला घर संज्ञा देण्यापेक्षां छत्री म्हणणें बरें. हें घर डोक्यावर घेऊन ही मंडळी पाहिजे तिकडे पावसाळ्यांत हिंडे. काम करतेवेळीं घर खालीं ठेवावें लागे. या छत्र्यांच्या वजनाचा मेळ नसे. कोणी छत्री मण वजनाची तर कोणी शेर वजनाची करी. जशा ज्याला काठ्या मिळत तशीं ते आपलीं घरें करीत. लांकूड कापण्यास हत्यारें नव्हतीं. जीं लांकडें आपोआप वाऱ्यानें मोडून पडत त्यांचा उपयोग ही

मंडळी करी. आडव्या काठ्या मात्र हातानें मोडून लावल्या जात असत. हीं इरलीं उर्फ विरलीं हल्लींचे विरल्यापेक्षां जड असून मजबूत नसत. दोरा कोणता मजबूत हें यांस समजलें नव्हतें. कोण्याही वेलीनें किंवा चविणीच्या सोपानें बंधन केलेलीं हवी तितकीं टिकाऊ होऊं शकत नाहींत. घरांच्या कल्पनेपूर्वी छत्र्याची कल्पना निघेल, असें आह्मांस वाटलें नव्हतें; पण फिरणाऱ्या वस्तीला फिरविण्यास योग्य अशीं घरें ह्मणजे विरलीं आधीं शोधून काढणें साहजीक झालें.

नाचाकडे जसजसें या मंडळीचें दुर्लक्ष्य होत चाललें तसतशा त्यांना विचित्रपणाच्या कल्पना जास्त सुचूं लागल्या. येथें यांस लौकिकाची चाड उत्पन्न झाली. आपल्यास इतरांनीं चांगलें ह्मणावें अशी महत्वाकांक्षा ज्यामध्यें जास्त असे ते विशेष कल्पक होत. कोणी भोंकराच्या बलकानें आपल्या चेहऱ्यावर व अंगावर बारीक बारीक पानें चिकटवून नाच करीत. कोणी लाल फुलांच्या पाकळ्या चिकटवीत, कोणी निरनिराळ्या आकृति पानें चिकटवून दाखवीत, केंसांत शिंपा बांधीत, आणि असा आपला रानटी समाज खूष करीत. फळें कानावर बांधणें व पक्ष्यांचीं रंगीबेरंगीं पिसें आंगाला चिकटविणें यांना भूषण वाटूं लागलें. जो जास्त पिसें संग्रह करी तो श्रीमानच ह्मणायाचा. त्यांची आर्ज-

वें करण्यास कधीं कधीं अन्य माणसें जात; पण त्याजपासून तीं पिसें तीं माणसें मागून घेत नसत तर त्याला विचारीत कीं हीं कोठून आणलींस? तेथें आणखीं आहेत कां? बहुतकरून ते लोक इतरांस जागा सांगत असत; कारण, विचारण्याचा विधि आटोपल्यावर तीं माणसें पंखे निवडण्यास पक्ष्यांच्या घरट्याकडे पळत सुटत.

हीं माणसें कोठें जातात, हें पहात असतां आमचे नजरेस एके दिवशीं एक नवी गोष्ट आली ती काय तर मानवी प्राणी इष्टहेतू साध्य करण्यास अत्यंत यत्न कारितो. एक मनुष्य एका मोराचे पाठीस सकाळपासून संध्याकाळपर्यंत लागला होता. मोर उडाला ह्मणजे हा त्याचे मागें पळे व मोर झाडावर बसला ह्मणजे त्याला तो दगड मारी, असा मोराला त्यानें संध्याकाळपर्यंत विसावा घेऊं दिला नाहीं व आपणही अन्नपाण्याशिवाय राहिला. अंधेर पडल्यावर बिचारा निराश झाला तरी या धामधुमींत त्या मोराचीं ४१९ पंखें गळलीं तीं यानें मिळविलीं.

पानें चिकटाविणें फार श्रमाचें काम असून पानें वाळलीं ह्मणजे अंगापासून सुटत व करपलेलीं पानें आंगास लागत, या गैरसोईनें यांस रंग लावण्याची कल्पना आली. कोणी लाल माती कालवून लावावी, कोणी हिरवीं पानें कुटून त्यांचे थर लावावे, व कोणी आपल्याच आंगाचें रक्त काढून लावावें. पायांला शिंपेनें जखम क-

रून जो रक्ताचा थेंब येई तो कपाळाला नाकाला लावावा आणि नाचावें. आपापल्या मुलांचे चेहेरेही हीं मंडळी याप्रमाणें रंगवी आणि तें मूल मग त्यांस चांगलें दिसे.

नव्या वस्तीच्या मुलांस दांत येऊं लागले तें पाहून स्त्री पुरुषांस मोठा चमत्कार वाटला कीं हीं मुलें आपल्याप्रमाणें पाले वगैरे खाण्यास लौकर समर्थ होतील. आपण जे जे पदार्थ खातो ते ते मुलांस खाऊं घालण्याचाही प्रकार दिसला. जे पदार्थ कठीण असत ते चावून गिळण्यास योग्य झाले ह्मणजे ते मुलांच्या तोंडांत घालीत. तेणेंकरून सर्व पदार्थांची त्या मुलांना गोडी लागत चालली. जसजसें तीं हें बाहेरचें अन्न खाऊं लागलीं तसतशी दुधाची जरूर त्यांस कमी झाली. व आयांचीं दुधेंही आटत चाललीं. कांहीं पोरें आबाळ होऊन किंवा आंयांचें दूध न पचून मेलीं. तीं ज्या ज्या ठिकाणीं मरून पडलीं तेथें त्यांच्या आया एक दोन दिवस दुःखी होत्सात्या बसत; पण पोराला दुर्गंधी सुटली ह्मणजे तें स्थान सोडून चालत्या होत, व पुन्हां पुन्हां मोहपाशामुळें मुडदा पहाण्यास येत. त्या मुडद्यांस मुंग्या लागलेल्या व माशा घोंगावत असलेल्या पाहून पुन्हां त्या त्या मुडद्यापासून दूर जात. असें तें पोर कावळ्या घारींनीं व मुंग्या माशांनीं खाऊन फस्त पाडीपर्यंत यांच्या फेऱ्या चालत. मोठीं माणसें जीं कांहीं

रोगांनीं किंवा उपासांनीं मरत तीं ही जागच्या जागीं सडून जात असत.

ज्या स्त्रियांचीं पोरें मेलीं त्या प्रथम गर्भवति झाल्या व ज्यांचीं पोरें जिवंत होतीं त्यांनींही ती वर्षे सवा वर्षांचीं झाल्यावर पुरुषांबरोबर विशेष स्नेह करण्याचा क्रम आरंभिला. अमुक स्त्री व अमुक पुरुष अशीं जरी तीं ठरीव जोडपीं नव्हतीं तरी दोन दोन तीन तीन आठवडे हीं माणसें जागोजाग जोडपीं आढळूं लागलीं. स्त्रिया तर गर्भवति झाल्या; पण स्त्री पुरुषांचें प्रेम वाढत चाललें. फळफळादळ खाण्यास बरोबर निघायाचें, मिळालेलीं फळें एकमेकांनीं एकमेकांस द्यावयाचीं व जशा आया पदार्थ चावून आपल्या पोरांच्या तोंडांत घालीत, त्याप्रमाणें त्या स्त्रीवर प्रेम करणारा पुरुषही त्या पोराला आईप्रमाणें चारा चारी. मधमाशांचीं पोळीं काढून त्यांतील मध खाण्याचें धाडस यांस आद्याप आलें नव्हतें; पण मधमाशांनीं सोडून दिलेल्या पोळ्यांचें मेण हीं माणसें आणून आपण खात व पोरांस खावचीत.

यावेळीं या स्त्रियांस मदतीची जरूर भासूं लागली. एक तर आंगावरचें दूध आटल्यामुळें पहिल्या पोरास मृदुचारा मिळविण्याची खटपट करायाची, तो चारा चाऊन पोरांचे तोंडांत वारंवार घालावयाचा, आपण चारा स्वतःसाठीं मिळवायाचा

इतकें असून आपल्या व आपल्या पोराच्या तोंडास रंग लावणें, पानें चिकटविणें वगैरे जो शौक शिरला होता त्याची पूर्तता करण्यास त्यांस फार श्रम पडत. हे पुरुष आतां यांपैकीं बरींच कामें करूं लागल्यामुळें स्त्रीपुरुषांत प्रेम जास्त वाढत चाललें. जो पुरुष स्त्रियांचीं अशीं कामें करण्यांत आळस किंवा कुचराई करी त्याजवर स्त्रिया प्रेम न करतां जो आपल्याकडे व आपल्या पोराकडे लक्ष्य देतो त्यांचेकडे त्यांचें मन रहाणें साहजिक होतें. या पाळीस स्त्रियांचीं पोटें गर्भानें जसजशीं वाढत चाललीं तसतसें पुरुष या स्त्रियांच्या कामास जास्त जपूं लागले. जे विशेष स्त्रीभक्त त्यांनीं स्त्रियांना जागवरून हालण्याची जरूर नाहीं अशा खटपटी चालविल्या. जो भाजी पाला फळफळावळ मिळेल ती आपल्या प्रियेजवळ सगळी आणून द्यावयाची व मग दोघांनीं मिळून वडील पोरासमवेत आहार करावयाचा. नऊ महिने झाले ह्मणजे पोर होतें हें जरी त्यांस माहीत नव्हतें तरी पोट मोठें झालें ह्मणजे पोर होतें हें पहिल्या पाळीचें स्मरण सर्वांस होतें.

जसजशीं पोरें उरीं लागलीं तसतशीं हीं स्त्री पुरुषें पोराच्या संगोपनास निवाऱ्याची जागा पाहून कोणी त्या जागीं समुद्राची वाळू भरूं लागलीं, कोणी सुकलेली शेवाळ आणूं लागलीं, कोणी मृदु गवत भरूं लागलीं,

कोणी पाणी आणण्याकरितां नारळीच्या पानाच्या टोपल्या विणूं लागलीं, ज्या टोपलींत कमळाचीं पानें टाकून पाणी आणतां येतें.

दुसऱ्या बाळंतपणाला पहिल्या बाळंतपणापेक्षां जास्त सोई झाल्या. कोठें कोठें पोरांचे जन्म झाले व कोठें होत आहेत, अशा समयीं आह्मांवर एक बाहेरचा प्रसंग गुजरला. एक जहाज रात्रीं बेटाला येऊन लागलें. व त्यांतील लोकांनीं या मंडळीला धरण्याचा क्रम आरंभिला. सुमारें वीस स्त्रिया व पुरुष व सतरा पोरें धरून त्यांनीं तीं जहाजावर नेलीं. आह्मी नांवेंत बसून त्या जहाजावर चढण्याचा यत्न केला, पण त्यांनीं आम्हांवर बाणांचा वर्षाव केल्यामुळें आम्हांस माघार घेणें भाग पडलें. शेवटीं आह्मी कडेवर येऊन त्या जहाजावर सोन्याचे पांच बाण मारले, तें पाहून जहाजावरील लोकांस उमेद आली कीं, या बेटावर विपूल सोनें असावें. त्यांतील मुख्य मुख्य लोक तिरकमठे घेऊन त्या बेटावर फिरूं लागले. एक कामगार एका नाल्यांत उतरलेला पाहून आह्मी दरींतील लोकांनीं त्याजवर हल्ला करून त्याला धरला आणि दरींत नेला. आमच्यानें समजावविलें तितकें त्याला आम्ही समजाविलें कीं, मानवी प्राण्याची सुधारणा कशी होत जात आहे हें पहाण्याकरितां हीं माणसें आम्हीं तेथें ठेविलीं आहेत,

तुम्ही आम्हांस उपद्रव करूं नये. तो मनुष्य अन्य भाषेचा असून अडाणी होता, त्याला आमचा मतलब कांहींच समजेना; शेवटीं त्याला आम्हीं एका कोठडींत बंद केला. दुसरा एक मनुष्य आम्हास भेटला त्याचीही हीच अवस्था झाली. या माणसांचा पत्ता दोन दिवस झाले, लागला नाहीं तेव्हां यांच्या शोधार्थ बहुतेक माणसें खालीं उतरलीं. आणि चोहोंबाजूस त्यांनीं यांना शोधण्याचा क्रम सुरू केला. आम्हांस तिसरा एक माणूस एके ठिकाणीं असाच पकडता आला; तो चतूर होता. त्याला हकीकत कळतांच त्यानें वचन दिलें कीं, मी आपल्या मालकास तुमची गोष्ट समजावितों, तो समजदार आहे. याला आम्हीं कांहीं मोहरा देऊन जहाजावर पाठविला. त्याचें वर्तमान ऐकून जहाजाचा मालक आमचे ठिकाणावर स्वतः आला आणि आमची हकीकत समजून घेतली. ती ऐकून त्याला मोठा आनंद झाला. आम्हापासून कांहीं घेण्याचे त्याचे मनांत नसून आम्हांस कांहीं सहाय्य करण्याची त्यानें आपली इच्छा दर्शविली. आम्हीं त्यास ह्मटलें कीं, आमची पकडलेलीं माणसें आतां या बेटावर परत न पाठवितां जवळच चार कोसावर एक बेट आहे तेथें त्यांस सोडून तुह्मी चालतें व्हावें. ह्या माणसांनीं सुधारलेल्या माणसांचा चार पांच दिवस सहवास केला असल्यामुळें कदाचित्

त्यांच्या अनुकरणांत फार मोठा फरक पडायाचा. आतां दोन बेटावर अशा भवतव्यानें या माणसांची वांटणी झाली.

दोन बेटावर वस्ती वांटली गेली, त्याप्रमाणें त्याच जहाजावरून आह्मी आपलीं माणसें त्या बेटावर पाठविलीं असतीं, पण त्यांजकरितां विशेष बंदोबस्ताची जागा तेथें केलेली नसल्यामुळें तसें करतां आलें नाहीं. गलबतावरील मालक आपल्या वचनाप्रमाणें तीं माणसें तेथें सोडतो कीं, कैद करून आपल्या मुलखांत घेऊन जातो हें पहाण्यास दोन माणसें आम्ही त्या गलबतावर पाठविलीं. तीं पंधरा दिवसांनीं परत आलीं. तितक्या अवकाशांतली हकीकत मात्र आह्मी सध्यां देतों; बाकी हकीकत जुन्या व नव्या वस्तीचें जेव्हां ऐक्य होईल तेव्हां देतां येईल. मग तें ऐक्य किंवा दळणवळण एका पिढींत होवो अगर शेंपन्नास पिढ्या गुजरून जावोत. जेव्हां समुद्रांतून लांब जाण्याचा या मंडळींत जोम येईल तेव्हांच दळण वळण पडेल; मग नौकागमनाची कल्पना त्यांच्यांत येवो अगर भोपळे बांधून पोहून जाण्याची कल्पना सुचो.

हें जहाज रात्रीं हाकारलें तें उजाडण्यापूर्वी नव्या बेटाचेजवळ जाऊन उभें राहिलें. तेथून जमीन कोसभर लांब होती. त्या ३७ माणसांस नांवेंत बसवून मालक व जहाजावरील खलाशी त्या बेटावर चार खेपांत पों

चले. त्या माणसांचे हात सोडून त्यांना समुद्रतीरीं सो-डलीं. पण तीं तेथें न रहातां पुनः पुनः नावेवर चढत. खलाशी लोक त्यांना नावेवर येऊं देतना. त्यांना कैद बरी वाटते, असें ते खलाशी समजत; पण त्या माणसां-ना मागला ओढा होता. त्यांना वाटे कीं हें जहाज पुनः आपल्यास आपल्या बेटावर नेऊन सोडील. आमच्या माणसांस बरोबर घेऊन जहाजाचा मालक बेटावर चो-होंकडे हिंडला. त्या बेटावर एक लहानशी नदी होती व सर्व बेट गगनचुंबीत वृक्षांनीं भरलेलें होतें. मनुष्यास रहाण्यास योग्य अशी जागाच कोठें दिसेना. वाघ, लां-डगे, ससे, चित्ते, वानर, वगैरे पशूंची व सर्पादिकांची तेथें रेलचेल होती. अशा जागीं हा मृदुकातडीचा, शृंग-रहीत प्राणी सोडणें ह्मणजे त्याला त्याच्या निरापराधा-बद्दल फांशीं देणेंच आहे असें आमच्या माणसांस वा-टलें. जहाजावरील मंडळीनें कित्येक श्वापदें मारून ज-हाजावर नेलीं. पाणी भरलें, सर्पणाचा विपूल पुरवठा केला, इतकें होईपर्यंत आह्मी जाग्याच्याच सोई पहात होतों.

युक्त अशी जागा कोठेंच आढळली नाहीं, मग नदी-चे काठीं असलेलें जंगल तोडून तेथें एक विहिरीसारखा विस्तीर्ण खळगा खणला. तो सुमारें दोन पुरूष उंचीचा असून आंत उतरण्यास चोहोंबाजूंनीं लहान पायऱ्या ठे-वल्या. त्या खळग्याचे वर एक भलें भक्कम कुंपण बांधलें,

ज्यांत सहसा जनावरांस जातां येऊं नये. या खळग्यांत हीं माणसें सोडण्याचा निश्चय झाला. ज्या ठिकाणीं हीं माणसें सोडलीं होतीं तें ठिकाण सोडून तीं जंगलांत पळतील अशी जहाजावरील मंडळीची कल्पना होती; पण जसा ढेंकूण आपण कोणत्याही दिशेस फेंकला तरी तो फेंकणाराकडे येतो तशीं हीं माणसें नावेकडे मात्र वारंवार येत. पहिला दिवस त्यांचा अन्नपाण्याशिवाय गेला. दुसरे दिवशीं चार खलाशी पाठवून चार ओझीं पाला आणून त्यांचे पुढें टाकला तो त्यानीं प्रेमानें खाल्ला. दोन घागरी पाण्याच्याही त्यांचे पुढें ठेवल्या, पण तें पाणी त्यांना बरोबर वांटून घेतां आलें नाहीं. सुमारें घागरभर पाणी त्यांनीं पितां पिता जामिनीवर सांडलें. दुसऱ्या दिवशीं पाला आणला पण पाण्याच्या घागरी त्यांचेपुढें न ठेवतां एक परात आणून ठेवली व त्यांत पाणी ओतण्यास एक खलाशी उभा राहिला. त्या परातींतील पाणी त्यांनीं तोंड लावून व ओंजळी भरून प्यालें. हीं माणसें तेथें समुद्रतिरीं असतां एक स्त्री पुत्ररत्न प्रसवली तें पोर तिनें चाटून सफा केलें. हें पाहून जहाजावरील मंडळीस जो चमत्कार वाटला तो सांगतां पुरवत नाहीं. पोर पोटाशीं धरून ती रक्तानें लडबडलेली नागवी स्त्री पाहून जो तो आपापल्या परी चर्चा करी. सर्वांचा डोळा त्या देखाव्याकडे होता. त्यांना तें अमानुष

कृत्य वाटे. जहाजावरील खलाशांना दया येऊन त्यांनीं जुनीं वस्त्रें गोळा करून तीं त्या स्त्रीपुढें टाकलीं. व भात वरण एका पानावर वाढून तें पान तिजपुढें ठेविलें; पण ती त्या पात्राला हात लावीना व तिकडे पाहीहीना. खलाशी आपल्या भाषेनें तिला खाण्यास सांगत; पण तिला तें त्यांचें ह्मणणें समजेना व अशा अन्नाची तिला ओळखही नव्हती. या माणसांपैकीं कोणीच तें अन्न गृहण केलें नसून कावळे चिमण्या वगैरे पक्ष्यांनीं तें खाऊन टाकलें. पाल्याचीं ओझीं येऊन पडतांच त्याजवर मात्र यांची मेजवानी खूब उडे.

खळगा तयार झाल्यावर या माणसांस हात बांधून खलाशांहातीं त्या भुईकोट किल्यांत नेऊन सोडलीं.

त्यांची रजा घेतांना बाळंतिणीला दिलेल्या चिंध्याबराचसा (सात आठ ओझीं) पाला त्या भुईकोटांत मालकाच्या हुकमावरून ठेवण्यांत आला. कुंपणाचे आंत नदी घेतली होती.—त्या नदीचें पाणी पिण्यास यांना कुंपणाचे बाहेर जावे लागूं नये. रात्रीं बेरात्रीं तेथें पाणी प्यावें. या मंडळीला पोंचवून आमची मंडळी नावेकडे आली. नावेंत बसली तों हीं माणसें पोरें कोटांत टाकून समुद्रतिरीं आलीं तें पाहून जहाजाच्या मालकाला राग आला. त्यानें कोरडा हातांत घेऊन तो त्याजवर चालून गेला. आणि सटासट कोरडे मारमारून सर्वांस त्यांचे

जागेवर पोंचविलें. तो मालक नाहींसें पाहून तीं कोटा-बाहेर येत, तो बाहेर आलेल्यास कोरडा चमकावी. तेव्हां तो बाहेर बसला आहे अशी सर्वांची खात्री झाली आणि त्या दहशतीनें सर्व निरुत्साह होत्साती भुईकोटांत राहिलीं आणि जहाजाचा मालक जहाजावर आला. हीं माणसें त्या भुईकोटांत सोडून गलबत रात्रीं तेथून निघालें तें रात्रीं आमचे बंदरांत येऊन आमचीं माणसें सोडून आमचा निरोप घेऊन चालतें झालें.

आमच्या बेटावरील माणसें वियोग दुःखानें विव्हळ झालीं आहेत. कोणी चाऱ्याचीही पर्वा करीत नाहींत. ज्या आयांचीं पोरें पकडलीं गेलीं त्यांच्या डोळ्यांचें पाणी खळत नाहीं. कोणा पुरुषांच्या स्त्रिया गेल्या तेही रात्रंदिवस झुरत व ज्यांचे पुरुष गेले त्या स्त्रिया त्यांजकरितां रडत; मिळून जें बेट पंधरा दिवसापूर्वी गुण्यागोविंदानें नांदत होतें त्यावर एक जणूं ईश्वरी कोप होऊन तें उद्विग्न झालें.

वियोग दुःख बाहेर जाणारापेक्षां मागें रहाणारांना विशेष जाचतें. बाहेर जाणाराला नवीं सुख दुःखें भोगायाचीं असतात. नवे देखावे दिसतात पण मागें रहाणाऱ्यांचें सर्व चित्त आपल्या आवडत्यावर असल्यामुळें त्यांना घडीभर करमत नाहीं. या माणसांचें रडणें आक्रोशकारक नसून मनांतल्या मनांत असे, पण चेहऱ्यावर

व कृतींवर अभिष्टपणाची झांक मारी. मोठ्यानीं किंकाळ्या फोडून जे हल्लीं रडण्याचा क्रम आपण माणसांत पहातों तो कारणानें आला आहे. ती सहाय्य मागण्याची पद्धत आहे. ही पद्धत अनुकरणानें लागली आहे असें मात्र ह्मणतां येत नाहीं. ही सृष्टिक्रमानेंच शिकविली आहे. पोर पैदा होतें तेव्हांच ओरडतें, पण तें सहाय्य मागतें. ग्राम पशही याप्रमाणें यातना झाल्यास ओरडतात; कारण त्यांना कोणी सोडविणारा आहे अशी कल्पना असते. वन्य पशु दुःखाबद्दल आक्रोश करीत नाहींत. जेथें सहाय्य होण्याची अशा नाहीं तेथें आक्रोश करून उपयोग काय? ज्या वेळीं सहाय्याची आशा नसते त्यावेळीं रोदन करणें तें अरण्यरोदन होय, त्याची अवश्यकता नाहीं. चोरांनीं कोणा माणसास मारण्यास तलवार उपसली तर मरणारा मोठ्यांनीं ओरडेल, रडेल, हवे ते कांगावे करील, पण सरकारांतून ज्याला देहांत शिक्षा ठरते व मरणाराची खात्री असते कीं, आपल्यास सुळीं दिल्याशिवाय, फांशीं दिल्याशिवाय किंवा तोफेच्या तोंडीं दिल्याशिवाय रहात नाहींत, तेव्हां त्याचे डोळ्यांतून पाणीसुद्धां येत नाहीं. पण चेहेऱ्यावर दीनता व भ्रम दृग्गोचर होतात. तीच अवस्था आमच्या बेटावरील माणसांची झाली आहे. रसिक फळ, उत्तम नारळ, किंवा कोवळा पाला त्यांच्यानें गिळला

णात नाहीं. एकेक फळ खाण्यास सगळा दिवस पुरत नाहीं. आजपर्यंत जीं काहीं माणसें मेलीं त्यांच्याबद्दल त्यांच्या आप्तांनीं दुःख किती केलें हें आम्हांस नीट-पणीं पहाण्यास मिळालें नाहीं; पण आज तें दुःख भर-पूर दिसत होतें.

जहाजावरील लोकांनीं जी धराधर चालविली त्या वेळीं एक गर्भवति स्त्री जी जीव घेऊन धांवत सुटली, ती समुद्र काठीं जाऊन तेथें मोठमोठे दगड होते त्यांचे आड लपली व तावडतोब तेथेंच प्रसूत झाली. प्रसूती-नंतर बाहेर डोकावून पाहिलें तों पकडापकडीचा भयंकर देखावा तिचे दृष्टीस पडला. इच्या ठिकाणापासून जहाजही जवळ होतें. त्यावरील सर्व देखावा इला दिसत असून ही कोणाच्या दृष्टीस पडण्यासारखी नव्हती. आपलें भक्ष्य रात्रीं मिळवून खावें व सर्व दिवस त्या ठिकाणीं काढावा. जेव्हां जहाज निघून गेलें तेव्हां ती दिवसाची त्या किनाऱ्यावर फिरे; पण वारंवार त्या दग-डाआड जाऊन बसे. ज्या रात्रीं जहाज आलें तें तिला दिव्यांवरून ओळखतां आलें; पण सकाळीं तें जहाज गेल्याचें पाहून ती यथेच्छ हिंडूं फिरूं लागली. हिला वाटलें असावें कीं, सर्व माणसें त्या लोकांनीं नेलीं आहेत ह्मणून तिनें कोणाचा शोध केला नाहीं. ती आपल्या प्रियकराबद्दल, पहिल्या लेंकराबद्दल व इष्टमित्रां-

बद्दल कष्टी तर खरीच; पण इतरांपेक्षां हिच्यांत दुःख कमी दिसलें. याचें कारण तिच्या विचारशक्तीला जास्त विकसितपणा आला. जहाज काय, लोक कोठले, धरून नेलेलीं माणसें त्यांनीं पाण्यांत टाकलीं कीं काय केलें, आपल्यासारखीं माणसें समुद्रांतही आहेत, नाहींत ह्मणावें तर जमीन तर समुद्रांत कोठें दिसत नाहीं किंवा अशा लहान लहान जमिनी समुद्रावर तरंगत असतील, या कल्पनांनीं तिला विशेष दुःख करण्यांस फुरसत दिली नाहीं. सोळा सतरा दिवस झाल्यावर हीं माणसें समुद्र तीराकडची हकीकत पाहण्यास इच्छूं लागलीं.

सर्व माणसें समदुःखी असल्यामुळें सर्वांची एकी उत्कृष्ट भासूं लागली. आजपर्यंत माकडादिकांसारखे यांचे अन्नव्यवहार निरनिराळे किंवा जोडी जोडीनें होत; पण आतां सर्वांनीं ज्याला जें मिळेल तें येथें आणून टाकायाचें आणि सभोंवार बसून मेजवानी उडवायाची. पाणी पिण्यास मात्र प्रत्येकानें तहान लागेल तेव्हां तेव्हां तळ्यावर जावें. जरा कोठें खुट् झालें कीं, कोणाहा मूळ ठिकाणीं येऊन कळवावें व मूळ ठिकाण-च्या माणसांनीं तें काय वाजलें ह्मणून चौकशी करावी. ज्याला त्याला इच्छा होती कीं, समुद्र तीराकडे जाऊन एकवेळ तिकडची हकीकत काय आहे तें पहावें; त्या-प्रमाणें कांहीं भाषण व कांहीं खुणावरून सर्वांनीं वि-

चार केला कीं, एका भक्कम पुरुषानें पुढें चालावें, त्याचे मागून इतरांनीं चालावें व संकट दिसल्यास त्यानें आरडत मागें यावें व सर्वांनीं वाट फुटेल तिकडे पळावें. आणि रात्रीं पुनः याच ठिकाणीं जमावें. या ठिकाणीं येणें सुद्धां याच पद्धतीनें व्हावें. प्रथम झोरक्यानें येऊन मग इतर मंडळीला त्यानें निर्भयतेची खूण करावी. ती खूण ऐकताच मंडळीनें तेथें यावें. असा संकेत होऊन सकाळीं प्रहर दिवसाच्या सुमारास मंडळी मूळ ठिकाणाहून सुटली. तेथून समुद्र कांठ दोन कोस होता. सुमारें दीड कोस गेल्यावर तेथें त्या झोरक्याचे दृष्टीस नारळाचीं ताजीं सोडणें सोलून टाकलेलीं दिसलीं तीं पाहून तो मोठ्यानें ओरडून पळूं लागला. या माणसांचा सुगावा काढण्यांत तर्क फार. माणसाशिवाय नारळ सोलणारा प्राणी नाहीं आणि चोड तर ताजें आहे त्या अर्थीं माणसें इकडे आहेत. तो दिवस लपालपींत गेला व रात्रीं पुनःसभा जमली. रात्रीं त्यानें झालेला मजकूर त्या मंडळीस सांगितला. तेव्हां एकजण छातीला हात लावून ह्मणाला, मनुष्य दिसेपर्यंत मी भिणार नाहीं. मी पुढें जाईन; त्याप्रमाणें दुसरे दिवशीं झुंजुक झुंजुक दिसूं लागतांच सर्व माणसें उठलीं. दोन नूतन प्रसूत झालेल्या व एक पोट दुखत असलेली अशा तीन स्त्रिया व नवीं जुनीं पोरें मूळ

ठिकाणावर सोडून सर्व मंडळी निघाली. मंडळी अर्धा कोस आल्यांच लेंकुरवाळ्या स्त्रियांचें चित्त त्यांच्या बाळाकडे वळलें आणि त्या तेथून परत फिरल्या. त्या आपापल्या बाळांना घेऊन कोणी जवळ कोणी दूर अशी त्यांनीं एक लांबण लावली. पुढारी चोडणाजवळ पोंचला तेव्हां त्यानें तेथें बसून त्या चोडणाचा वास घेऊन पाहिला आणि त्याला वाटलें कीं, हें चोडण आपल्याच मंडळीपैकीं कोणी टाकलें असावें. सर्व जितकीं तेथें हजर होतीं तितक्यांना विचारलें कीं हे चोडण तूं टाकलेस का ? सर्वांचा जबाब नाहीं असा आला. त्यांच्या सोलण्याच्या खुणा त्यांचे लक्ष्यांत असत. तें मीं टाकलें नाहीं ह्मणण्यापुर्वी तें सगळ्यांनीं हातांत घेऊन व हुंगून पाहिलें. जंगली लोकांचें घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असतें. कारण शुद्ध हवा घ्राणेंद्रियाची पोषक आहे. या चोडाजवळ मंडळी थबकली आणि पुढारी मात्र सारखी चोहोंकडे दृष्टी ठेवून पुढें चालला, ज्या ठिकाणावर त्याला प्रथम गलबत दिसलें होतें, त्या ठिकाणीं आतां कांहीं नाहीं असें पाहून तो बराच पुढें ह्मणजे समुद्राचे कांठावर गेला. चोहोंबाजूस समुद्रांत पाहिलें; पण त्या प्रचंड गलबताचा मागमूस नाहीं हें पाहून तो मोठ्या आनंदानें विजयी पावलें टाकीत सावकाश आपल्या मंडळींत पोंचला. मंडळी निर्भय झाल्यावर नाचत बागडत गात पुढें निघाली, ती समुद्राच्या वाळूमध्यें

येऊन पोंचली. हा पुढें आला तेव्हां इतर माणसें पाला तोडण्यांत व खाण्यांत निमग्न झालीं होतीं, बहुतेकांनीं पोटें भरलीं होतीं. याला मात्र काल संध्याकाळपासून निर्शन होतें. आपल्यावर उपकार करणाराची कांहीं तरी आपल्या हातून सेवा घडावी, हें शास्त्र जरी त्या माणसास समजत नव्हतें, तरी त्यांवर (उपकारी माणसावर) जें एक प्रकारचें सर्वांचें प्रेम जडलें त्या प्रेमानें सर्वांनीं चारा खातांना त्याची थोरवी मनांत आणून आपापल्या हातांतून उंची उंची पदार्थ ह्याजकरितां आणले. कोणी फळें आणलीं, कोणी लहान लहान रोपें खुडून त्यांच्या डिकशा आणल्या; कोणी कोंवळ्या डिक्षा आणल्या. सर्व मंडळींची बैठक समुद्राचे वाळूंत बसली व जो तो त्याला ते ते पदार्थ अर्पण करूं लागले. तो ते पदार्थ सर्वांबरोबर खाण्यास तयार होता; पण ज्यानें त्यानें पोटाला हात लावून सांगावें कीं, मी आपलें पोट भरलें आहे. तुला मात्र चरण्यास फुरसत मिळाली नाहीं ह्मणून तुजकरितांच हें आणलें आहे. त्याच्या पोटाला लागलें तेवढें त्यानें खाल्लें व शिल्लक राहिलेले पदार्थ इतरांनीं प्रसादाप्रमाणें भक्षण केले. ही राजसंस्थेची मूळ कल्पना आहे. येथून पद्धतींत हवा तितका फरक पडो; पण समाजांत समाजत्व येण्यास एकसूत्रता अशी येते. त्या मनुष्यांच्या पोटाची त्याला

आतां काळजी करणें नलगे. त्याला समाज संभाळील पण विशेष जोखमेचें काम त्याला करावें लागेल.

मागें वर्णन केलेली बाई ज्या खडकाचे आड होती, तो खडक अगदीं जवळ असून तिला हा सर्व प्रकार उत्तम तऱ्हेनें दिसत होता. पण प्रकार जरा भिन्न दिसल्यावरून तिला बाहेर येण्याचें धैर्य होईना. माणसें सर्व ओळखीचीं होतीं; पण तीं पकडलीं गेलीं अशी इची समजूत होती; फक्त आपण या जमिनीवर एकटी आहों असा तिचा ग्रह असून हें एवढें मोठें एक कुटुंब कसें ? हे विचार करीत असतां ही मंडळी नृत्य गायनास उठली. राजा प्रजा सर्व बरोबर उडूं बागडूं लागली. दिवाणखान्यांतल्या नृत्यासारखें हें नाचणें नियमीत जाग्यावर किंवा नियमित प्रमाणावर नसून दृष्टीच्या टप्प्यांत हवें तितकें नाचत जावें व परत यावें. या नाचांत एक स्त्री त्या दगडापर्यंत गेली तों तिला ही दिसली. नाच बंद करून ती ताबडतोब राजा जेथें नाचत होता त्याजपर्यंत जाऊन त्याला तिनें कंवटाळून धरलें. तो नाचाच्या प्रेमांत होता; पण हिनें त्याला उभा केला, त्याबरोबर सर्वांनीं नाच सोडून तिकडे अवधान केलें. आपल्या मंडळींतलीं जीं माणसें धरून नेलीं तीं येथें दगडाचे आड आहेत, मीं पाहिलीं अशा अर्थाचे शब्द तिनें उच्चारून दगडाकडे बोट केलें, तोंच

सर्व मंडळी तिकडे निघाली. राजा सर्वांचे पुढें होता व इतर माणसें मागें होतीं. हा देखावा पाहून ती दगडाचे आडून बाहेर पडली आणि त्या राजाला तिनें चाटलें. राजानें व इतरांनीं तिला व तिच्या नव्या मालकास मोठ्या प्रेमानें चाटलें व त्या दगडाचे जवळच त्याची समग्र मंडळी तिचा इतिहास ऐकण्यास बसली. बैठकीच्या जागा तयार करण्याचा किंवा आमंत्रणें करण्याचा खटाटोप नव्हताच. ज्या स्त्रिया समुद्रतीरीं येणार नव्हत्या त्याही लौकरच आपापलीं बालकें घेऊन आल्या होत्या, कारण मुंग्यांच्या हारीप्रमाणें लेकुरवाळ्या स्त्रियांची जी हार लागली होती, ती मागें निरोप पोचवीत. असें; आज जो राजा सिंहासनारूढ झाला तो देखावा पाहण्यास सर्व हजर होतीं. ही बाई बोलूं लागली; त्या बरोबर कांहीं तिचे शब्द व कांहीं दुसरे शब्द सर्वच बोलूं लागलीं. व खुणा करूं लागलीं. आधीं तिनें ऐकून घ्यावें हें कोणाचेच मनास येईना. कारण राजा झाला पण एक सूत्रता कोठ कोठें कसकशी असावी या विषयीं नियम ठरलेले नाहींत. पाण्याच्या मध्यें एक जमीन होती; अशा अर्थानें ती बोलतांच ज्यांनीं गलबत पाहिलें होतें तीं माणसें तिकडे तोंडें करून दाखवूं लागलीं; कांहीं पाण्याकडे जाऊं लागलीं, सगळाच गोंधळ. ती ओरडे पण तिच्या सवाई

दुसरीं ओरडत. राजाही त्यांच्याबरोबर ओरडे. त्याला जरी आपण राजा ही संज्ञा दिली तरी त्याच्यांत विशेष अक्कल किंवा व्यवस्थितपणा होता असें नाहीं. ही मंडळी नाचून ओरडून थकली व त्यांना तहानही लागली; तेव्हां त्यांनीं तळ्याचा रस्ता धरला. एक निघाला कीं, सगळीं चाललीं तळ्यावर पाणी पिऊन एका विस्तीर्ण वटवृक्षाखालीं पुनः बसलीं. कांहीं जणें वृक्षावर चढून फळें तोडतोडून खालीं टाकूं लागलीं व कांवळीं कोंवळीं पानेंही त्यांनीं डिऱ्या मोडून खालीं फेंकलीं. खालच्यानीं गोळा केलीं. ही दुसरी मेजवानी. यावेळीं राजाचेपूर्वीं सर्वांनीं मूठ मूठ फळें त्या स्त्रीस आणून दिलीं; तिला सकाळपासून खाद्य मिळालेंच नव्हतें. सर्वांचें भोजन झाल्यावर एका स्त्रीनें नव्या बाईची हकीकत राजाला विचारली; पण त्याला कांहीं कळलेंच नव्हतें, ह्मणून त्या बाईला चाटून विनंति केली कीं, तुला त्या जहाजावरून सोडली कशी तें सांग ती उठून उभी राहिली आणि ह्मणाली मध्यें कोणी बोलूं नये, तेव्हां एका पुरुषानें आपल्या तोंडावर झट्ट हात ठेवून आपलें तोंड दाबून धरलें, तें पाहून दुसऱ्यानें त्याचप्रमाणें कबुली दाखविली. हां हां ह्मणतां सगळ्यांनीं तोंडावर हात ठेवले राजानेंसुद्धां अभिमान न धरतां तोंडावर हात ठेवले. तोंडावर हात बरोबर ठेवले कीं, नाहीं हें सर्वजणें एकमे-

कांच्या कृति पहात होतीं. कोणी बरोबर बोटें ठेवलीं नाहींत, कोणी फटी ठेवल्या, कोणी तोंडें फार जोरानें दाबलीं, कोणी हात हळू ठेवला, हा जो मतभेद झाला तो पाहून एकमेकांस दुसऱ्याच्या चुकीबद्दल हांसूं येऊं लागलें आणि त्या सभेंतही व्याख्यान बाजूला राहून दोन तास सारखा हंशा पिकला. तोंडावर हात ठेवावयाचें आणि हंसायाचें. मनुष्याचा नादी स्वभाव; ज्या नादाला लागेल तिकडे लागेल. ही बाईसुद्धां हांसत सुटली; तिला ह्मणजे या वर्तनाबद्दल राग आला असें नाहीं. तिनेंही तोंडावर हात ठेवावे आणि हंसावें. नंतर ही मंडळी पुनः खाद्य आणण्यास जंगलांत शिरली. वडाचीं फळें हांसण्यांत पचविलीं. एकादवेळ हीं सारा दिवस खात सुटत व एकादवेळ सर्व दिवसभर किंवा दोन दोन दिवसही उपास काढीत. ज्या बायांचीं मुलें आजारी असत त्या त्या मुलापासून दोन दोन दिवस हालल्या नाहींत, असेंही आमचे पहाण्यांत आलें.

दुसरे दिवशी सकाळीं सभास्थानीं मंडळी जमली, त्यावेळीं सुमारें दोन घटका दिवस आला होता. कंदमुळें फळें बरोबर आणली होतीं. तीं मध्यें ठेवून सर्वांनीं मेजवानी सुरू केली. ज्याला जें हवें तें तो घेई; पण त्याचे हातातून दुसरा ओढून घेई. ज्यानें ओढून घेतलें त्याला पहिला चावे व दुसरा पळे. पण राजान

कोणाचे हातांतून कांहीं फळ घेतलें तर त्याला मात्र कोणी चावेना. किंवा त्याचे मागें कोणी लागेना. (राजांचे हातीं जें धन जातें त्यावर लोकसत्ता नसते) याप्रमाणें भोजन आटोपल्यावर मंडळी माकडांप्रमाणें गुडघ्यांवर हात टाकून स्वस्थ बसली; तेव्हां एकजण जाऊन त्या स्त्रीस हकीकत विचारूं लागला. तिच्यावर दृष्टी जातांच सर्वच तिचे जवळ जाऊं लागली. त्या लोकांनीं तिच्या भोंवती इतकी गर्दी केली कीं, आह्माला वाटलें तिला हे लोक चेंगरून मारतील. पुष्कळ माणसें तिला चाटूं लागलीं; तिनें आपलें पोर डोक्याचेवर उचलून धरलें होतें तें तिच्या हातांतून दुसऱ्या एकीनें अलग घेऊन ती त्याला चाटीत दुसरीकडे जाऊन बसली. पहा माणसाचें डोकें कसें कल्पक आहे ! ! तें पोर बाजूला होतांच ती बाई वर उठली आणि पोराकडे गेली. पोराला ती बाई इजा करणार नाहीं ही जरी तिची खात्री होती तरी त्या पोरानें सानिध्य तिला विशेष आवडे. जिकडे ती तिकडे सर्व मंडळी जाई. ही अव्यवस्था मोडण्यास एक धटिंगण उभा राहिला आणि या बाईला आपले डाव्या हातांत धरली व इतरांना उजव्या हातानें ढकलूं लागला. वेटयांना हाच वेळ सांपडला. तिचा इतिहास राहिला बाजूला. त्या बाईनें बोलण्यास आरंभ केला तेव्हां पुनः हांसाहांशी सुरू झाली; पण तिक

डे कित्येक आतूर माणसांनीं दुर्लक्ष्य केलेंसें पाहून हळू-हळू एकेक मनुष्य स्वस्थ बसलें. एकानें तिची गोष्ट ऐ-कून तिला चाटण्यास आरंभ केला; तेव्हां दुसरींही चाटूं लागलीं. तेव्हां एका बाईनें तिचें पोर उचलून वटवृक्षाव-र नेलें. त्याबरोबर तीही वृक्षावर चढली. व वृक्षाखालीं एक श्रोता उभा राहिला, तो कोणाला वर चढूं देईना. ही व्यासपीठाची व्यवस्था बरी झाली. त्या वृक्षावरून तूं आपली हकीकत सांग असें पुष्कळांनीं ह्मटलें. राजा दे-खील खालींच उभा राहिला.

मूल जसे एक शब्द उच्चारतांच त्याला खेळविणारीं माणसें वाक्य समजतात तसें या बाईचें अल्प भाषण खालील मंडळी पूर्णपणें समजत. मूल मं मं ह्मणालें तर तुला भूक लागली का, मी बाळाला जेऊं घालतें, असें आई ह्मणते. पुनः मं मं ह्मणाले ह्मणजे झाला भाताला कढ आला. बा. ह्मणजे बाहेर ने. दादा ह्मणजे दादाला हा-क मार किंवा दादाकडे ने त्याप्रमाणें तिचे एकेरी शब्द व खुणा यावरून तिचा अर्थ जसा सर्वांस कळे तसा तो आह्मांसही पण कळे. त्यांतील तात्पर्य पुढील प्रमाणें:— समुद्रांत, समुद्राचे मध्यें, समुद्राच्या पाण्यावर, समुद्रा-च्या किनाऱ्यावर नाहीं, थोडच्या पाण्यांत नव्हे, जेथें नाकाकानांत तोंडांत व डोक्यावर पाणी जातें, तिकडे अगदी लांब, सूर्य मावळतो तिकडे एक जमीन त्या ज-

मिनीवर आह्मी निराळे आह्मी. त्या आह्माला साली हो त्या (कपडे). त्या साली काढून ठेवायाच्या व अंगांत घालयाच्या. साली पातळ, साली बगळ्यासारख्या, साली कावळ्याच्या, साली फुलपाखरांच्या (ह्मणजे त्यांचे कपडे रंगीबेरंगी होते.) हातांत काठ्या समुद्रासारख्या व सूर्यासारख्या (ह्मणजे तलवारी). जमिनीला बाळें होतीं तीं वर होतीं. त्या जमिनीच्या बाळांवर बसून ते आह्मी कडेवर आले. तीं बाळें आईकडे गेलीं नाहींत व त्यांची आई बाळांकडे आली नाहीं (होड्या). एका लांकडाला दगड बांधला होता त्या दगडानें ते मोठमोठीं लांकडें तोडून टाकीत (कुऱ्हाड). त्या लोकांजवळ पारंब्या (दोऱ्या) होत्या. त्या पारंब्या लवचीक व गऊ होत्या. त्यांनीं आमचीं माणसें बांधलीं. त्या लोकांच्या पायांलाही साली होत्या व डोक्यावरही साली होत्या. ते लोक सालींत गुरफटले असून त्यांना वाटेल तेव्हां साली ते काढून ठेवीत. ते भराभर बोलत पण तें बोलणें त्यांचें त्यांत समजे. रात्र झाली ह्मणजे तीं माणसें सूर्याचे तुकडे, चंद्राचे तुकडे त्या जमिनीवर ठेवीत. त्यांना सूर्य जवळ आहे. ते सूर्य जातां जातां त्याचे तुकडे काढून घेतात. त्यांच्याजवळ असे पुष्कळ तुकडे आहेत. ते तुकडे घेऊन रात्रीं ते लोक या जमिनीवर येत. तरी त्यांच्या जमिनीवरचे तुकडे कमी

झालेसें दिसलें नाहीं. सूर्याचे तुकडे त्यांच्याजवळ इतके होते कीं एके रात्रीं त्यांनीं पुष्कळ तुकडे समुद्रांत ओतले. (दिवे मशाली व विस्तवाचे निखारे हे चंद्रसूर्याचे तुकडे). चंद्राचा एकेक तुकडा त्यांच्या डोक्यावरच्या खालीला लागलेला आहे (पागोट्याचा जर). चंद्र सूर्य ज्या ठिकाणीं रात्रीं निजावयास जातात तिकडे त्यांची जागा आहे. जशी ही जमीन आपली तशी तिकडे लांब समुद्राच्या मध्यें मोठी जमीन आहे.

ही कथा ऐकतांना सर्वांचें एकाग्र चित्त होतें व त्यांना ही गोष्ट इतकी आवडली कीं, या गोष्टीसारखें सुख कशांतच नाहीं. पुनः मंडळी त्या बाईला गोष्ट सांगण्याचा आग्रह करूं लागली. तिनें पुनः सांगितली. ही बाई त्या मंडळीला इतकी प्रीय झाली कीं केवळ ती वेदोव्यास ठरली आणि तिची गोष्ट ह्मणजे अमृत आणि तें प्राशन करण्याची ज्याला त्याला हाव आणि सर्वांची बुद्धि पूज्य. बाई सांगेल तें सर्व खरें. फावल्या वेळीं या बाईनें पुराण सांगावें व स्वस्थ बसावें. राजा व ही राणी दोन्ही सर्वांस वंद्य अणू धर्म संस्थाच आज उदय पावली. खरोखर धर्मसंस्थेच्या कल्पना अशाच बसत गेल्या. या बाईला कोणी कांहीं कोणी कांहीं आणून द्यावें आणि तिला चाटावें. राजानेंही जो त्याला आवडता पदार्थ असे तो त्यानें या बाईस आणून द्यावा.

या स्त्रीनें पाहिजे त्या पुरुषावर बलात्कार करावा व राजानें हव्या त्या स्त्रीवर जबरदस्ती करावी; तरी त्यांना उपद्रव करण्यास कोणी जवळ जाईना. यांना पुरून उरल्यास मग इतरांस संभोग आड ऊड करतां येई. ही माणसें मात्र संभोग भर सभेंत करीत. वांदरांत जसा सडे हुपट ह्मणून एक समाजाधिपती असतो किंवा हरिणांत एक काळवीट असतो तशी व्यवस्था या प्राण्यांची झाली. आतां बहुतेक स्त्रिया प्रसूत झाल्या असून त्यांच्या खानेसुमारींत मुलींची संख्या फार या खेपेस वाढली. मुलगे कमी झाले. बहुतेक स्त्रिया बाळंतिणी असून राजा मानलेला नरपशु त्यांच्याशीं संग करी. त्याचप्रमाणें ही स्त्रीही बाळंतीण होऊन महिना झाला न झाला तोंच पुरुषाची वासना तिला झाली. विशेष श्रम व काळजी नसतां पौष्टिक खाण्याची तरतूद झाली ह्मणजे हा अमंगळ प्रकार घडतो. ह्मणून श्रीमंती आली तरी व्यवसायांत असणें श्रेयस्कर आहे. या बाईनें सांगितलेली कथा ज्याला त्याला पाठ झाली. जो तो ती एकमेकांस सांगे, व बाईपासूनही ऐके. त्यावर निरनिराळे तर्क मंडळी काढी आणि एकमेकास सांगे. ती गोष्ट ऐकणारांस पटली नाही तर विशेष पुष्टीकरण किंवा सत्यता दाखविण्यास त्या बाईचें मत घ्यावें लागे.

एके दिवशीं एका स्त्रीनें गोष्ट सांगतांना त्या गो-

ष्टींत फरक पाडला. ती ह्मणाली नव्या जमिनीवर जी सूर्य चंद्राचीं बाळें आहेत तीं आपल्या बाळासारखीं बाळें नसून तीं त्यांपासून उत्पन्न झालेलीं ह्मणून बाळें ह्मटलें, ते त्यांचे केंस आहेत. केंस वारंवार तोंडानें कुरतुडले असतां वाढतात. सूर्य चंद्र जे आपले केंस कुरतडून टाकतात ते त्या जमिनीवरचीं माणसें उचलून घेतात; ह्मणून त्यांजपाशीं पुष्कळ केंस (विस्तव) जमले आहेत. ही गोष्ट ऐकणारांस रुचली नाहीं. ज्या गोष्टींची त्यांच्या डोक्यांत पुटें बसलीं तीं एकदम निघतील कशी ? त्यांनीं ती गोष्ट या बाईस येऊन विचारली, तेव्हां तिनें त्या समाजाची अशी समजूत केली कीं, सूर्य चंद्राचें सर्व चकचकीत आहे. मुलें चकचकीत तसे त्यांचे केंसही चकचकीत आहेत. आपल्याला जसें एक वेळेस एक पोर होतें तशी गोष्ट चंद्र सूर्याची नाहीं. त्यांना एका खेपेस हजारों पोरें होतात; जीं आपण रात्रीं आकाशांत पहातों (चांदण्या). आपला पुष्कळ काळ तो चंद्रसूर्याचा एक दिवस. पावसाळा लागण्यापुर्वीं (विजा चमकतात त्यावेळीं) चंद्रसूर्य स्नान करितात व केंस झाडतात. त्या केंसाचें तेज चकचकतें व त्यांतून जे तुषार उडतात तोच आपल्याकडे पावसाळा होतो. चंद्रसूर्य हीं एवढीं मोठीं माणसें आहेत.

असा प्रकारच्या काल्पित गोष्टींचा व्यूह रचत चा-

ला व या बाईला नव्या सयुक्तिक कल्पना बसवि-
ण्याचा नाद लागला. कोणा पुरुषास त्या बाईनें कांहीं
काम सांगितलें आणि त्यांत जर त्यानें हयगय केलीसें
दिसलें तर ती त्या जमिनीस पुनः येथें आणीन आणि
तुला धरून नेण्यास सांगेन, अशी धमकी देई. ती
धमकी राजालाही मोठी कठीण वाटे; व तोही तिचा
दास होऊन राहिला होता; बाकी गळबत येईल तेव्हां
इची पोपटपंची कोणीकडच्या कोणीकडेच रहाणार.

दुसऱ्या बेटावर जीं माणसें सोडलीं त्यांवर संकटें
येऊन तीं या वस्तीपेक्षां जास्त दुःखी झालीं. तीं जंग-
लांत झाडपाला खाण्यास जात तेव्हां त्यांना जंगली
जनावरें उपद्रव करीत. दोन माणसें वाघानें ठार के-
ल्याचें सर्वांनीं पाहिलें. आणि त्या वाघाला या लोकांचें
ठिकाण माहीत झाल्यामुळें आपला बचाव करण्यास
असमर्थ असा जो मानवी प्राणी तो आपलें भक्ष्य आहे
असें वाटून तो वाघ कांडवाडच्याचे किंवा कुंपणाचे बाहेर
वारंवार हिंडत असे. त्याला भिऊन मंडळी कुंपणाचे
आंत राही. वाघ आसपास नाहीं असें पाहून जवळ
जवळच्या वृक्षांवर चढून पाला काढून तो पाला कोणी
तरी कुंपणांत घेऊन येई व बाकी मंडळी ज्याच्या हातीं
जितका लागेल तितका खात. वाघामुळें हीं माणसें
त्रासून गेलीं होतीं तरी त्यांना आपला बचाव करण्या-

चा योग्य उपाय बरेच दिवस सुचला नाहीं.

एकेदिवशी एक पुरुष वाघाला टाळून कुंपणाचे बाहेर पडला; तो लपत लपत थेट समुद्रावर गेला व वाळवंटांत हिंडूं लागला. कांहीं जनावरांचा भास झाल्यास त्यानें समुद्रांत धावावें व पाण्यांत घटका घटका डुंबत रहावें. याप्रमाणें त्यांचा कित्येक दिवस क्रम चालला. आसपास कांहीं नाहीं असें पाहून तो वर येऊन पाला वगैरे खाई. त्याच्या शरीराला पाण्याचा अभ्यास होऊन त्याला तासतास पोहण्याची शक्ति आली. पोट भरलें ह्मणजे तो पाण्यांत येऊन पडे. थंडी वाजली तरी पाण्यांत जाई. ऊन लागलें तरी पाण्यांत शिरे; मिळून अहोरात्रांत त्याचे सहा सात तास पाण्यांत खर्च होत. त्याचे मनांत या बेटावर येण्याची इच्छा उत्पन्न होऊन तो पोहत पोहत या सुखी बेटावर एक दिवस येऊन दाखल झाला. आह्मांस याचें येणें आवडलें नाहीं; पण तो आल्याबरोबर वाळवंटावर असलेल्या सभेला दिसून या लोकांनीं त्याचें स्वागत केलें. राजापासून सर्वांनीं याला चाटून याचा सन्मान केला तरी धर्मगुरूबाईनें याला चाटलें नाहीं. त्या बाईनें न चाटल्याबद्दल या पाहुण्याला राग आला नाहीं पण जरा वाईट वाटलें. ती बाई या माणसाकडे तिरस्कार बुद्धीनें पाहूं लागली. मंडळीनें स्वागत केल्यावर ती बाई संतापून उठली, आणि याला कडकडाडून

चावली. त्याचा त्याबरोबर तिनें मांसाचा रवका काढला. तो दुष्टपणा पाहून तो नवा माणूस पळूं लागला. ती बाई त्याचा सूड उगविण्यास त्याचे मागून पळूं लागली. त्यांचा बेबनाव कोठें झाला हें कोणासच कळेना. एका सदृढ पुरुषास या वैराचें कारण शोधण्याची जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यानें त्या स्त्रीस धरली. तिला धरतांच ती त्यालाही कडकडाऊन चावली; परंतु तो पळाला नाहीं. त्यानें तिचें तोंड धरलें आणि असें कां करतेस ह्मणून तिला विचारूं लागला. दुसऱ्या एकानें त्या नव्या माणसास धरून ती बाई त्याला कां चावली ह्मणून विचारलें. तो ह्मणाला मला तिचा हेतु कांहीं कळला नाहीं. मग तूं आलास कोठून, कसा सुटलास, इतर लोक कोठें आहेत वगैरे प्रश्न त्याला झाले व त्यानेंही त्या प्रश्नांचीं उत्तरें त्यांस दिलीं. तीं उत्तरें ऐकून त्या मंडळीचे मनांत त्याजविषयीं अत्यंत प्रेम उत्पन्न झालें. पुनः मंडळी एकत्र होऊन बसली. त्या बाईला मात्र एक मनुष्य धरून बसला होता. मंडळी प्रश्न विचारी व तो उत्तरें देई. तीं उत्तरें त्या बाईलाही आवडत, ह्मणून तिचा कोपाग्नि शांत होत चालला. जसें व्याख्यान या बाईचें झालें तसें तें यांचेंही होण्याची मंडळीनें वेळ आणली, पण तो बोलूं लागला कीं, बाई ओरडून गोंगाट करी. त्याचें बोलणें कोणास

ऐकूं देईना. तिला समजविण्याचा पुष्कळांनीं यत्न केला, ती कोणालाच जुमानीनाशी झाली. तिचें धर्मगुरुत्व नष्ट होईल असें तिला भय पडलें असें आह्मीं ताडलें. शेवटीं बाईनें लोकांस सांगितलें कीं हा नवा मनुष्य आला व त्यानें मला चाटलें नाहीं ह्मणून मी जमिनीस बलावीन आणि ती जमीन त्याला धरून नेईल. हें ऐकून एका बाईनें त्याला सांगितलें कीं, तूं लवकर जाऊन तिला चाट. पण त्याला तिच्या जवळ जाण्यास धीर होईना; तेव्हां गुरवीण ओरडून ह्मणाली, भिऊं नको, आधीं येऊन मला चाट. त्याप्रमाणें त्यानें तिला चाटल्यावर हिनेंही त्याला चाटलें आणि दोघांची दोस्ती झाली. तेव्हां मंडळीनें थोडा पाला आणून याला खावयास दिला, तो त्यानें थोडा खाल्ला. चावलेल्या जाग्याची आग होत होती, ती जखम मायाळू स्त्रिया चाटीत होत्या. अशा वेळीं सर्वांचें लक्ष्य त्या नव्या मनुष्याचे भाषणाकडे लागलें व तो पुढील प्रमाणें बोलूं लागला:—आह्मांला सुकलेल्या माशांवर (गलबत सुकलेला मासा अशी याची कल्पना आहे. हा गलबताला जमीन ह्मणत नाहीं) राहणाऱ्या माणसांनीं धरलें आणि लांब लांब त्या माशास पळविलें. मासा धांवतो, मासा हळू चालतो, मासा बसतो. तो मासा पाण्यांत बुडी मारीत नाहीं, त्या माशाला पोरें असतात, त्या पोरांवर बसून आह्मी जमिनीवर गेलों.

जमीन ती ? काय सांगावें केवळ जमीन, खरोखर जमीन. जमिनीवर वाळू असते तशी तिजवर वाळू. जमीनीवर झाडें असतात तशी तिजवर झाडें; समुद्र आहे, झरा आहे, घोंडे आहेत, माती आहे, अगदीं हुबेहुब जमीन. मोठी जमीन, पाऱ्याची जमीन, सूर्य उगवणारी जमीन, रात्र होणारी जमीन. हीच जमीन. त्या जमीनीवर येथल्या सारखीं झाडें वारा उत्पन्न करतात. जमीनीवर उठायाचें, जमीनीवर बसायाचें, जमीवर थोडीं माणसें, जमीनीवर तुह्मी नाहीं बाकी सगळी जमीन.

एवढें यानें पुराण सांगून या माणसांची जिज्ञासा वाढविली. जो तो प्रश्न करी, अशी जमीन ? सुखी जमीन ? गोड पाण्याची जमीन ? सूर्याच्या अलिकडची जमीन ? सूर्य तेथून दिसतो काय ? सूर्याचे केस किती आहेत? जमिनीवर चंद्राचे केंस पडले असतील नव्हे काय ?

बेटा हा जो जमीन जमीन घोकीत राहिला त्यापेक्षां वृत्तांत कांहींच सांगितला नाहीं. दुसरे दिवशीं या मनुष्यानें त्या बाईचें पुराण श्रवण केलें; पण त्यांत त्याला बऱ्याच चुका आढळल्या. त्या चुका त्यानें तिला सांगितल्या; पण ती थोडीच त्याचें ऐकतें, एकदां जी तिची छाप पडली ती पडलीच.

हा दुसऱ्या बेटावरून आलेला मनुष्य येथील राजापेक्षां व धर्मगुरूपेक्षां श्रेष्ठ होता. देशाटनानें मनुष्यांत जो

सहाजिक चौकसपणा येतो तो याच्यांत आलेला होता. धर्मगुरूबाईनें सांगितलेलें पुराण जरी सर्वांस आवडे तरी याला त्यांत पदोपदीं खोटेपणा आढळे. ती जमिनीस आ-धीन ह्मणाली तर इतर माणसें भीत, पण हा भिईनासा झाला. प्रथम दिवशीं ती बाई त्याला चावली तेव्हां तो घाबरला, कारण त्यानें समाज तोलला नव्हता; आतां या समाजाची अक्कल, शक्ति, कल्पकपणा यानें तोलून घेतला. एके दिवशी ती बाई गोष्ट सांगत असतां हा तिला कांहींसें बोलला; त्याबरोबर ती याला येऊन चावली. तो बाजूला जाऊन त्यानें एका निरगुडीची एक चिवट काठी मोडली आणि त्या काठीनें या बाईची पाठ फोडून काढली. बाई पुढें पळे व हा मागून मारीत चालला. राजासह सर्व माणसें चोहोंदिशीं पळालीं. हा जय झाल्याबरोबर तो जणूं त्या बेटाचा मालक ठरला. इतर माणसें काठचा ऊर्फ होलपांडे करवंदीच्या झाडांवर मारीत असत. पण त्यांचा माणसांवर झालेला प्रयोग या लोकांनीं आज पाहिला. दोन दिवसांत कोणी माणूस याच्या वाऱ्यास उभे राहिना. राजा पद-च्युत झाल्याचा भास होऊं लागला. जिकडे तिकडे फाटाफूट होऊन समाज पुनः विसकटला. जो तो आ-पला बचाव करण्यांत तत्पर राही. याचा कोप कायतो एका बाईवर होता; पण तो आपल्या सर्वांवर आहे असें

बाटून कोणी जवळ येईना. हा तर इतर माणसांस शोधीत राही. दृष्टादृष्ट झाली कीं माणसें पळत. यानें रात्रंदिवस हत्यार सोडलें नाहीं. केव्हां केव्हां याच्या हातीं पोरें लागत, त्या पोरांस हा कंदमुळें देई व कठीण पदार्थ आपल्या दाढेनें चावून त्या पोरांचे तोंडांत घाली. तें पाहून कित्येकांचे लक्षांत आलें कीं, हा बाळांचा मोठा अभिमानी आहे. या लोकांची जी वटवृक्षाखालीं सभा भरे तें यांचें वसतिस्थान झालें. तो जरी दिवसभर वण वण करी तरी रात्रीं त्या झाडावर येऊन निजे. मुलांना खाण्यास उत्तम पदार्थ मिळतात व उपद्रव्यापाशीं उपद्रव होत नाहीं असें जेव्हां स्त्रियांचे दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां त्यांनींही रात्रीं आपलीं मुलें आणून तेथें निजवावीं. गुरविणीचें पोर तर सर्वस्वी याच्या अंगावर पडलें होतें. तिचा हा शत्रु झाला; पण पोराला जीव कीं प्राण करी. त्याला कंदमुळें चावून चारी; पण पोर अगदी लहान असल्यामुळें दुधासाठीं रडे. गुरविणीला पोरासाठीं धरण्याच्या विचारांत हा होता; पण ती जी एकदां दृष्टीआड झाली ती पुनः याला दिसली नाहीं. या पराक्रमाचे चौथे दिवशीं एक स्त्री याला आटोक्यांत आढळली आणि यानें तिचा पाठलाग केला. आजपर्यंत विशेष जरूरीचे पाठलाग झाले नव्हते; पण आज तर यानें त्या स्त्रीस गांठलेंच आणि केंस धरून उभी केली.

तिला पोटाशीं धरली, चाटली, तेव्हां तिची खात्री झाली कीं हा आपला शत्रु नसून मित्र आहे. तिला तो वटवृक्षाखाली घेऊन आला. खाण्याचे पदार्थ अर्पण केले. तिजशीं संभोग करून तिला खुष केली आणि मग गुरविणीच्या पोराला पाजण्यास तिला त्यानें सांगितलें व तिनें तसें केलें. पाठलाग करतांना पोर टाकून ती पळाली होती, तें पोर यानें जाऊन आणलें. आतां हें एक लहानसें कुटुंब बनलें. नवरा बायको हीं दोन पोरें व एक दोन फालतू पोरें तेथें असत. हा रानांत जाऊन फळफळावळ आणून येथें टाकी व ही गृहिणी त्या संपत्तीचा मितव्ययानें उत्तम बंदोबस्त करी. नारळीवरील नारळ काढण्यास इतर माणसें धजावत नसत; कारण झाडावर चढल्यास आपल्यास शत्रू गांठील; असें त्यांस भय वाटत असावें. हा नारळाच्या पेंढ्या काढून आणी. आणि याची पत्नी ते नारळ सोलून फोडून खोबरें चावून त्यांचें दूध पोराच्या तोंडांत घाली. या दुधाला पोरें लुब्ध असत. यामुळें अंगावरच्या दुधाचीही त्यांना विशेष पर्वा नसे व या उंची खाण्यानें तिला दिवसेंदिवस जास्त दूध सुटूं लागलें, तें हा पीत असे. मुलांचीं पोटें भरलीं असें या जोडप्यास कळलें म्हणजे ती स्त्री याला स्तनपान करवी. यानें स्तनाला तोंड लावलें म्हणजे तिला पान्हा फुटे.

याला स्तनपानाची गोडी लागून हा वारंवार स्तन-

पान करूं लागल्यामुळें मुलांची जरा आबाळ होऊं लागली. एके दिवशीं दुसरी एक स्त्री याला अशीच भेटली; तिलाही त्यानें पकडली व तेथल्या तेथें स्तनपान करून सोडून दिली. ती बातमी इतर स्त्रियांस कळतांच त्या जरा धीट होऊन रानांत संचार करूं लागल्या. याच्या एका हातांत एक काठी व दुसऱ्या हातांत एक दोन नारळ असत. कोठें स्त्री आढळल्यास तिला धरावी, दूध शोषण करावें, तिला चाटावी आणि नारळ देऊन रवाना करावी, असें बाहेरच्या बाहेर स्तनपान मिळाल्यास हा आपल्या पत्नीच्या दुधाची पर्वा करीत नसे. तो बाहेरून आल्याबरोबर पत्नी आपलें स्तन त्याच्या तोंडाजवळ नेई, पण तो पोरांकडे बोट करी.

आज असा भास होतो कीं, या बेटाचा राजा हा मनुष्य असून त्याचें मुख्य खाद्य दूध आहे. नारळाच्या आशेनें ज्या स्त्रिया नारळीच्या झाडांकडे येत, त्यांना दूध हाच कर भरून नारळ काढण्यास परवानगी होत असे असें झालें. पुढें हा कर किंवा सारा देण्यास सर्व स्त्रिया तयार झाल्या व तें दूध हा आपण पिई, बायकोस पाजी व पोरासही पाजवी. राजाला उंची पदार्थांचे भोग असें साहजिक मिळूं लागले. त्या बेटावरील स्त्रिया ह्या या घराण्याच्या शेळ्या किंवा गाई बनल्या. पुरुषांना मात्र पुरुषत्व नाहिसें झालें. ते कोणीकडच्या को-

णींकडे लपून छपून आपले दिवस पार पाडीत असत. त्या पुरुषांना, या स्तनपान करविणाऱ्या स्त्रिया जुमानीत नसत. स्त्रिया दिवसेंदिवस सबळ होऊन पुरुष निर्बल होत चालले. स्त्रियांना वाटेल तर त्यांनीं पुरुषांची जरूर बाळगावी नाहीं. तर स्त्रीपुरुषांची गांठ नाहीं. या स्थितींत हा समाज असतां पुनःएक वेळ स्त्रिया गरोदर राहिल्या व त्यांस पोरें झालीं. राजाच्या बायकोस मुलगा झाला व इतरांस बहुतेक मुली झाल्या. पुरुष निर्बल झाल्यानें संतति विशेषतः स्त्री जातीय होईल. स्त्री पुरुष दोन्ही निर्बल झाल्यास संतति अल्पायु होईल. या वेळीं यानें आपली सुश्रुशा करण्यासाठीं चार पुरुष धरून आणले होते व त्यांना गुलामांप्रमाणें वागविलें जाई. पडेल तें काम करावें आणि मिळेल तो झाडपाला खावा. किती अल्प काळांत क्रांति होत ही! क्रांती इतकी लौकर होण्याचें कारण अज्ञान.

तिसऱ्या पाळीला स्त्रियांचीं बाळंतपणें करण्याचें काम पुरुषांकडे राहिलें नसून तें स्त्रियांकडेच आलें. कारण स्त्रियांचा समाज नारळी बागेंत राही व त्या बाजूला पुरुष तर या नव्या राजाच्या किंवा राक्षसाच्या भयानें येऊं शकत नसत. स्त्री बाळंत होण्याचे वेळीं बहुतकरून समुद्राचे वाळंवटांत जाई. पोर उपजल्यावर सुखवस्तु स्त्रियांचा रक्तस्राव जितका होतो, तितका

तो यांचा होत नव्हता असें आमच्या लक्ष्यांत आलें. मूल उपजलें ह्मणजे तें कमळाच्या पानावर वाळूच्या खोलगट जाग्यांत ठेऊन प्रसूती समुद्रांत छातीभर पाण्यांत जाऊन फिरे व तिकडून आल्यावर पोराला चाटून साफ करी. पहिल्या खेपेसही कांहीं स्त्रियांनीं असें केलें असेल; पण तें आमचे ध्यानांत आलें नाहीं. आजच्या प्रसंगीं तर हा प्रकार बहुतेक झाला. एक स्त्री समुद्रापासून जरा दूर असतां बाळंत झाली, आणि तिला प्रसूति वेदनांनीं जरा दुःखी केलें ह्मणून ती समुद्रांत जाऊं शकेना; तिला अन्य स्त्रियांनीं धरून समुद्रकांठीं नेली आणि तिचें इंद्रिय धुण्याचा सपाटा सुरू केला. आधीं तर गुडघाभर पाण्यांत तिला धुतली आणि मग बाहेर आणून इतर स्त्रियांनीं तोंडांत पाणी घेऊन तें पिचकारीप्रमाणें * * * सोडलें. या बाईच्या मुलाला इतर स्त्रियांनीं चाटलें.

आह्मी आज सर्व गोष्टींत सुधारलों असें मानतों; पण कांहीं बाबतींत आह्मी सुधारणेच्या तळांत किंवा कुधारणेच्या शिखरावर आहों ह्मटलें तरी चालेल. आज तीन खेपांत यांपैकीं एकसुद्धां स्त्री प्रसुतींत दगावली नाहीं आणि आमच्या शेंकडा सात आठ स्त्रिया तत्काळ किंवा त्या रोगानें मरतात. कोणा स्त्रीला बाळंतरोग होतो, कोणा स्त्रीस धुपणी लागते, कोणाची कंबर जाते आणि कोणी वेदनांत राम ह्मणते. कारण आमचें

वैद्यशास्त्र उलटें आहे. गरोदर स्त्रियांना एक ठिकाणीं लाडानें बसविण्यांत सासवा आणि आया कौतुक समजतात. त्यायोगें पोर पोटांत फाजील प्रमाणानें पोसलें जाऊन त्याच्या बाहेर येण्याच्या मार्गापेक्षां मोठें होतें; तसें तें या स्त्रियांचें होत नाहीं. प्रसूति कालापर्यंत यांचा व्यायाम असतो. प्रसूतीची योजना करतांना घरांतलि व शेजारपाजारच्या आया बाया गरोदर स्त्रीवर एक प्रकारचें भय उत्पन्न करतात. तीं माणसें समजतात जणूं आपण तिची काळजी वाहतों आहों. "एका जिवाचे दोन जीव एकदां होतील तेव्हां निभावलें;" भलत्या सलत्या अडलेल्या बायांच्या भयंकर गोष्टी सांगून गर्भधारिणीची उमेद नाहींशी करतात. तो प्रकारही येथें नाहीं. समाजांतील कांहीं स्त्रियांना बाळंतपणांत होणाऱ्या खर्चाची काळजी असते, मुलगी झाली तर अनिष्ट असें वाटत असतें, पण या ठिकाणीं बाळंतपणाच्या खर्चाची किंवा मुलगी झाली तर तिच्या हुंड्याची कल्पनाच नाहीं. वस्तीमध्यें बाळंतिणीची खोली म्हणून जी जागा करण्यांत येते तो केवळ नर्कवास आहे. त्या खोलींत हवा आणि उजेड नसावयाचा. जी काय हवा यावयाची ती मोरीच्या भोंकावाटे; अर्थात सर्द आणि रोगट हवा घेण्यापुरतें खोलीला छिद्र. त्या मोरीच्या तोंडालाही दगड बसवितात. कांहीं लोकांत पहिल्या

दिवशीं जें पाणी बाळ बाळंतिणीला धुण्यास लागतें तें त्या खोलींत खळगा खणून तेथल्या तेथें जिरवितात. कारण विचारतां असें म्हणतात कीं, तें पाणी बाहेर दिसल्यास त्या पाण्यावरून चेटकी माणसें चेटकें करतात व त्यापासून बाळ बाळंतिणीला अपाय करतात. आपल्या लोकांत मोरीची सोय नसल्यास असें करतात व तैलंगी लोकांत मोरी असली तरी असें केलेंच पाहिजे. बाळंतिणीचे कपडे ह्मणजे कुजकट घाणेरडे असायाचे; ह्मणून प्राणरक्षक वायूचा तेथें शिरकाव होत नाहीं. जो थोडा बहुत प्राणरक्षक वायू असतो तो बाजेखालीं शेगडी ठेवून जाळून टाकतात. प्राणरक्षक वायु प्राण्याचें व विस्तवाचें जीवन आहे. तें जीवन शेगडींतील विस्तव खाऊन जातो; मग बाळंतिणीच्या वांट्यास प्राणनाशक वायूच रहायाचा. रक्तस्राव झाल्यानें अ.धींच स्त्रिया क्षीण होतात; तशांत त्यांना शेकणें ह्मणजे तिचें रक्त कमी करणें आहे. या वस्तीला तर विस्तव अद्याप माहीतच नाहीं.

आपल्या स्त्रियांना नेहमीं भात वरण पचविण्याची संवय असून बाळंतपणीं त्यांना सांजा जो पचनाला अत्यंत कठीण असा पदार्थ देतात. तीन तीन दिवस स्त्रियांना मलविसर्जन होत नाहीं अशा स्थितींत अगदीं हलकें अन्न ह्मणजे साबुतांदुळाची खीर भात वगैरे देणें इष्ट आहे, पण तसें करा ह्मणणें ह्मणजे आंगावर जो-

खोंस घेण्यासारखें आहे. बाळंतपणीं त्यांना थोडा ताप असतो ह्मणून आपले लोक दूध तर दाखवीतही नाहींत. दुध काढल्या बरोबर देणें किंवा तापवून देणें कुपथ्य नाहीं.

आज कालच्या सुधारणेंत कुपथ्याला पथ्य मानण्याचा प्रचार कां पडला असावा याचा विचार करतां असें आढळून येतें कीं, जो वेडगळपणा श्रीमान् लोकांत भरला आहे त्याला साधारण जन समूह शहाणपणा समजतो आणि त्याचें अनुकरण करतो. लग्नांत श्रीमान लोक लाडू करतात, गरीबही लाडू करूं लागले; कारण श्रीमान ह्मणून घेण्याची हांव. नाहीं तर भाकरीवर लग्न होणार नाहीं असें नाहीं; पण श्रीमंतांच्या रस्त्यानें जाण्याचा जो समाजाचा कल आहे त्या कलाला औषध नाहीं. श्रीमंतांच्या चालीरीतींना वळण देण्याचें काम तर ब्रम्हाच्या बापाच्यानें होणार नाहीं. प्रसुति विषयाची खानेसुमारी काढूं गेल्यास गरीब लोकांच्या स्त्रिया जास्त जगतात, मध्यम प्रतीच्या स्त्रिया अधीक मरतात व श्रीमंतांच्या शेंकडा ७९ मरतात ह्मटलें तरी चालेल. इनामदार जहागीरदार वगैरे लोकांच्या स्त्रिया पहाव्या तेव्हां तरूण. चौकशी अंतीं समजतें ही तिसरी, ही चौथी, ही पांचवी. हा बेट्यांचा चांगलेपणा. श्रीमंतांना पोरें होत नाहींत, यांतही पालन पद्धतीची चूक आहे; पण ती कोणी कबूल न करतां नशिबाला दोष देतील. असो.

बाळंतिणीला धुण्यांत जी आजकाल हयगय होते, त्यायोगें नासकें रक्त शरीरांतील स्वच्छ रक्ताशीं मिळून शरीर दोषी करतें. इंद्रियाचे आंत कांहीं नाजूक भागावर पोराच्या बाहेर पडण्यानें चरे पडतात ते धुतले गेले पाहिजेत. हें ज्ञान या स्त्रियांस जरी शास्त्रीय पद्धतीनें शिकविलें गेलें नाहीं तरी त्यांना तें आपोआप आलें. समुद्राचें पाणी फार गार नसतें आणि घाण काढून टाकणारें आहे. असें स्वच्छ धुणें न झाल्यानें रोग होतात हें त्यांस कळलें असेल; ह्मणून समुद्राचें पाणी चुणचुणलें तरी त्यांत फिरण्यास या स्त्रिया आळस करीत नसत. फिरण्याच्या व उठण्याबसण्याच्या कृतीनें त्यांच्या शरीराचा भाग स्वच्छ धुतला जाई.

जिकडे तिकडे नारळी बाग पोरांच्या रडण्यानें नादावून गेली आहे, अशा समई कोणा हद्दपार केलेल्या पुरुषांचे कानीं ते मधूर आवाज पडल्यास तो आपल्या मंडळींत ही सुवार्ता पसरी. स्त्रियांविषयीं त्या पुरुषांत अत्यंत प्रेम होतें; पण स्त्रिया बेपर्वा असल्यामुळें भेटी क्वचित् काळीं होत. या स्त्रियांचें प्रेम राजावर असे. राजाचें सान्निध्य त्यांस फार आवडे. पोरें पीत असतां राजा जवळ आला तर पोराला एकीकडे ठेवून त्याचे तोंडांत स्तन देण्यास सर्व स्त्रिया तत्पर असत. तो झाडांवर चढून नारळ गराभर खालीं टाकी व खालीं उत-

रून पाहिजे तिकडे चालता होई. तो नसतांना नारळी-वर कोणी चढलें तरी त्याची मनाई नसे; पण तो आप-ल्या खुषीनें ही चाकरी बजावी. दूर असलेले पुरुष, पोरें व स्त्रिया पहाण्याचें वारंवार विचार करीत; पण काठीची आठवण झाली कीं, त्यांची इच्छा मरत असेल असें त्यांच्या कृतीवरून दिसे. त्यांपैकीं कांहीं पुरुष रात्रीं सामसूम झाल्यावर पोरांचे आवाज कानीं पडावे ह्मणून नारळी बागेचे आसपास येऊन बसत. पहाटेस परत गे-ल्यावर मी पांच पोरांचें रडणें ऐकिलें व दोघां स्त्रियांनीं रडणें बंद करण्याकरितां गाणें गाइलें तें ऐकिलें; काठी-वाल्यास मी दिसलों नाहीं व त्यानें मला मारलें नाहीं. अशी ही मंडळी आळीपाळीनें येऊं लागली आणि त्यांचे येणें जाणें कोणास कळतही नसे. एकादे रात्रीं सगळेच सगळे येऊन चार चार तास बसत आणि नंतर परत जात. यांच्या वसाहतीकडे काठीवाला विशेष जात नसे व लोकही इकडे राजरोस येत नसत. स्त्रिया मात्र भक्ष्य मिळविण्याकरितां कचित् त्या बाजूला संचार करीत, पण हल्लीं तर त्या इतक्या लांब जातच नसत. एके दिवशीं पाहणी करण्याकरितां आह्मी नारळी बागेचे शे-जारी आलों. आमच्या मतें आह्मांस कोणी पहात नसेल; पण जमलेल्या पुरुषांपैकीं एकाची दृष्टि आह्मांवर पड-तांच तो मोठ्यानें ओरडला; त्याबरोबर सर्वजण ओर-

हून पळत सुटले. त्यांच्या ओरडण्यांतला शब्द " काठीवाला " असा होता. ही ओरड ऐकून सर्व बायकाही ओरडूं लागल्या. काठीवालाही ओरडत पळूं लागला. जिकडे तिकडे ओरडाओरड आणि पळापळ.सर्वांचा एक समज झाला कीं, धरून नेणारें जहाज आलें. माणसें ज्याला जेथें जागा मिळाली तेथें एकेक किंवा जोडी जोडीनें लपलीं. राजाचा राजेपणा गेला आणि प्रजेला मालक नाहींसा झाला, गुलामांवरचा राजाचा हक्क उडाला; स्त्रियांचें हवें तेव्हां मिळणारें दूध बाटेस लागलें, आणि राजाला राणी नाहीं, राणीला राजा नाहीं, नवीन झालेलीं पोरें मात्र बायकांनीं सोडलीं नाहींत. दोन खेपांचीं पोरें पोरकी होऊन रानांत सैरावरां पाला खात फिरूं लागलीं. त्या बिचाऱ्यांना भय कशाचें तें माहीत नव्हतेंच. बाकी लोकांना भय उत्पन्न झालें तें खोट्या ज्ञानानें. खरें ज्ञान संकटाचाच नाश करतें, मग भय राहील कशाचें. भयाचें बीज संकट. पुरुष मंडळी कांहीं परचक्राला भ्याली नाहीं; बायका ओरडल्यावरून काठीवाला आपल्या पाठीस लागेल हीच त्यांची कल्पना. तीन दिवस ते डोंगरांतून खालीं उतरले नाहींत. चौथ्या रात्रीं कांहीं मंडळी पूर्वजागीं आली, सर्व सामसूम पाहून परत गेली. पांचवे दिवशीं सगळीं पलटण खालीं आली आणि त्यांस आढळलें कीं, काठीवाल्यासह सर्व बायकांचा प-

त्ता नाहीं. आतां नारळावर आपली सत्ता झाली. आधीं मंडळीनें नारळांची फार दिवस अंतरलेली मेजवानी उडविली आणि मग फिरत फिरत राजधानीच्या शहरीं किंवा राजवाड्याकडे गमन केलें. वटवृक्ष हा राजवाडा. त्याचेखालीं यांना विपूल संपत्ति सांपडली, ती येणेंप्रमाणें:—

एक नारळांच्या करवंट्यांचा ढीग, पांच नारळीच्या पातींच्या टोकऱ्या, ज्यांत कमळाचें ताजें पान ठेवून पाणी आणतां येतें. दोन सुरेख करट्या; एकीच्या भोंकांत पक्ष्याचा पर नळीसह घट्ट बसविला होता. त्या करटीनें मुलांस करटींत काढलेलें दुध किंवा नारळाचा रस सांडल्याशिवाय पितां यावा. दुसऱ्या करवंटीची शेंडी भोंकाच्या बाजूनें ठेवून बाकी काढून टाकली होती. भोंकाभोंवतालच्या शेंडीची मोठ्या कुशलतेनें नळी बनविली होती. ती नळी मुलानें तोंडांत धरली असतां अचुक दुध तोंडांत जावें. एक काथ्याचा गुडघाभर उंच बिछाना. या बिछान्याचा काथ्या असा गुंतविला होता कीं, कितीही वारा आला तरी काथ्या उडूं नये. बिछान्याचा पृष्टभाग रंगीबेरंगी पिसांनीं मढविला होता. ती शोभा पाहून जंगली माणसें तर थक्क झालींच, पण शहरांतले कारागीरही तें कसब पाहून चकित झाल्याशिवाय रहाणार नाहींत. एक वडाच्या पारंब्यांना वेलीचें टोंपलें टांगलें होतें; त्यांत बिछान्याकरितां गुंतवळ

भरलें होते, तेही उडूं नयेत असे बंदोबस्तानें गुंतविले होते. एक नारळाच्या पातींची केरसुणी होती, तिच्या पाती झिजून हीर बाहेर पडले होते. एक कुऱ्हाडीसारख्या धारेचा दगड होता.

ही संपत्ति या मंडळीनें पाहिली, पण उपयोग कोणत्या वस्तूचा काय हें यांस बरोबर कळलें नाहीं. बिछाना व पाळणा यांचा उपयोग सर्वांस कळला. कोणी पाळण्यांत बसून झोंके घेई आणि कोणी बिछान्यावर लोळत. दोन दोन वर्षांचीं पोरें खेळविण्याचें काम चार वर्षांच्या पोरांकडे होतें. तीं झाडपाला खाण्यास जीं उजाडतांच गेलीं होतीं, तीं एकेक येऊं लागलीं. त्यांना पाहून या मंडळीस एका बाजूनें आनंद झाला; पण दुसऱ्या बाजूनें भय वाटूं लागलें. तीं पोरें जवळ आल्यावर सर्वांनीं त्यांस चाटलें आणि त्यांजपासून माहितीही करून घेतली. या समाजाचें ज्ञान अल्प असल्यामुळें तीं चार वर्षांचीं पोरें ज्ञानांत मोठ्या माणसांची जवळ जवळ बरोबरीच करीत होतीं. त्यांनीं या राजकीय संपत्तिचा उपयोग या मंडळीस सांगितला व सर्वांच्या आया पळाल्याचेंही वर्तमान सांगितलें. आज या बेटावर प्रजासत्ताक राज्य आहे; उद्यां काय होतें नकळे.

या मंडळींत आज जास्त धैर्य दिसूं लागलें. त्यांनीं निर्भयपणें तेथें मेजवान्या केल्या. मुलांना खोबरें व कंद-

सुळें पोटभर खाऊं घातलीं आणि तो दिवस सुखानें घा-लविला. रात्रीं बिछान्यावर एक जाऊन निजे, तों दुसरा त्यास खालीं लोटी, व आपण सुखोपभोग अनुभवी, इत-क्यांत तिसरा त्याला ढकली. झोंपेची वेळ होईपर्यंत ही ढकलाढकली चालली होती. यानें सर्वांस उत्तम झोंप आली. सकाळीं उठल्यावर रात्रीचा ढकला ढकलीचा नाद आठवून मंडळी बिछान्यावर धुडकूस घालूं लागली. तें पाहून चार वर्षांच्या एका पोरानें बिछान्याखालीं हात घालून तेथून एक छडी काढली आणि बिछान्यावर लो-ळणाराच्या पाठींत मारली. तो पाठ चोळीत जरा दूर पळाला, हें पाहून बिछान्याखालीं काठ्यारूपीं संपत्ति असल्याचें दुसऱ्या एकास दिसलें. त्यानेंही तेथें हात घालून पांच काठ्या काढल्या, व जो तो तें धन काढूं लागला. सर्वांच्या वाट्यास एकेक काठी येई, यापेक्षां तेथें काठ्या अधीक होत्या.

सर्वांस एकेक काठी मिळतांच यादवी सुरू झाली. एकमेकांनीं एकमेकांवर काठ्यांचे प्रयोग चालविले. थोड्याच वेळांत मारामारी विकोपास जाऊन तेथें दोन खून पडले. तीं क्षणसें काठ्यांचे प्रयोग करतां करतां मल्लयुद्धावर येऊन एकमेकांस चावूं लागलीं आणि त्यांचें तें दुष्ट कृत्य पाहून इतरांनीं त्यांच्यावर काठ्यांचा व-र्षाव तर केलाच; पण तेवढ्यानें समाधान न होतां कु-

ऱ्हाडीच्या धारेसारखा जो दगड तेथें होता तो हातीं घेऊन एकानें त्यांचे डोक्यांवर मारून डोकीं फोडलीं. हा भयंकर देखावा पाहून सर्वांनीं त्या काठ्या तेथें प्रेतांजवळ फेंकून रस्ते धरले. जो तो उदास दिसे. जळो तें राज्य, राज्याची कल्पना नको. संपत्ति ती काय तर नारळाच्या करट्या आणि त्याकरितां विनाकारण दोन खून.

मंडळी सैरावैरां भटकूं लागली. राजा, प्रजा, गुलाम, धनी, नवरा, बायको वगैरे जीं बंधनें जुळत चाललीं होतीं तीं तुटलीं, स्त्रियांत मुलांविषयींचें बंधन मात्र कायम राहिलें. चार दिवसपर्यंत हा समाज जनावरांप्रमाणें राहिला. पांचव्या दिवशीं राजाला त्याचे गुलाम सांपडले. त्यांना आपल्याबरोबर तो येण्यास हुकुम करूं लागला; पण त्यांनीं हातांतील काठ्या पडताळून सांगितलें कीं, तुझें आह्मी ऐकणार नाहीं. तूं काठी मारलीस तर तुला आह्मी मारूं. कारण यांना ती विद्या आतां अवगत झाली होती. जो तो स्त्री असो अगर पुरुष असो शस्त्रधारी झाले. सर्वांच्या हातांत काठ्या. जिकडे तिकडे एकमेकांचा अविश्वास, मनुष्याजवळ मनुष्य येणें कठीण झालें. पाला खाणें किंवा पाणी पिणें तेंसुद्धां जवळ मनुष्य आल्यास दूर जाऊन प्यावयाचें. मुलें आयाशिवाय इतर माणसांस पाहून पळत सुटत. कोणी कोणाला सल्ला मसलत देण्यास किंवा चाटण्यास-

ही जाण्याची वेळ राहिली नाहीं. केळीच्या झाडांवर-सुद्धां चढणें भयंकर झालें, मग नारळीवर कोण चढतो? केळीवर कोणी चढून केळें काढतांना पाहिलें तर दुस-ऱ्यानें त्याला काठीनें झोंडपावें. त्याचे हात झाड धर-ण्यांत गुंतलेले असावेत आणि खालच्यानें त्याच्यावर झोड उडवावी. वरचा मनुष्य बेदम होऊन खालीं पड-ला कीं, त्याला चावून त्याच्या नरडीचा घोट घेण्यास खालचा तयार. अशा कित्येक चकमका झाल्या; पण प्रत्यक्ष खून एकच पडला. ज्या मनुष्यानें हा खून केला तो सदृढ असून थोडा कल्पकही होता. केळी-वरच्या माणसाचे हातांत काठी होती, पण त्या मनु-ष्यास तो वळूं देईना. त्यानें याजकडे तोंड केलें कीं, हा त्याचे पाठीकडे जाई. शेवटीं वरच्या माणसानें खालीं उडी टाकली. तो जमिनीवर पडतांच खालच्यानें त्याला तेथल्या तेथें दडपला आणि त्याचा गळा फो-डला. त्याला तात्काळ ठार करून यानें त्याचें रक्त अंगास फांसलें आणि त्या रंगांत नाचूं व गाऊं ला-गला. कांहीं माणसें दुरून गेलीं, पण त्यांजवर यानें हल्ला केला नाहीं व तींही या बाजूस वळलीं नाहींत. त्यांना याच्या अमानुष कृत्याबद्दल भय वाटलें असावें. त्यानें यथेच्छ केळीं खाल्लीं आणि काठी हातांत घेऊन फिरत होता. आयांची प्रीति मुलांवर जास्त जडली.

त्या अगदीं काळोख पडेपर्यंत निजत नसत व सकाळीं उजाडण्यापूर्वीं उठत. पुरुष आपापलें खाणें रात्रीं दिवसा आपला जीव संभाळून खात; पण स्त्रियांना मुलांचें व आपलें रक्षण करावें लागत असल्यामुळें अति त्रास पडे. एवढें खरें कीं, जास्त विपत्तिनें किंवा जास्त त्रासानें प्राणी चपळ होतो. हरणाला पळण्याचा अभ्यास होण्यास कारण वाघ. शहरांत पोसलेल्या म्हशीपेक्षां धनगरांच्या म्हशी चपळ असतात. तसें या वस्तींत हळीं चापल्य दिसूं लागलें. चापल्य असेल तेव्हां एकी नसते आणि एकी असते तेव्हां निरर्थक आळस उत्पन्न करण्यापुरती होते; अशा ठिकाणची मानवी जात सुख संपादन करूं शकत नाहीं. या मंडळीला दूरच्या मनुष्यावर हल्ला करण्याची ही युक्ति आठवली. शत्रू दूर दिसल्यास त्याजवर दगड फेकले जात व तें निशाण बहुतेक अचूक जावयाचें. दगड येतो असें पाहून तो चुकविण्यांत ही मंडळी तरबेज होऊं लागली. माकडावर दगड मारला असतां तें झटदिशीं मान बाजूला करून दगडाला वाट देते, तोच देखावा यांच्यांतही दिसे. नारळीच्या झाडावर चढण्याचें साहस कोणी करीत नाहींसें झालें, केळीचें झाड मात्र मोडून केळीं खाल्लीं आढळत. व मोडलेल्या केळींतील काल व केळीच्या मधील कोंवळ्या पानांच्या सुया हीं

माणसें खाऊं लागलीं. जो तो सतत हत्यारबंद असे. केळीच्या सोपाला बांधलेली काठी कोणी खांद्यांत अड-कावलेली असे तर दुसऱ्यानें तो दोर गळ्यांत बांधून काठी पाठीवर लोंबत ठेविली असे. कोणी कंबरेभोंवतीं कड-दोऱ्याप्रमाणें सोपट बांधून त्याला काठी बांधी व हातांत दोन तीन दगड असत. या जंगली स्थितींत खुनांची सं-ख्या वाढली. आह्मांस मोठें भय वाटूं लागलें कीं, आपली मेहनत व्यर्थ जाण्याची पाळी येणार कीं काय? पोरांवर हल्ले होत नसत, तरी पोरांच्या आया पोरांना लहान लहान खडे मारीत व ते त्यांना चुकविण्यास शिकवीत. पोरें आयांसही तसेच जरा मोठे दगड मारीत ते आया चुकवीत. असा या मंडळींचा आयुष्य क्रम चालला आहे.

या घातमय काळांत सुधारणा ती काय होणार? एकमेकांना ठार करावें कसें, या उद्योगांत जो तो ला-गला असल्यामुळें आह्मांस ही माहिती मिळविण्यास दरीचे खालीं स्वतः जाणें किंवा माणसें पाठविणें धोक्या-चें झालें; कारण आजपर्यंत हीं माणसें दूर कोणी दृष्टीस पडलें तर त्याची पर्वा करीत नसत, पण आतां तीं दग-ड मारण्यांत इतकीं पटाईत झालीं आहेत कीं, कोणतेंही फळ एका दगडानें बहुतेकांस नेमकें पाडतां येई. झा-डावर चढण्याच्या श्रमापेक्षां नारळांशिवाय अन्य सर्व फ-ळें हीं माणसें दगडांनीं पाडूं लागलीं; यांत त्यांचे अने-

क हेतू होते. झाडावर चढले असतां, खालीं कोणी येऊन आपल्यावर हल्ला करील ही भीती, दगड फेंकण्यांत आपली प्रवीणता, आणि चढण्यास लागणाऱ्या वेळापेक्षां दगडानें काम लौकर होतें.

हीं जशीं झाडांवर दगड फेंकीत तशीं तीं माणसावरही फेंकीत, पण दगड चुकविण्यांतही त्या माणसांची नजर इतकी उत्तम बसलेली आढळली कीं, चण्याएवढा दगड जोरानें आला तरी तो त्यांस दिसे व त्याला ती परस्पर जाऊं देत.

असा प्रकार सहा महिने चालला होता. जीवित्व रक्षण करण्यासाठीं त्यांना रात्रंदिवस जपावें लागे. या सहामाहींत सुमारें लहान मोठे २० पासून २९ पर्यंत खून झाले असावें असें वाटतें, या अवधींत अचूक दगड मारणें, ते चुकविणें, धांवणें आणि अन्नसामग्री झटपट मिळविण्यांत ही वस्ती पटाईत झाली; नारळीवरील नारळांना मात्र कोणी पुसत नसे. खालीं पडलेल्या नारळांचा उपयोग तीं करीत; पण नारळीवर चढण्याच्या भरीस कोणी पडत नसे. यावेळीं हा समाज रक्षण करण्यास शास्ता पाहिजे, शास्ता नसल्यास पुढील उत्पत्ति बंद राहून खुनांची संख्या वाढल्यानें समाज नष्ट होईल.

कल्पकाच्या कल्पनेचा उपयोग होतो, कल्पना देशकालवर्तमानास योग्य मात्र पाहिजे. एका पुरुषानें

चांगले चांगले पदार्थ रात्रीं जमा केले. आंबे, नारळ, करवंदें वडापिंपळाचीं व उंबराचीं फळें इत्यादि. त्याला कोणी मनुष्य आढळलें कीं, तो त्याला हा मेवा मारी; तो मनुष्य याला दगड मारी, ते दगड चुकविण्यांत हा फार दक्ष असे. मेवा आपल्यापुढें येऊन पडतो असें पाहून कोण संतुष्ट होणार नाहीं ? ही निरपेक्ष उपकृति सर्वांस आवडणार. ज्या माणसांची नजर याच्या मेव्यावर गेली नाहीं, तीं याला भिऊन पळालीं. एकाचें नजरेस आलें कीं, आपल्याला मारलेला पदार्थ दगडासारखा जोरानें येत नाहीं आणि तो चुकविला तर फार दूर जात नाहीं. तेथेंच पडतो. तो मनुष्य शत्रूला मारण्याकरितां दगड पाहूं लागला तो याला उंबरें व आंबे दिसले. त्यानें त्याचें पुढील शस्त्र पाहिलें तों आंबा आलेला त्याचे दृष्टीस पडला. तें मधूर पक्व फळ पाहून त्याचा हात त्याला दगड मारण्यास उठेना. मानवी कृतज्ञ स्वभावानें त्याला मोहून तो विश्वासानें त्याजकडे जाऊन त्याला चाटूं लागला. फळें मारणाराही त्याच्या येण्यानें घाबरला नाहीं; कारण त्याचा हेतू कपट करण्याचा नव्हता; तेव्हां तो तरी भितो कशाला ? दोघांनीं एकमेकांना चाटलें आणि एकत्र बसून फलाहार केला. ही एकी झाल्यानें उभयतांस अत्यानंद होऊन ते नाचूं व गाऊं लागले. एकानें रात्रीं निजावें व एकानें

फळें जमवावीं असा क्रम चालू झाला. जो मनुष्य यांच्या तावडींत सांपडे त्याजवर हे फळांचा वर्षाव करीत, तेणेंकरून यांना हा मार्ग वशीकरणाचा साधला. एक दोन माणसें यांनीं रोज आपलींशीं करावीं. व त्यांना तोच मार्ग लावून द्यावा. असें करतां करतां तीन चतुर्थांशा वर समाज यांनीं एकवटला. निरपेक्ष बुद्धीनें दुसऱ्यावर प्रथम प्रेम करणें हेंच मोठेपणा पावण्याचें साधन आहे. प्रथम या माणसानें दोन दिवस जास्त श्रम केले, पण पुढें याला मिळत गेलेलीं माणसें फळें आणीत, लोकांना मारीत आणि याला अमुक काम केल्याबद्दल सांगत. त्यानें बरें केलेंत एवढें शब्द उच्चारलें कीं सर्व श्रमाचें फळ त्याच्या बिन पगारी नौकरांस आलेंसें वाटे. दहा बारा माणसें नारळी बागेंत अन्य फळें घेऊन जात आणि कोणी जवळ पास दिसल्यास त्याजवर फळांचा वर्षाव करीत; तोंपर्यंत कांहीं जणें नारळीवर चढून नारळ काढूं लागत, कांहीं सोलूं लागत आणि मेजवानीकरितां खोबरें राजाकडे नेत. सर्व माणसें राजाच्या आज्ञेंत रहात. असें करून हा एक समाज बनला. कांहीं तुरळक लोक मात्र दरी खोऱ्यांत या मंडळीच्या भयानें बसले होते. त्यांचा शोध करण्यास ही मंडळी जाई व एकेक वश करून आणी. परोपकृतीनें जें समाजत्व जमतें तें कायम रहातें, तसें तें कायम झालें असा रंग आज दिसत आहे.

हा राजा साधक तत्ववेत्ता असल्यामुळें याला मानवी सुखाच्या कल्पना सुचूं लागल्या. त्यानें काथ्या व पाखरांचीं पिसें जमा करवून पुष्कळ बिछाने तयार करविले. त्या बिछान्यांवर रात्रीं सर्वांनीं निजावें. सबंध नारळांतील खोबरें काठीनें काढून तीं भांडीं विपूल करून ठेविलीं. पाण्यावर कोणी गेलें, ह्मणजे दोहों हातांतून दोन बेले पाणी आणी. त्यानें काथ्याची दोरी विणून ती १० वेल्यांत ओंवून काढली. नारळाला एका डोळ्यांत एक भोंक सहज पाडतां येतें; पण यानें टोंकदार दगडांनीं दुसरा डोळा फोडून दोन दोन भोंकें तयार केलीं आणि आंतून दोरी ओंवून घेतली. हें अनुकरण भराभर होऊन पुष्कळ माळा तयार झाल्या. पाय रहाटाच्या मोड्याप्रमाणें ही माळ पाण्यांत टाकून ती मंडळी एकेक मोघा भरी आणि असें घागरभर पाणी ते पाहिजे तिकडे नेऊं लागले. या कल्पनेमुळें पाण्यापासून अर्ध कोसावरही यांच्या मेजवान्या उडत व कामें चालत. या माळांच्या युक्तीनंतर एकेक बेला प्रत्येकानें दोरींत ओंवून आपापल्या गळ्यांत बांधला. कोणीं पाण्याकडे गेल्यास गळ्यांतलें बेलेंही नेई व तें भरून आणल्यावर ज्याचें त्यास देई. तें बेलें कोणी पोटावर लोंबवीत, कोणी पाठीवर लोंबवीत व कोणी तर सव्यापसव्य जानव्याप्रमाणें दोरी टाकून बेलें बगलेंत ठेवीत.

आतां स्त्रिया पुरुषांस चाटीत व पुरुष स्त्रियांस चाटीत आणि मोहांत पडत; त्यावेळीं मोहांत पडलेल्या पुरुषांस दुसरे पुरुष चावत. या राजाचे पूर्वी जो राजा होता त्याचे राणीशीं एक पुरुष सलगी करीत असलेला त्या राजानें पाहून त्याला फार त्वेष आला आणि तो त्या माणसाजवळ जाऊन त्याला चाटूं लागला. चाटतां चाटतां त्यानें मर्मस्थानीं चावा घेऊन त्याचा प्राण घेतला. तें पाहून इतर स्त्री पुरुषें त्याला भिऊन पाय काढूं लागलीं. पण नवीन राजानें तें दुष्ट कृत्य पहून ताबडतोब असा एक दगड त्याची नजर चुकवून मारला कीं, त्या दगडानें खुनी मनुष्याला मूर्छाच आली. तें झाल्याबरोबर त्याच्या गळ्याचा यानें घोट घेतला. फाकूं पहात असलेलीं सर्व माणसें याचेजवळ जमून तीं याला चाटूं लागलीं.

या नव्या राजानें आज पुढील नियम आपल्या प्रजेस सांगून त्या धोरणावर राज्य चालविलें.

१ कोणाचा कांहीं अपराध कोणी केल्यास तो मला सांगावा; मी त्याला ठार करीन. (मानवी प्राण्याची पहिली शिक्षा कोणत्याही अपराधास देहांत प्रायश्चित्ताचीच खरी.) परस्पर कोणीं कोणाला मारूं नये.

२ एकमेकांवर प्रेम करणें तें करावें; पण कोणी कोणाला प्रेमाकरितां चाटूं नये. आयांनीं मात्र मुलांस चाटावें.

३ प्रत्येक स्त्री पुरुषांनीं लंगोट्या (केळीच्या सोपाच्या किंवा कुंभ्याचा गर्भसालीच्या) घालाव्या. ही लंगोटी राजानें स्वतः घालून दाखविली. ज्यायोगें मर्मस्थान सहसा कोणाच्या दांतांत सापडूं नये.

४ कोणाला शरण जाणें झाल्यास आपण एकमेकांस चाटतों, या चुकीनेंच आजचा खून झाला. ज्याला "मी तुजवर प्रेम करतों" असें ह्मणावयाचें असेल त्यानें जमिनीवर निजावें. त्यापासून पुढल्याची खात्री होईल कीं, याचे मनांत कपट असल्यास आपण त्याचे छातीवर बसूं शकूं; अशी जी त्यानें तयारी केली तें विश्वासाचें चिन्ह आहे.

५ असा ज्यानें विश्वास दाखविला, त्याला जो मारील त्याला जवळ असलेल्यानें ठार मारावा (या ठिकाणीं हा राजा आपला अधिकार समाजास देतो, ही त्याची चूक आहे, तरी राजसंस्थेच्या बाल्यावस्थेंत बरेच चांगले नियम झाले ह्मणण्यास हरकत नाहीं.)

६ संभोग सर्वांसमक्ष होऊं नये, रात्रीं अंधेरांत किंवा दूर जाऊन स्त्रीपुरुषांनीं भेटावें.

या नियमानें राजसंस्था सुरू झाली. नियम सर्वांस समजले व ते सर्वांनीं नीट समजून घेतले. वस्त्र परिधान प्रकार आतां जरी शोभादायक झाला आहे; तरी तो सुरू होतांना शरीर रक्षणासाठीं झाला आहे. सर्व अंग थंडीवाऱ्यापासून व कृमीकीटकांपासून रक्षण करण्या-

साठीं आंगभर वस्त्राची जरूर पडली. वस्त्र लज्जेकरितां नेसावया चें, असें वस्त्राची पुरती संवय झाल्यावर वाटूं लागलें.

साष्टांग नमस्कार घालण्याची चाल वरील नियमानें पडली. ज्या स्थितींत आपण सामर्थ्य हीनता दाखवूं शकतो, अशी स्थिती उताणें पडण्याची; पण उताण्याचा उपडा वळण्यास वेळ लागतो तो लागूं नये ह्मणून उपडें पडून परस्वाधीन होणें ह्मणजे साष्टांग नमस्कार घालणें आहे.

या सत्पुरुषाचे कारकीर्दींत बराच मोठा समुदाय एक कुटुंब बनला. थोडे लोक यांच्या मेळांत आले नव्हते. तेसुद्धां यांच्या दृष्टीस पडले तर यांना सामील होत. सर्व कारभार एकसूत्रानें चालला. अन्नसामग्री आणणारांनीं ती आणावी, पाणी आणणारांनीं पाणी, कमलपत्रें आणावीं आणि इतरानीं इतर पदार्थ आणावे. याप्रमाणें नियमित पदार्थ उत्पन्न करण्यास किंवा आणण्यास माणसें नियमित झाल्यानें नासधूस कमी होई, व कल्पना वाढत चालल्या. कोणाला अन्न जास्त होऊन पोट फुगलें तर त्याला उलटी होण्याकरितां समुद्रांचें पाणी पाजीत; त्यानें एक तर उलटी होई; नाहीं तर कांहीं अपाय न होतां अन्नपचन होई. हें औषध मानलें गेलें तशी ती शिक्षाही पण झाली. जास्त अन्न खाल्लें असतां समुद्राचें खारट पाणी प्यावें लागेल. समुद्राच्या पाण्यानें वांती होते, या अनुभवानें ह्या औष-

र्थाचा मानवी प्राण्यास शोध लागून तो पदार्थ पाचक औषधी ठरला. जसें तलावाचें पाणी ही मंडळी भोजनाचे वेळीं आणी, तसें थोडें समुद्राचेंही पण आणी आणि एकदम तें पाणी प्यावें लागूं नये ह्मणून मधून मधून एकेक घोट घेत किंवा खोबऱ्याचे तुकडे किंवा अन्य भाजी पाला या पाण्यांत बुडवून खात. तेव्हां त्या पदार्थांच्या पाचकपणाचें विशेष स्वरूप कायम न रहातां तो पदार्थ रुचीकरितां आहे असें वाटूं लागलें. त्या पदार्थाच्या मिश्रणाशिवाय कोणताही पदार्थ या प्राण्याला आळणी वाटूं लागला.

भाषा—आजपर्यंत यांची भाषा अगदीं संकोचित असे. थोडा मजकूर समजाविणें झाल्यास हात, तोंड, मान, डोळे, पाय सर्व अवयवांचा उपयोग करावा लागे. चालणें ह्मणजे प्रत्यक्ष चालावें लागे. आणि भाषेंत संकोचित शब्द असले ह्मणजे समजाविण्यास अडचण पडते. मंमं या त्यांच्या शब्दाचे जर अर्थ करूं तर ते पुढीलप्रमाणें होतील. खाणें, चोखणें, चाटणें, चावणें, स्तनपान करणें, दांतांखालीं धरून फोडणें, पिणें, भुरका मारणें, गिळणें, मिटक्या मारणें, पाणी, दूध, नारळाचा रस, कोणतेंही फळ, किंवा खाद्य, आई, प्रेमाचें मनुष्य, राजा (राजाला तो प्रेमळ असल्यामुळें ही मंडळी मंमं ह्मणे.) रतिसुखाचे वेळीं आपुक मापुक. प्रसंगावरून व हात

वाऱ्यांवरून ते ते शब्द ओळखायाचे, तरी बऱ्याच चुका होत असत. नारळ मंमंकडे पाठविलेला मनुष्य पाणी मंमंकडे जाई व पोर असलें तर आई मंमं आणी, अशी अडचण पडे, तेव्हां फट् मंमं ह्मणजे नारळ, छातीवर हात मारून मंमं ह्मणजे आई, मंमं ह्मणून " आ " पसरला तर पाणी समजलें जाऊं लागलें. ही त्या मंड-ळीच्या भाषेची सुधारणा होत चालली आहे.

समुद्राच्या पाण्यांत सर्व खाद्यें बुडवून खाण्याची मूळ कल्पना. हें बेट संकोचित असल्यामुळें या कल्प-नेची विशेष सुधारणा लवकर होईल असें अनुमान नाहीं. ही जमीन जर विस्तृत ह्मणजे शेंदोनशें कोस लांबी रुंदीची असती तर हीं माणसें जसजशीं समुद्रापासून दूर जातीं तसतसें समुद्राचें पाणी घेऊन जातीं व तें रक्षण करतीं. पुष्कळ दिवस पाणी संग्रह केल्यानें शुद्ध पाणी वाफेनें वातावरणांत मिसळून क्षार खालीं रहाता; तो क्षार तीं माणसें चाटतीं किंवा त्यांत गोडें पाणीं घालून तें खारट पाणीं तीं उपयोगांत आणतीं. हा क्षाराचा उपयोग स-र्वत्र होऊं लागल्यावर समुद्रापासून पाण्याचें ओझें वा-हून नेण्यापेक्षां तें पाणी जमिनीवर भरतीचे वेळीं घेऊन सुकतीचे वेळीं तें परत न जाई असें बांध घालून सुक-विण्याची कल्पना हेंच मीठ आणि तोच मानवी श्रमांचा मितव्यय. याप्रमाणें समुद्राच्या मिठाची कल्पना जगांतील

माणसांस पूर्वी सुचली असावी व खाणीचे मिठाची कल्पना नंतर त्या पदार्थाचे रुचि सादृश्यानें झाली असली पाहिजे.

हें मोठें एक सूत्री कुटुंब मोठ्या आनंदानें राहूं लागलें. त्यामुळें सर्व प्रकारच्या सुधारणा एकापुढें एक धावूं लागल्या. जी कल्पना एके ठिकाणीं एका डोक्यांत निघाली ती सर्वांत पसरे व ती त्यांच्या अंगवळणी पडल्यासारखी होई.

हीं माणसें राजाज्ञेप्रमाणें आपापलीं कामें बिनचूक करीत; तरी मानवी प्राणी चुकार असल्यामुळें जवळचें आणि सोपें काम करणारांची संख्या फार. समुद्राचें पाणी कुटुंबास थोडें लागे व कंदमुळें जास्त लागत, तरी समुद्राचें पाणी आणण्याऐवजीं सगळीं इतर पदार्थ जमविण्यास खुषीनें जात; पण पाणी आणण्यास एकट्यास जावें लागत असल्यामुळें जो तो येथें कुचराई करी. कित्येक वेळां ऐन भोजनाचे वेळीं तें काम स्वतः राजाला करावें लागे. या गैरसोईवर तो विचार करून थकला आणि शेवटीं त्यानें एका स्त्रीस सक्त हुकुम दिला कीं, समुद्राचें पाणी नेहमीं तूंच आणलें पाहिजे; तसें न करशील तर तुला ठार मारूं. त्या स्त्रीनें दोन तीन दिवस पाणी आणलें आणि त्या जाचांतून सुटण्यासाठीं तिनें जंगलांत पलायन केलें. तिची वाट पाहिली, पत्ता लागला नाहीं. तिचा शोध करण्यास कित्येक माणसें पाठविलीं तरी शोध लागेना व ती कोण हेंही शोध करणारांच्या बरोबर ल-

क्ष्यांत येईना. तिची चेहेरेपट्टी वर्णन करण्यास राजालाहीं मार्ग नव्हता. राजा ज्या वेळीं कोणास सक्त हुकुम करी, तेव्हां या बाईनें घालून दिलेल्या कित्त्याचें अनुकरण पुष्कळांनीं करून हा एकवटलेला समाज सपाट्यानें क्षीण होऊं लागला. (पराधीनतेपेक्षां देहाला जास्त श्रम झाले तरी सोसणारीं माणसें समाजांत बरींच आढळतात.) कोणाला काय कामें वांटून दिलीं व तीं कशीं होतात हें कांहींच समजेना. राजानें मग समुद्राचें पाणी स्वतः पुरविण्याचा निश्चय केला व इतरांस कामें त्यांच्या इच्छेप्रमाणें वांटलीं. कोणी नारळ आणण्यास राजी होता, त्यानें नारळ आणावे; कोणी पाला आणण्यास खूष होता, त्यानें पाला आणावा. कोणी पाणी आणावें, स्त्रियांनीं नारळाचीं चोडगें काढावीं, दोऱ्या वळाव्या, पोरें खेळवावीं, गावें, नाचावें, भाजी पाला नीटनेटका करून भोजनाचे वेळीं पुढें करावा. इ.

पण ह्यांतही बरोबर कामें होईनात. मला असें सांगितलें होतें, असें कबूल करीनात व राजालाही बरोबर कोणाला काय काम सांगितलें हें स्मरेना. तेव्हां लिपीची कल्पना निघाली. ती आली सरड्याच्या सरड्या खरडतो अशी नव्हे, तर लिपीची कल्पना चित्रकलेपासून उद्भवली. पहिल्या दिवशीं सर्वांच्या गळ्यांत जो पदार्थ त्यानें आणायाचा तो संबंध बांधायाचा. ज्याच्या गळ्यां-

त नारळ बांधला असेल त्यानें नारळ आणावे व ज्याचे गळ्यांत आंबा बांधला असेल त्यानें आंबे आणावे;तरी त्यांत नियमितपणा नसे. एकवेळ एकच नारळ एकजण आणी तर एक दिवशीं दहा आणी. तेव्हां जितके आंबे आणण्यास सांगायाचें असे, तितक्या गळ्यांतल्या आंब्यावर रेघा मारण्याचा क्रम राजानें सुरू केला. अंक लिपीचा हाच प्रारंभ ह्मणून जगांतील बहुतेक लिप्यांत पहिले तीन चार अंक रेघांचे संक्षेप असतात. रोमन I, II, III, इंग्रजी ।, =, ≡, संस्कृत १, २, ३, इत्यादि.) जोडण्याच्या घाईनें किंवा लपेटीनें त्यांचीं स्वरूपें बदललीं आहेत. हिशेबांत आंकड्यांचें काम स्वच्छ पाहिजे ह्मणून ०।. ०॥. ०।॥. एक पैसा, दोन पैसे, तीन पैसे किंवा ०- ०= ०≡ एक आणा, दोन आणे किंवा तीन आणे याप्रमाणें दाखवितात.

आपण माणसें किती होतों हें जरी राजाला सांगतां येण्यासारखें नव्हतें तरी आपण आतां सर्व मिळून मुलें-बाळें सुद्धां ३७ आहों हें त्यानें दगडावर रेघा काढून व खड्यांचा पुंजका ठेवून सांगितलें. एका दगडावर

---

१ टीप—। = ≡ हे खरे आंकडे होत; पण लिहिण्याच्या घाईमुळें हात न उचलतां लिहिण्याचा प्रघात जारी होऊन त्यांचीं स्वरूपें बदललीं. वरील रेघा हात न उचलतां काढल्यास 1, 2, 3, १, २, ३ अशा स्वरूपाचे आंकडे तयार होतात.

प्रत्येकानें एकेक रेघ ओढायाची व एका करवंटींत एकेक खडा टाकायाचा आणि हजिरी घेतांना ते खडे वांटून द्यावयाचे. खडे शिल्लक राहिल्यास सगळीं माणसें हजर नाहींत, असें समजावें; कोणतें माणूस हजर नाहीं, हें मात्र लक्षांत आणण्यास वेळ लागे; तरी मंडळी थोडी असल्याकारणानें चुकलेलें मनुष्य विचाराअंतीं यांचे ध्यानांत येई. या राजानें समाज शास्त्राचे नियम यांस सांगावे व या माणसांस खूप ठेवावें. नुसतें समुद्राचें पाणी आणणारालासुद्धां नारळ, केळें व कमलगट्टे खावयास मिळतात किंवा पाला आणणाऱ्याला काथ्याची दोरी, कुंभ्याच्या सालीची उत्तम लंगोटी व घोटींव बेलीं मिळतात, हें सूख पळून गेलेल्या लोकांस मिळणार नाहीं. एकेकट्याला सर्व पदार्थ मिळविण्याचे श्रम करावे लागून शिवाय एका पदार्थावर दोन मनुष्यें पडल्यास एकमेकांस चावतील. चावणाऱ्यापासून सोडविण्यास कोणी येणार नाहीं. नारळी बागेंत जर ते लोक येतील तर तुह्मी त्यांस चावावे, त्यांच्या लंगोट्या फाटक्या असतील, तुह्मांसारख्या स्वच्छ लंगोट्या त्यांस मिळणार नाहींत; या गोष्टी ऐकून ती मंडळी दृढ निश्चयानें एकी संभाळूं लागलीं; मग एकाद्याला विशेष श्रमाचें काम पडलें तरी ते पर्वा करीत नसत. एकेकदां कामें आंगवळणीं पडलीं ह्मणजे तींच त्यांना जास्त सुलभ जात.

समाजांतून पळालेलीं माणसें समाजमुखाला अंतरल्याबद्दल त्यांसही दुःख होई व तीं लहान लहान समाज स्थापन करूं लागलीं. एक दुसऱ्यास भेटलें ह्मणजे त्याला हातांतील पदार्थ अर्पण करी किंवा जमिनीवर पडून मी तुझा शत्रू नाहीं, असें सिद्ध करीत. तसें झाल्यावर एकमेकांचे गळ्यांत हात घालून तेथें मित्रत्वाचा ठराव होई. आपण जें खाद्य पेय मिळेल तें वांटून खाऊं, एकमेकांपासून दूर राहणार नाहीं, आपल्यावर कोणा शत्रूनें चाल केल्यास दोघे मिळून त्याला ठार करूं, आपल्यांत एकाला त्यानें मारलें तरी दुसऱ्यानें त्याला मारावें, त्याच्याशीं स्नेह कदापि करूं नये, असे जिकडे तिकडे नियम ठरूं लागले. समाजमुखास मुकलेल्या माणसांस लंगोटी मुख्य खूण असून सर्व माणसें एकत्र असल्यामुळें सर्वांचे चेहेरे एकमेक ओळखीत असत; त्यायोगें हे लहान लहान समाज बनण्यास बिलकूल वेळ लागेना. मुख्य समाजाशीं मात्र वांकडें; बाकी दोन दोन तीन तीन चार चार मनुष्यांचीं जीं कुटुंबें जमलीं त्यांच्या परस्पर गांठी पडत; पण मारामारी होत नसे; एवढेंच नव्हे तर त्या त्या समाजांच्या मुख्यांचें मुख्याशीं मित्रत्व जमे. हे चार चार मनुष्यांवरचे राजेच समजायाचे. दोन दोन तीन तीन वर सांगितलेलीं कुटुंबें एकत्र भोजन करीत व एकमे-

कांस जरूर लागलेली वस्तूही पुरवीत. कोणी कुटुंबानें फळफळावळ जमविली असून जर समुद्राचें पाणी आणलें असून तें गळून गेलें किंवा करवंटी पालथी झाली, किंवा कमी पडलें तर दुसऱ्या कुटुंबांतून तें करटभर आणतां येई. एखादा मनुष्य उपाशी असला आणि कोणत्याही टोळीकडे गेला तर त्याला ते लोक आपल्या कुटुंबांत सामील करीत.

ही मंडळी मुख्य राजधानीपासून दोन कोसांवर असे; तरी राजाचे लोकांच्या वेळा चुकवून ते नारळी बागेवर स्वाऱ्या करून तेथून नारळ पळवीत. हें मुख्य राजाचे लक्षांत येतांच त्यानें तेथें पहारा बसविला. प्रथम पहारा दिवसा असे, रात्रीं मंडळी परत येई; पण चोरांनीं रात्रीं आपलें इष्ट खाद्य साधण्याकरितां नारळ, केळीं हवीं तेवढीं लुटावीं. या लुटण्यांत फाजील पदार्थांचा खर्च होऊन मुख्य समाजाचें नुकसान होई. मग रात्रंदिवस पहारे बसले. रात्रीं नारळी बागेंत लढाया होत व खून पडत. मुख्य राजाचें नियमित बल कमी होऊं लागले व चोरांचें प्राबल्य झालें मुख्य राजाचे मजबूत पहारेकरी बळी पडून अशक्त स्त्रीपुरुषें व पोरें फार वाढलीं. कमाई करणारांपेक्षां फुकटखाऊंची संख्या जास्त झाल्यानें मुख्य राजा जेरीस आला. मुख्य समाजास समाजत्व राहिलें नाहीं. समाजांतल्या दुबळ्यांस अन्नाची भ्रांत पडूं लागली.

याप्रमाणें मुख्य समाजांतील माणसें कमी होतां हो-तां राजा एकटा राहिला तरी त्याच्या कल्पना शक्तीला किंवा मोठेपणाला फुटलेले लोक नुसता मान देत होते, इतकेंच नव्हे तर त्याचा ह्या सर्वांस वचकही होता. राजा कोणाच्या दृष्टीस पडला तर त्याची भेट घेण्याचें साहस कोणी न करतां तीं माणसें दूर जात. राजा ज्या वृक्षांचीं फळें काढी त्या वृक्षाकडे इतर टोळ्या जात नसत. ज्यानें या जंगली लोकांना सामाजिक वळण लावलें तो मात्र बिचारा एकटा राहिला व इतर माणसें समाजांत राहिलीं. जे समाजरक्षक बलिष्ठ आपल्या टोळीचे जास्त अभिमानी असत त्यांच्या टोळींत इतर टोळींतील माणसें मि-ळत आणि टोळ्या रोज क्षीण होऊन मोडत व कांहीं टोळ्या विशेष मोठ्या होत. असें करतां करतां सहा महिन्यांत अनेक कुटुंबें दोघां समाज रक्षकांच्या धोरणानें चालूं लागलीं. हे समाज समाजांच्या कायद्यांनीं बनले होते.

एका समाज रक्षकानें ठरविलें कीं, लहान लहान टोळ्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं रहावें व भक्ष्य मिळ-वावें, पण एकमेकांशीं तंटा भांडण होईल तेव्हां त्याचा न्याय मात्र आपल्याकडे आला पाहिजे.

दुसऱ्या रक्षकानें ठरविलें कीं, आपण सर्व एक कुटुंब समजून खाणें पिणें जाणें, येणें एक सूत्रांत असावें. हा समाज वरील पहिल्या समाजास मूर्ख व

तुच्छ मानी व पहिला समाज स्वतंत्रता नष्ट केल्यामुळें दुसऱ्यास तुच्छ मानी. प्रसंगविशेषीं या दोहों पक्षांत मोठे तंटे उपस्थित होऊन माणसें एकमेकांस चावत; त्यावेळीं दोघे समाजरक्षक तोंड काढीत कीं, आपण आपसांत दोघे लढूं. जो मरेल त्याचें मत खोटें, जो जगेल (मारील) तो समाजरक्षक खरा. अशा त्यांच्या कुस्त्या जुंपत व ते एकमेकांस मारीत. तरी दोन समाज कधींच नष्ट झाले नाहींत. एखादवेळ तिसरा समाज उपस्थित होई; पण तो लवकर नष्ट होई. लढाई करून एकमेकांस जिंकणें हें खरें मत; ह्मणून जो तो आपापली शक्ति वाढविण्याचा यत्न करूं लागला. राजानें पाहिजे तो हुकूम करावा आणि तो इतरांनीं मानावा असा प्रकार होऊं लागला. जे विशेष सशक्त असत, ते पौष्टिक अन्न खात व दुबळे लोक झाड पाल्यावर निर्वाह करीत. समाजांतल्या दांडग्या लोकांनीं उंची फळांकडे इतरांस ढुंकून पाहूं देऊं नये. तीं फळें ह्यांनीं यांना आण आणून चारावीं व यांनीं दुबळ्यांचें रक्षण करावें. हे बलिष्ट लोक खातारे होऊन मरण्याची यांना पाळीच येत नसे. यांच्या नेहमीं लढाया होत; पण दुबळ्याबरोबर लढाई करण्यांत मात्र कोणाला बरें वाटत नसे. व लोकही त्या माणसाची प्रतिष्ठा मानीत नसत. दुबळ्यावर जर कोणी बलिष्ट

तुटून पडला तर त्याजवर इतर माणसेंही हल्ला करीत.

चांगलें खाणें व अंग घटविणें यांत तरुणांस मोठा पुरुषार्थ वाटे. त्यांच्या पुरुषार्थाकरितां पौष्टिक पदार्थ पुरवण्यांत हीं दुबळीं माणसें प्रतिष्ठा समजतात. याप्रमाणें तो समाज मजबूत होऊं लागला. स्त्री असो अगर पुरुष असो पौष्टिक खाणें मिळविण्याच्या यत्नांत असत. बलिष्टांना स्त्रियांनीं दूध पाजावें ह्मणून स्त्रियांचीं काळजी प्रत्येक पुरुष घेई. लढाया होऊन कित्येक बलिष्ट मरत; पण त्यांचे अनुयायी पुनः तयार होत. बलिष्ट लोकांनीं आपली झोंपडीं डोंगरांच्या शेंडयावर बांधलीं. त्यांत त्यांनीं विश्रांति घ्यावयाची, ज्यायोगें खालच्या प्रदेशांत संचार करणारा शत्रू सहज दृष्टीस पडावा व खालून येणाऱ्या शत्रूचें वरील शत्रूवर बल चालूं नये (उंचवट्यावर खेडीं वसणें व डोंगरी किल्ले बांधणें या कल्पनेशी वरील स्थितीचें साम्य समजावें.) सर्व टेंकडयांचीं शिखरें आतां माणसांनीं व्यापलीं. या व्यवस्थेनें शत्रुत्व कमी झालें. प्रत्येक टेंकडीवर एक शूर पुरुष व त्याच्या मंडळांतली १० पासून २५ पर्यंत माणसें असत, ज्याचे आश्रयाखालीं ज्यास्त माणसें तो जास्त कृपाळू असे. शारिरिक शक्तीवर राज्य घेतां येतें, तरी त्या राज्याचें पालन करण्यास न्याय व कृपाळूपणा जास्त उपयुक्त आहे.

राक्षसांनीं बाहुबळावर राज्यें संपादन केलीं; पण अपापल्या हयातींत तीं गमावून आपले बळीही दिले. संपादन करण्याच्या शक्तीचा उपयोग प्रसंग विशेषीं एकदां दोनदां किंवा दहादां होतो; पण राज्याचा बंदोबस्त ठेवण्यांत सतत वित्त घालावें लागतें. सामाजिक सुखाला धक्का बसतांच तो शहाण्या कारस्थान्यांना सहन होत नसतो; ह्मणून राज्य जिंकण्याच्या शिक्षणापेक्षां राज्य चालविण्याचें शिक्षण ज्यास्त लोकांना जास्त कालपर्यंत द्यावें लागतें.

मागें सांगितलेला समाजाधिपति एकटा असून त्याच्या ताब्यांत अन्नसामुग्री देणारीं कांहीं झाडें होतीं. त्या झाडांवर कोणत्याही टोळीनें हल्ला केला नाहीं तरी कांहीं दांडगीं माणसें क्वचित् त्या झाडांचीं फळें तोडीत. हा प्रकार त्याच्या ध्यानांत येऊन तो कल्पनेनें त्यांचा मोड करण्याच्या तयारीस लागला. बोरीचीं व करवंदीचीं शिरीं त्यानें त्या फळझाडांस बांधिलीं, जेणेंकरून वर चढणाराला कांटे लागावेत. ही कल्पना कित्येकांनीं लक्षांत आणून आपापलीं झाडें समजून त्यांजवर याप्रमाणें शिरीं बांधण्याचा प्रचार पडला. कल्पकानें पाहिलें कीं, नारळीबागेंत सगळ्याच झाडांना शिरीं बांधलीं गेलीं; तेव्हां त्यानें आपल्या झाडांभोंवतीं शिऱ्यांचें कुंपण केलें. तो प्रकार पाहून समाजाचे पुरस्कर्ते जे बलाढ्य पुरुष होते त्यांनीं

पाहिजे तेवढ्या जागा आपल्या माणसांहातीं कुंपणांनीं आंखून घेतल्या. यावरून जमिनीचे भाग व त्या भागांवरील मालकी नियमित झाली. जमिनीवर राजांचे हक्क या कल्पनेपासून उद्भवले. एकमेकांचीं कुंपणें एकमेकांनीं मोडावीं व त्या कुंपणाचीं शिरीं आपापल्या कुंपणांला लावावीं. आपल्या जमिनी विस्तृत कराव्या, असा ज्याला त्याला अभिमान उत्पन्न होऊन त्या गोष्टीस लौकिकत्व आलें. ज्याचेजवळ पुष्कळ जमीन त्याजकडे अन्नसामग्री ज्यास्त ह्मणून अन्नावर पोसणारा मानवी प्राणी जास्त प्रमाणानें त्याचा होई. याप्रमाणें लहान लहान समाजरक्षक जमीदार ऊर्फ जमीनदार बनले. मुख्य समाजरक्षक जो ह्मातारा; हा अगदीं संकोचित तुकड्याचा व दहा पांच झाडांचा मालक होऊन बसला.

ज्यावेळचें हें वर्णन आहे, त्यावेळीं दांत, हात आणि दगडाच्या कपच्या याशिवाय तीक्ष्ण धारेचीं दुसरीं हत्यारें त्या माणसांपाशीं नसल्यामुळें कुंपणें बांधणें किंवा बांधण्यासारखें कष्टमय होतें; तरी दोन दोन अडीच अडीच कोस घेराचीं कुंपणें त्या लोकांनीं घातलीं आणि जो तो समाज आपापल्या कुंपणांत राही.

एकमेकांच्या कुंपणांत शिरणें, व त्याजवर छापा घालणें हे प्रकार केव्हां केव्हां होत; परंतु विस्तवाची कल्पना निघाली नसल्यामुळें कोसभर लांबीच्या कुंपणाचा

घटकेंत नाश करण्याचा मार्ग नसल्यामुळें, कुंपणें त्यांच्या रक्षणाला किल्ल्यासारखीं उपयोगीं पडलीं. कुंपणें करण्यासाठीं जमिनीमध्यें खुंट बसविण्यासाठीं त्यांचे सुळके करावे लागत. हे सुळके तीं माणसें दगडांवर घांसून तयार करीत. घांसणें बहुतकरून समुद्रकांठीं कालवांनीं आच्छादिलेल्या दगडांवर चाले; ज्या दगडांना कालवांच्या शिंपानीं करवतासारख्या किंवा किमणीसारख्या अणी असत. हे सुळके लढाईंतही तलवारीच्या किंवा भाल्यांच्या जागीं त्यांना उपयोगितां येत.

बहुतेक माणसें हें काम समुद्राच्या वाळवंटांत आपापल्या हद्दींत करीत असत. जुना राजा त्या लोकांना पाहून तिकडे जात नसे. जसे इतर लोक याला भीत, तसा तोही त्यांना भीत असे. एके दिवशीं याच्या हातांतील सुकलेला सोटा हा एका दगडावर धार आणण्यासाठीं घांशीत बसला होता. इतर माणसें किंवा हा ज्याप्रमाणें रोज घांसणाऱ्या सोटयांवर वारंवार पाणी घालीत आणि झिजलेला भाग धुवून टाकीत तो प्रकार यानें केला नाहीं. बराच वेळ सोटा घासल्यावर यानें सुळका किती गुळगुळीत झाला, हें पाहण्यासाठीं किंवा झिजलेला कीस झाडण्यासाठीं यानें सुळक्यास हात लाविला. सुळका इतका कढत झाला होता कीं, त्याच्या हाताला एकदम चटका बसला. नंतर त्यानें त्या दगडालाही हात लावून

पाहिला. ज्या ठिकाणीं घर्षण झालें तेवढी मात्र जागा ऊन होती; बाकी सर्व दगड थंड होता. हा चमत्कार पाहून ही नवी कल्पना डोक्यांत जिरविण्यापेक्षां आपल्या जातिवाल्यांस सांगितली असतां ते आपल्या कळपांत येतील अशी याला खात्री पटत चालली. जितका जितका हा मनुष्य त्या कल्पनेचा विचार करी, तितका तितका समाजास जाऊन मिळण्याचा ह्यानें निश्चय केला.

सोटयाचा सुळका पुन्हां तपासून पाहिला तों तो थंड लागला; तेव्हां आपली कल्पना खोटी असेंही त्यास वाटूं लागलें. पुन्हां दंड हातांत घेऊन कांहीं पळें घांसला आणि हात लावून पाहतां तो पूर्ववत् गरम लागला. कल्पना सिद्ध झाली, असें वाटून तो त्या आनंदाचे भरांत नाचूं बागडूं लागला. नानातऱ्हेचे सूर आळवून तो ताना सोडूं लागला. तो सगळा दिवस त्यानें मनोराज्यांत घालविला. त्याच्या मनांतील विचार पुढीलप्रमाणें असावे असें वाटतें. "आपण त्या माणसांत जाऊं, त्यांना गोड गोड पदार्थ अर्पण करूं, ह्मणजे तीं आपलीं होतील. कोणी आपला हुकूम तोडल्यास त्याला गरम केलेली काठी लावली ह्मणजे तो हुकूम मानूं लागेल. मोठमोठ्या पुरुषांनासुद्धां चटका दिला असतां ते भितील."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक करटी हातांत घेऊन

तो कालच्या दगडाजवळ आला आणि ती जोरानें घांसूं लागला. करटीही लांकडाप्रमाणें तापली. नंतर त्यानें एक ल्हानसा गुळगुळीत दगड घेऊन तो त्या दगडावर घांसून पाहिला; तोही गरम झाला. तेव्हां हरएक पदार्थ या दगडावर घांसला असतां ऊन होतो, इतकी कल्पना कायम झाली. अन्य दगडावर पदार्थ घांसला असतां ऊन होतो कीं नाहीं हा अनुभव घेणें राहिलें; दगडामध्यें हा गुण उत्तम असल्याबद्दल तो त्या दगडाविषयीं अत्यंत पूज्यता मानूं लागला. कांहीं तरी पदार्थ आणावा आणि दगडावर घांसावा, आणि ऊन होतो किंवा नाहीं हें पहावें. कंद, मुळें, फळें जें जें खाद्य हा आणी तेंसुद्धां त्या दगडावर घांशी. ओले पदार्थ जरी ऊन होत नसत तरी ते उगाळले जात; हें पाहून आपल्या दातांचें काम करण्याची शक्ती या दगडांत आहे असें त्यास वाटूं लागलें. कठीण पदार्थ त्याजवर फोडतां येतात, व सुके पदार्थ ऊन होतात. अशा या बहुगुणी दगडाला यानें एक निराळें कुंपण घातलें. व आपलें वास्तव्य त्या दगडाच्या सान्निध ठेविलें. जो कांहीं पदार्थ रक्षण करणें असेल तो त्यानें या लहान कुंपणामध्यें आणून टाकावा.

मागें सांगितलेलीं मानवी प्राण्यांचीं घरें या छऱ्या होत. त्यांचा उपयोग पर्जन्य व सूर्याचा ताप यापासून बचाव करण्यापुरता होता. तसा घरांचा खरा उद्देश

नाहीं; घरांचा उद्देश असा आहे कीं, अगत्याचे पदार्थ रक्षण करण्याची त्यांत जागा असावी, त्या पदार्थांकरितां स्थलांची योजना उत्तम व्हावी, व निजण्या बसण्याची व्यवस्था नीटनेटकी असावी असा आहे. या उद्देशाला हें कुरण प्रारंभ झाला. पुढें कांहीं दिवसांनीं आकाशांत ढग येऊं लागले, गडगडाट होऊं लागला व विजा चमकूं लागल्या; तेव्हां या बहुगुणी दगडाला एक छत्री करावी, असें त्या राजाचे मनांत आलें; तेव्हां त्यानें दगडाभोंवतीं चार खुंट पुरले व मध्यें एक उंच खांब रोविला. आणि त्यावर उतरत्या काठ्या बांधून त्यावर झाडांचीं पानें, गवत वगैरे घालून पावसापासून दगडास त्रास न होई असें केलें. त्या छत्रींत यासही बसण्यासवरण्याची सोय झाली.

अशा प्रकारें त्यांच्यांत घराची कल्पना एक दोन पिढ्यांतच आली. कूड, भिंती वगैरेची कल्पना अद्याप नव्हती. पुढें जशी त्यांस सोय जास्त असावी असें वाटूं लागलें तसतशी त्यांनीं केली; व घरास प्रारंभ झाला. प्रथम त्यांचीं घरें उर्फ स्थानिक छत्री ही वर सांगितल्याप्रमाणें चार खुंट व मध्यें एक उंच खांब असून त्यावर काठ्या बांधून वरती कांहीं तरी पर्जन्य निवारणार्थ घातलेलें असे. अशा प्रकारचीं घरें अद्यापही रानांत राहणाऱ्या कातकरी, भिल्ल, कोळीवगैरे लोकांनीं

बांधलेलीं आढळण्यांत येतात. पावसाळ्यांत गुरें चरण्याकरितां रानांत पाठवितात व त्यांस निवाऱ्याकरितां ह्मणून जीं खोपटें अगर वाडे बांधितात ते मानवी प्राण्यानें बांधलेल्या स्थाईक छप्र्या उर्फ घरें, यांची साक्ष आहेत. किंवा खेडयापाडयांत गांवाबाहेर असलेलीं देवळें हीं या घरांहून जरा पुढल्या सुधारणेची द्योतक होत.

या घराच्या कल्पनेविषयीं या पुरुषाला ती विशेष कल्पनासें वाटलें नाहीं; पण घर्षणानें पदार्थ तापवितां येतो हा प्रयोग मात्र तो पुष्कळ वेळां करी. एके दिवशीं पावसानें भिजून व वाऱ्यानें कांकडून एक बाई त्याचे कुंपणाजवळ सहज आली याचे दृष्टीस पडली. तिला त्यानें हात धरून आपल्या घरीं नेलें आणि दगडावर सुकी करवंटी घांसून त्या करवंटीनें त्यानें तिला शेकून काढली. तो प्रकार पाहून ती बाई याच्या कल्पनेनें व परोपकारबुद्धीनें थक्क झाली.

तिनें याला आपल्या स्तनाशीं लाविलें; पण त्यानें स्तनपान न करतां तिला सांगितलें कीं, मी दुधाच्या आशेनें तुला आणली नाहीं; फक्त तुझी हुडहुडी जावी आणि तूं आपल्या मुलाला किंवा देशमुखाला दूध पाजावें. मला हा माझा दगड नारळाचें दूध करून देतो. तूं आतां जाऊन आपल्या पोरास पाज.

हें औदार्य पाहून ती आपल्या कुंपणांत जाऊन

सांगूं लागली कीं, " आपण सोडलेला, खारें पाणी आणण्यास सांगणारा, लहान कुंपणांत एकटा रहाणारा, मंम पदार्थ अंगावर फेंकणारा, खडे ठेवून माणसें मोजणारा, गळ्यांत बेलें बांधणारा, लंगोटी नेसणारा मला भेटला. चावला नाहीं. कपाळावर खुंट मारला नाहीं [एवढेंच नव्हें] दूध प्याला नाहीं. मला चाटलें नाहीं आणि माझें अंग ऊन केलें, हाय केलें, बरें केलें, सुख केलें. दगड ऊन, नारळाची करटी ऊन, माझा हात थंड तो ऊन [केला], माझे पाय थंड ऊन (केले), त्याच्या जवळ रहावें दूध पाजणें नको, नारळ ऊन होतात.

हिचें बोलणें सुधाराचें समजल्याबरोबर बरीच मंडळी याचे घरीं येऊं लागली व याच्या कला शिकूं लागली. यांना वाटत होतें कीं, पदार्थ (घर्षणानें) ऊन होतो, तो फक्त या एका दगडावर; पण ज्या स्त्रियांनीं हा प्रयोग पाहिला त्यांनीं अन्य दगडांवर घर्षणाचे प्रयोग चालवून आपापलीं मुलें त्या युक्तीनें त्या शेकूं लागल्या. मोठीं माणसेंही याप्रमाणें आपआपल्यास शेकून घेत. हा मनुष्य निरुपद्रवी व उपकारकर्ता असल्यामुळें बहुतेक सर्व माणसें याला भेटूं लागलीं. व यानें घालून दिलेल्या किच्याप्रमाणें संसाराचें वळण त्यांना लागे. याच्या संसारासारखे संसार बरेच थाटले. याच्या कुंपणाकरितां इतरांनीं शिरीं आणावीं

आणि कोणी याला खाण्यापिण्याचे पदार्थही आणून द्यावे.

या झातार्‍याकडे लहान मोठीं माणसें सर्व येत असत. फळफळावळ व इतर खाद्य कोणी हातांतून आणीत व याला अर्पण करीत. विशेष चांगलीशी गारगोटी, ओढ्यांतील गुळगुळीत दगड, कांहीं झाडांच्या साली ह्याही भेटी याला येत असत. मनुष्यांना बसवून यानें लांकूड घांसघांसून त्यांच्या आंगाला लावावें आणि त्या चमत्काराबद्दल त्या सर्वांनीं आश्चर्यचकित व्हावें आणि पुनः पुन्हां ऊन लांकूड झातार्‍यानें आपल्या अंगास लावून आपल्यास चटका द्यावा अशी तीं इच्छा करीत. झाताराही तें काम मोठ्या आनंदानें करी; तरी सभोंवतीं बसलेल्या माणसांचें पूर्ण समाधान होत नसे; कारण एकदां ताव दिलेला पदार्थ एकदोघांस लावतांच त्यांतील उष्णता कमी होई आणि बाकीचीं माणसें मला लावा, मला लावा असा आग्रह करीत. एके दिवशीं सर्वांच्या हातांत करवंट्या देऊन त्या त्यांजकडून घांसवून गरम केल्या आणि एकमेकांकडून एकमेकांस चटके देवविले. हें सामाजिक कार्य पार पडल्याबद्दल सर्वांस आनंद वाटून ती मंडळी खूप हांसू लागली आणि झातार्‍याच्या सहायाशिवाय आपल्या करट्या चटका लागण्याइतक्या ऊन होतात, याबद्दल फार खूष झाले. या कार्यांत यांना आपआपल्या कृतीचा कमजास्त अभिमान वाटू

लागत. त्या अभिमानाची प्रौढी ते आपापसांत मारीत. न्याय न होतां मीं आपली करटी जास्त ऊन केली आणि तुझी कमी ऊन झाली हा वाद कायम राही. मग ते लोक आपल्या पराक्रमाचें वर्णन म्हाताऱ्यापुढें पुढीलप्रमाणें करीत:—करटी ऊन, करटी चकचकीत, करटी वीज, (अति घर्षण झाल्यानें ठिणग्या पडत.) करटी सूर्याइतकी हाय, यावरून प्रत्येक मनुष्याला अतिशय घर्षण करण्याची ईर्षा उत्पन्न झाली. या ईर्षेनें जिकडे तिकडे घर्षण प्रयोग मोठ्या जारीनें सुरू झाला. एका लांकडाच्या ओंडक्यावर एक अति सशक्त मनुष्य एक करवंटी घांसीत बसला. त्या लांकडाचा घर्षणानें पडलेला कीस सुद्धां झाडण्यांत त्यानें वेळ घालविला नाहीं. असें घर्षण होतांच धूर निघूं लागला. कित्येकांच्या घर्षणाचा इतका परिणाम होतांच ते तो ऊनपणाचा शेवट समजून घर्षण बंद करीत, तसें यानें न करतां घर्षणाचा सपाटा तसाच चालविला. धुराचा लोट चालला; सगळीं माणसें त्याला पुरे म्हणत, पण म्हातारा म्हणे अजून घांस. थांबूं नको. थोड्या वेळानें त्या करवंटीखालचें भूस जळूं लागलें व त्याचा लाल रंग दिसला, आणि करटीनें विस्तव घेतला. ती पेटती करटी तो लोकांचे अंगास लावूं लागला, पण त्या करटीचा चटका सहन कोण करणार? तो प्रत्यक्ष विस्तव ! ! ती करटी ज्या-

च्या अंगास लावावी तो पळे. शेवटीं ती करटी हातांत धरवेनाशी होऊन खालीं पडली, फुटली आणि जळून तिची राख झाली. हें वर्तमान सांगण्यास मंडळी जिकडे तिकडे गेली व आपापल्या गोटांत सुर्याच्या आगमनाचें वर्णन केलें. दगडावर करवंटी घांसली, तेव्हां आधीं धुकें आलें, तें धुकें बंद होऊन त्यांतून सूर्य जिभा चाटूं लागला. त्याच्या जिभेला हात लावणें फार कठीण इतक्या त्या हालत होत्या. सूर्याला तोंड नसून पुष्कळ जिभा; कोणी हात लावला कीं, तिकडे जीभ जाई. जिभेनें करटी घांसणाराचे हातसुद्धां हाय हुय केले. त्याच्यानें ती करटी हातांत घेववेना. त्यानें करटीला हात लावला कीं, त्याला सूर्य चावे, सूर्याचे दांत दिसत नाहींत, तो जिभेनें चावतो; पण आमच्या चावण्यापेक्षां फार चावतो. अशा गप्पा सर्व वस्तींत पसरून जो तो त्या ज्ञात्याच्या झोंपडीकडे येई व करटीची राख पाहून जाई; ती राख जागचेजागीं पडली होती. पहिला दिवस असा पहाण्यांत गेला, पण विस्तव संग्रहण्याची कल्पना नसल्यामुळें सूर्य उदय पावलेला आपल्यास पहाण्यास मिळाला नाहीं आणि तो अस्त पावल्याबद्दल पुष्कळांस वाईट वाटलें आणि ज्यांना घर्षणांत विस्तव आहे हें कळलें नाहीं ते रडूंही लागले. ज्ञात्याचे अश्रित म्हणून जे होते त्यांनीं पुनः सूर्य आणूं

ह्मणून कित्येकांस आश्वासन दिलें. याप्रमाणें हीं माणसें घर्षणानें विस्तव तयार करूं लागलीं. आणि बहुतेक सशक्त माणसें अग्निहोत्री झालीं. करवंटी पेटूं लागली ह्मणजे ती हातानें धरतां येईना ह्मणून तिला कोणी लांकडानी धरीत, कोणी गवतानें धरीत, कोणी नारळाच्या चोडांनीं अगर काथ्यानें धरीत आणि ज्या पदार्थांनीं ती करवंटी धरावी त्या पदार्थांत सूर्य किंवा हाय येतो हें सहज त्यांच्या ध्यानांत आलें आणि सूर्याला नवे नवे पदार्थ लावीत गेल्यास तो सतत आपल्या जवळ रहातो ही अक्कल सर्वांस आली.

जमीन उकरण्यास किंवा लांकडें फोडण्यास मुळकेदार दगड यांना लागत; मुळका बरोबर नसल्यास ते दुसऱ्या घट्ट दगडानें तयार करीत. एके समयीं एक मनुष्य चकमकीच्या दगडाला टोंक तयार करित एका शेंवरीच्या झाडाखालीं बसला होता. तो चकमकीवर टोला देई तेव्हां ठिणग्या त्याचे दृष्टीस पडत. त्या ठिणग्या पाहून त्याला वाटलें करटी धरणाराचा जसा हात जळतो तसा माझाही जळेल; ह्मणून शेंवरीखालीं पडलेला पुष्कळसा कापूस त्यानें गोळा करून त्या कापसांत गुंडाळून चकमक डाव्या हातांत धरली आणि उजव्या हातानें दुसऱ्या दगडाचे टोले मारूं लागला. दोन तीन टोले मारतांच ठिणग्या पडून त्यांनीं शेंवरीच्या कापसाला

पकडलें. तो घुमूं लागला. पहातां पहातां हातापर्यंत आग आली. त्यानें हातांतले दगड टाकून कापूस कसा जळतो तें तो एकाग्रचित्तानें पाहूं लागला.

तो कापूस जळून गेल्यावर त्यानें दुसरा कापूस गोळा करून पूर्ववत् आपलें काम चालविलें. त्याप्रसंगींही तोच प्रकार घडला; तेव्हां तो मनुष्य म्हाताऱ्याकडे धांवत गेला आणि त्याला तें वर्तमान निवेदन करूं लागला. तो चमत्कार पाहाण्यासाठीं म्हातारा व त्याचे अनुयायी व इतर तमासगीर निघाले. कल्पकानें शेंवरीचा कापूस जमा करून पूर्ववत् प्रयोग केला तेव्हां विस्तव पडला. कल्पनेनें काम केलें तर तें कमी श्रमांत होतें खास म्हणून कल्पकांची किंमत श्रम करणाऱ्यापेक्षां ज्यास्त होते. ह्या लोकांच्या अंगांतून विस्तव तयार करतांना घामांच्या धारा निघत, हात थकून जात, सशक्त माणसांची जरूर पडे आणि जर घर्षणाचे वेळीं मध्यें थांबल्यास केलेले श्रम व्यर्थ जात. सगळ्या समाजांत विस्तव उत्पन्न करण्यासाठीं दोनच माणसें सदृढ आणि सारखें काम करणारीं होतीं; पण चकमकीनें तर पोरानें विस्तव पाडावा अशी अति सुलभ कल्पना झाली. त्या कल्पकाचा जरी आजच्या पद्धतीप्रमाणें जयजयकार झाला नाहीं तरी सर्व माणसें त्याच्या या उपकाराबद्दल ऋणीं झालीं. त्या जातीच्या चकमका त्या बेटावर विपूल होत्या. शेंवरीही पुष्कळ

असून चैत्राचा महिना असल्यामुळें शेंवरीचा कापूस शेंगा फुटून रानोमाळ उडत होता. प्रत्येक माणसानें चकमकी गोळा करून विस्तव पाडला आणि या कल्पनेबद्दल निकडे तिकडे आनंदी आनंद झाला. विस्तवासारखें दैवत मानवी प्राण्याच्या अंकीत झालें. पंचमहाभूतावर मनुष्याचा अम्मल चालण्यास आतां आरंभ झाला. ज्याच्या त्याच्या खांकेंत शेंवरीचा कापूस व हातांत चकमकी आढळत. विस्तवाचा खरा उपयोग काय करावा हें मात्र त्यांना कळत नसे.

या काळामध्यें चकमकी हें या प्राण्यांचें हत्यार झालें. चकमकी संग्रहाच्या पदार्थांतील मुख्य पदार्थ झाला. चकमकी ह्या रत्नें होऊन तीं बहुतेकांच्या गळ्यांत बांधलीं गेलीं. कोण्याकाळीं जसा या प्राण्याला पाण्यानें भरलेलीं बेलीं गळ्यांत बांधण्याचा नाद होता, तसा तो नाद चकमकी गळ्यांत बांधण्यांत उत्पन्न झाला. चकमकी गळ्यांत बांधण्याच्या कल्पनेचाच परिणाम आज हिरे माणकें पोंवळीं इत्यादि दगडाचें मोल होऊन ते दागिने बनले. शोभेचें मूळ सोय आहे. गारगोटयांना भोंक पाडण्याची कला तेव्हां नव्हती, पण दोरी वळण्याची कला त्या माणसांस अवगत होती. दोरीनें गारगोटया तीं गळ्यांत बांधीत. नारळाचें बेलें गळ्यांत बांधण्याच्या कल्पनेचें द्योतक हल्लीं मुलांच्या

गळ्यांत बजरबटु बांधणें आहे. उपयुक्त पदार्थांचा संग्रह करणें हें मानवी मूळतत्व. त्यावरून पुढें ती गोष्ट शोभेकडे किंवा अंधपरंपर शास्त्राकडे वळली. लग्नांत वरानें व वधूनें एकमेकांस धान्य नेऊन द्यावें ह्मणून सर्व धान्यांत प्रधान जे गहूं ते एकमेकांकडे नेणें इष्ट असल्यामुळें प्रथम वर व वधू टोपली टोपली गहू व कांहीं खोबरें नेत असतील; पण खोबरें आणि गहू ही मोठीशी देणगी नाहीं, असें ज्या कालीं वाटूं लागलें त्या कालीं जुनी चाल मोडूं नये ह्मणून गव्हाच्या व नारळाच्या मंडावळ्या तयार करून त्या वधुवरांच्या डोक्यास बांधण्याचा प्रचार पडला, तो अद्याप चालू आहे; आतां कांहीं लोक मोत्यांच्या करतात; पण त्या पूर्व चालीच्या अगदीं विरुद्ध आहेत.

गारगोटीचें सत्व, गारगोटीहून फार चकचकीत व गारगोटीहून अत्यंत कठीण व दुर्मीळ असा जो हिरा त्यानें आपल्या जातीचें वर्चस्व मानवी प्राण्यावर अद्याप ठेविलें आहे. (कोहिनूर गारगोटीचे पायीं आजपर्यंत कोट्यावधि माणसें धारातीर्थी पडलीं आणि आतां त्या गारगोटीचे बारा तुकडे झाले. गारगोट्या गळ्यांत बांधणें हें वेड त्यावेळेस होतें, तसें तें अंतापर्यंतही कायम राहण्याचा संभव आहे.)

हिंदू रितरिवाजांकडे बारकाईनें लक्ष पोंचविलें असत

मूळ कल्पकांचा इतिहास काढतां येतो. तो प्रकार अन्य राष्ट्रांचा नाहीं. तीं राष्ट्रें मूळ गोष्टींना बरींच अंतरलीं आहेत. काष्टांतून विस्तव उत्पन्न करण्याचें स्मारक अग्निहोत्र आहे. श्रावणी हें यज्ञाचें स्मारक आहे, त्यांत जमीन खणावी, अग्नीवर आच्छादन घालावें, वेळूच्या फुंकणीनें फुंकावें, विस्तव ठेवण्यासाठीं स्थंडील ऊर्फ ओटा बांधावा वगैरे कृतींचें हुबेहुब चित्र याज्ञिकांनीं कायम ठेविलें आहे.

मानवी प्राण्याला विस्तवाचा लाभ होणें ह्मणजे ईश्वराची श्रेष्ठ देणगी मिळणें खरें; पण त्या पदार्थाचा उपयोग करण्याचें जर ज्ञान नसेल तर तो पदार्थ त्या प्राण्याच्या नाशास कारण होईल. जो तो विस्तव करण्याच्या नादीं लागला व केलेला विस्तव काष्ठयामध्यें किंवा गवतामध्यें झांकून ठेवूं लागला; माकडांपेक्षां जरा पुढें सरलेलीं माणसें विस्तवासारख्या प्रबळ दैवताला काय झांकतील? झांकलेल्या विस्तवानें पेट घ्यावा आणि वाऱ्यानें त्याला पसरावें असें जागोजाग होऊन त्या बेटावर रात्रंदिवस वणवे लागून राहिले होते. समाजाची सुधारणा ह्मणून जी झाली त्यायोगें त्यांच्या अन्नावर धाड पडली. कित्येक माणसें वणव्यांत सांपडून जळून गेलीं, त्यांचा पत्ता नाहीं. आजपर्यंत या बेटाला विस्तव शिवला नव्हता ह्मणून जंगलांत हजारों वृक्ष वाळलेलेही

उभे होते. प्रतिवर्षी गवताचें खत गवतास मिळून बरू सारखें जोरदार गवत विपूल वाढलेलें असे, तें जळून खाक झालें. पाण्याजवळ विस्तव येत नाहीं हा त्या माणसांस अनुभव होता. हुशार हुशार माणसें समुद्राच्या वाळवंटांत येऊन बसलीं. वर जाण्याची हिम्मत नाहीं व जरूरही नाहीं. यांच्या खाण्याच्या वनस्पती तमाम जळून व होरपळून गेल्या. या माणसांना हा भयंकर दुष्काळ आला. आह्मालाही मोठी काळजी पडली कीं, याचें रक्षण आतां कसें करावें? आमच्या दरींत आग येण्याची भीति नव्हती; पण दरी यांचे स्वाधीन केल्यास तेथेंही असा अडदांडपणा करून ही मंडळी दरीला आग लावील व घरांविषयीं कल्पना करील. सुमारें एक आठवडा आह्मी दरींतील वृक्षांचा पाला रात्रीं समुद्राचे वाळवंटांत नेऊन टाकला; त्या पाल्यावर ही मंडळी निर्वाह करी, तरी पोटभर अन्न सर्वांसच मिळे असें नाहीं. आग विझाल्यावर समुद्रतीराहून स्त्री पुरुषें जमिनीवर आलीं, तेव्हां त्यांना अद्भुत चमत्कार दिसला. जागोजाग जेथें निबिड जंगल होतें, तेथील कांहीं वृक्ष होरपळून नुसते उभे होते व कांहीं राख रूपानें व कांहीं विस्तव रूपानें पडले होते. गवताची काडी कोठें दृष्टीस पडत नव्हती. जिकडे तिकडे राख पडून सर्व मैदानें पांढरीं व काळीं दिसत

होतीं. पक्षांचे शब्द ऐकूं येत नव्हते. ससे, खारी, सरडे, टोळ, यांचा मागमूस नाहीं. या माणसांची कुपणें कोठें होती व मंडप कोठें होते त्याचा पत्ता लागेना. दोन तीन दिवसांत सृष्टी बदलल्यासारखें त्यांस वाटूं लागलें. तळ्यांतील पाणी व झरे कायम होते. बाकी खाण्यासारखा पदार्थ त्यांना दिसेना. तीं माणसें अन्नासाठीं सैरावैरां फिरूं लागलीं. यांचें इतकें दुर्दैव ओढावलें तरी हें चकमकींनीं उर्फ गारगोट्यांनीं दारिद्य आणलें अशी कल्पना कोणाला आली नाहीं. आतां नव्या गारगोट्या मिळणार नाहींत ह्मणून जो तो आपापली गारगोटी संभाळून ठेवी. (दुष्काळांत कांहीं माणसें सोन्याचांदीस जपतां जपतां प्राण सोडतात तोच प्रकार हा) कित्येकांनीं गारगोट्या समुद्रांतील खडकाच्या भोकांत नेऊन ठेविल्या. हीं माणसें कांहीं प्रमाणानें मांसभक्षक झालीं होतीं; पण नुसत्या मांसावर निर्वाह करण्याची यांना संवय आहे कीं नाहीं हा वाद आहे; त्याबद्दल दरींतील मंडळीनें भवती न भवती करून या माणसांना पाला पुरविण्याचें बंद केलें.

समाप्त.

जाहिराती.

आर्यधर्मदर्पण–हें ५८ पृष्ठांचें मासिकपुस्तक वांई येथें निघत असतें. महाराष्ट्र भाषांतरासह महाभारत, योगवासिष्ठ व पराशरमाधव आणि धर्मविषयक निबंध असे चार विषय सवडीनुसार यांत येतात. अगाऊ वर्गणी वार्षिक ४ रु; ट. हं दर अंकास अर्धा आणा. कागद ६० रतली मोहोरेदार घातला आहे. तिसऱ्या सालापासून मासिकाचें पाक्षिक करून वर्गणी दुप्पट केली; परंतु मासिक घेणारालाही सवड पूर्वीप्रमाणें, ४॥८६ वर्गणींत बारा पुस्तकें ओळीनें मिळण्याची ठेविली आहे.

आर्यधर्मरहस्य–ह्या नांवाचें ४० पृष्ठांचें मासिक-पुस्तक वांई येथें सुरू झालें असून त्यांत श्रीमच्छंकराचार्यांचें प्रस्थानत्रयावर असलेलें अप्रतिम भाष्य मराठी भाषांतरासह येत असतें. तूर्त श्रीमद्भगद्गीतेवर असलेलें अनुपम भाष्य भाषांतरासह येत आहे व तें संपूर्ण झाल्यानंतर शारीरभाष्य व उपनिषद्भाष्य हीं क्रमानें येणार आहेत. किंमत २ रु. ट. हं. ८६.फक्त भाषांतरच वाचण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं ट. हं. शिवाय वर्षाची १८१३ वर्गणी देऊन ‘ **मोदवृत्त** ’ वर्तमानपत्र द्यावें. ह्या वर्तमानपत्रांतही सदहू भाष्याचें फक्त मराठींत भाषांतर येत असतें. याशिवाय इतर सार्वजनिक विषयांचा समावेश यांत केला असतो.

काशीनाथ वामन लेले, वांई जिल्हा सातारा.

" मानवी सुधारणा " पु
मिळण्याचीं ठिकाणें.—

पुणें.

१ रामचंद्र निळकंठ सहर
जुन्या मंडईनजीक घर नं० १
२ रघुनाथ गोपाळ परांज
ळशीबागेसमोर जामदाराचा वाडा
३ 'व्यापारी' प्रेस रविवार

व्यापारी व उद्योगवृद्धि
दोन्ही पत्रें घेणारास वर्षाची
गाऊ वर्गणी १॥ रुपया ठे
असून ट. हं. बद्दल प्रत्येकीं ०
आणे ह्मणजे २।८।१० पड
गरजू लोकांनीं याचा फा
अवश्य घ्यावा.

म्यानेजर व्याप
आणि उद्योगवृद्धि